

# सहजयोग साधना
# पायाभरणी

परम पूज्य सद्गुरु

# श्री भाऊ महाराज

यांची

# सहजयोग साधना

# पायाभरणी

## यावरील प्रवचने

# अनुक्रमणिका

## सहजयोग साधना पायारणी भाग पहिला


| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | गोविंद माधव गोपाळा | १ |
| २ | स्पंदने | ५ |
| ३ | आकाशतत्व | ११ |
| ४ | पांडुरंग - योगपीठ | १७ |
| ५ | पिशाच्च बाधा होणे ते शरीरात घुसणे | २१ |
| ६ | मन पारदर्शक असावे | २८ |
| ७ | मेंदुसाठी वातावरण निर्मिती | ३२ |
| ८ | धारणाशक्ती संचलन | ३९ |
| ९ | स्मरणशक्ती वाढवणे | ४३ |
| १० | कृष्ण भेटीसाठी कृष्णभक्ती | ४६ |
| ११ | व्रतस्थ राहण्याचे शिक्षण | ४९ |
| १२ | सर्व सोपवा त्याला | ५२ |
| १३ | तालमय विश्व | ५५ |
| १४ | कृष्ण रंग | ५९ |
| १५ | मातीची दर्पोक्ती | ६४ |
| १६ | देव एकनाथांचा बछडा | ६८ |
| १७ | नियंत्रणाने देव वश्य आहे | ७४ |
| १८ | कृष्णाने गोपींची वस्त्रे लपविली | ७७ |
| १९ | नामस्मरण हेच श्रेष्ठ | ८६ |
| २० | नम्र कृष्ण अभ्यासावा | ८९ |
| २१ | जागृत अंतर्मन कार्यक्षमतेचे भांडार | ९२ |
| २२ | सहजयोग साधनेचा अविष्कार | ९६ |
| २३ | जिजाबाईंची सत्पुत्रासाठी साधना | ९९ |
| २४ | सहजयोग साधना - एक संजीवनी | १०३ |
| २५ | सुक्ष्म देह धारणा | १०६ |
| २६ | साधना-उपासना यासाठी पाया भरणी | ११२ |

# अनुक्रमणिका

## सहजयोग साधना पायारणी भाग दुसरा


| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | माणूस अस्वस्थ असणे | ११६ |
| २८ | भूक तहानेवर नियंत्रण आवश्यक | ११९ |
| २९ | मैथून - संभोग एक उत्तम शास्त्र | १२३ |
| ३० | मानव मॅनिआ चा रुग्ण झाला | १२६ |
| ३१ | मैथूनावर नियंत्रण गरजेचे आहे | १३१ |
| ३२ | विठ्ठलपंत-रुक्मिनीबाईंची साधना, उपासना | १३५ |
| ३३ | विश्रांती (झोप) एक उत्तम शास्त्र | १४० |
| ३४ | मेंदूला विश्रांती देऊ शकतो | १४३ |
| ३५ | ज्ञानाची सुवर्ण भूमी भारत | १४७ |
| ३६ | शिवरायांची ज्ञानसंपदा | १५२ |
| ३७ | सत्संग हाच सहजयोग साधनेचा पाया | १५७ |

# भाविकांसाठी थोडंसं ..........

सद्‌गुरु भाऊ माऊलींची शिक्षण देण्याची पध्दत, रीत अगदी वेगळी आहे. मूलत: शिक्षण याचा अर्थच असा की माणसाच्या ठायी जे पूर्णत्व अगोदरच विद्यमान आहे, ते प्रकट करणे. ज्ञान हे आपल्या अंतर्यामात पूर्णपणे भरलेले आहे. ते बाहेरुन कधीच येत नाही. म्हणूनच सद्‌गुरु हे योग्य मार्गदर्शक आहेत. फक्त सद्‌गुरु माऊलीच हे आतील ज्ञान-अज्ञानाचा पडदा दूर करुन शिष्याला त्याच्या जवळील ज्ञानाची ओळख करुन देतात, त्याची जाणीव करुन देतात.

आई-वडिलांनी सतत अधिकार गाजविल्यामुळे मुलांच्या स्वतंत्र वाढीला वाव मिळत नाही. मुलांच्या भावना, त्यांचे शिक्षणा संबंधी विचार हे आजकालचे आई-वडिल समजू शकत नाहीत. लहान वयात मुलगा चुकणारच! म्हणून त्याच्या चुका सतत दाखवून त्याला मानसिक दुर्बल करण्यापेक्षा त्याला योग्य मार्गदर्शन करुन त्याच्या गरजेप्रमाणे आपण मुलाला शिकविले पाहिजे. तो जेथे असेल तेथूनच वर चढण्यास त्याला हात द्यायला हवा. जे विद्यावंत, प्रतिभावंत या भारत भूमीत निर्माण झाले, होऊन गेले, त्यांनी आपली बुध्दीमत्ता, प्रज्ञा कशी वाढविली ? जगाला ज्ञानामृत पाजण्यास ते कसे समर्थ झाले ? ह्या सर्व गोष्टींचं मूळ, आपलं आध्यात्मिक ज्ञान! त्यातीलच एक सर्व श्रेष्ठ 'सहजयोग साधना'.

आपल्याला आज अशा शिक्षणाची गरज आहे, साधनेची, उपासनेची, पठणाची गरज आहे. जे ज्ञान भारतभूमीत सर्वत्र पसरलेलं होतं, आपल्याकडून निर्यात केलं जातं होतं; परंतु आज आपलचं ज्ञान आपल्याला आयात करावं लागतं आहे. कोणतीही गोष्ट करा, शिका अथवा शिकवा! शिक्षणाचे सार म्हणजे मनाची एकाग्रता! उत्तम योग्यापासून ते निकृष्ट माणसापर्यंत सर्वांनाच ज्ञान प्राप्तीसाठी, मन:शांतीसाठी, सुखासाठी एकाग्रतेचं अवलंबन करावे लागते.

सामान्यत: माणसाची शेकडा ९० टक्के विचारशक्ती व्यर्थ खर्ची पडत असते; म्हणूनच त्याच्या हातून सारख्या चुका होत असतात. सद्‌गुरु भाऊ माऊली सांगते, ''आजच्या ह्या धावपळीच्या, जलद जगात जेथे माणसाला श्वास घेण्यास उसंत मिळत नाही, तेथे तो एकाग्र होणारच कसा? एकाग्र झालाच नाही तर सुख-समाधान ह्या फक्त व्याख्याच राहणार! त्या प्रत्यक्ष लाभणारच नाहीत. जेव्हा माणूस एकाग्र होतो तेव्हाच उत्तम काम करु शकतो, कारण उत्तम काम करण्यासाठी लागणारी सर्व शक्ती, सर्व इंद्रिये माणसाने कामाकडे वळविलेली असतात. म्हणून जीवनात एकाग्रता ही महत्वाची! साधी गोष्ट, नामजप! त्याने माणूस एकाग्र होतो. परंतु ह्या गोष्टी अनुभवाच्या आहेत. जेव्हा अनुभव येतो (अर्थात ज्ञान प्राप्त होणे) तेव्हाच माणूस शहाणा होतो. थोडक्यात हे सहज शक्य आहे, परंतु ते करायला वेळ कुणाकडे आहे?''

आपल्या सुदैवाने आपल्या पुर्वजांनी, ऋषीमुनींनी सुखी जीवन, समाधानी जीवन, शांतमय जीवन, यशानं भरलेलं जीवन यासाठी अनेक उपाय, असंख्य तोडगे आध्यात्मिक मार्गात निर्माण केले, सर्वांसाठी त्याचा वापर केला परंतु त्याचा फायदा कसा करुन घ्यायचा याचे अज्ञान, अजून तसेच आहे. ज्यांना माहित आहे ते कुठेतरी हिमालयात तप करीत आहेत, त्यांना या जगाचा संबंध नको आहे. जे संसारात आहेत, ते देऊ इच्छित नाहीत आणि जे हे ज्ञान खुलं करण्यासाठी तयार आहेत, देऊ इच्छितात ते कोणी घ्यायला तयार नाहीत. कारण तेवढा वेळ त्यांच्याकडे नाही.

सुदैवाने तसा अवलिया आम्हा पामरांना सद्‌गुरु भाऊ महाराजांच्या रुपात मिळाला आणि त्यांनी आध्यात्मिक ज्ञानाची भांडारं आमच्या समोर हळूहळू उघडी केली. त्या भांडारातून जे सर्वांना जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे, ते या सहजयोग साधना पायाभरणी या पुस्तिकेद्वारे भाविकांसमोर ठेवित आहोत, याचा मन:पूर्वक स्वीकार व्हावा.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**

# भाग पहिला



# गोविंद माधव गोपाळा

कृष्णाला सर्व गुणांनिशी पकडता आले पाहिजे. हापूस आणि बलसाड आंबा सारखा असतो. ज्याला ज्ञान नाही तो फसला जातो. तसंच कृष्णाचं आहे. मला जर कृष्ण धरायचा असेल तर तो सगुण आहे, ज्याच्याबद्दल मला ज्ञान आहे, ज्याला मी असा धरीन की त्याच्या गुणांनिशी आणि गुणांनिशी धरल्या नंतर काही काळाने माझ्या लक्षात येईल कृष्ण माझ्यामध्ये पूर्ण उतरला आहे.

# गोविंद माधव गोपाळा

माणसाचे जीवन हे तालबध्द आहे, किंबहूना सर्व गोष्टी तो एका विशिष्ट लयीत करीत असतो. जेव्हा काव्याला ताल-लय मिळतात (अर्थात ते स्वरबद्ध होतात) तेव्हा त्यात गोडवा निर्माण होतो. त्याच्या बरोबर तालात-मात्रात म्हटलेले स्तोत्र, मंत्र यातून ज्या शुद्ध लहरी निर्माण होतात, त्या आपल्या शरीरावर विशिष्ट परिणाम करतात.

आपण 'दिगंबरा दिगंबरा...' हा नामघोष लयीत, तालात म्हणतो अर्थात आपल्या मुखातून हा तालबद्ध घोष बाहेर पडतो, तो आपले कान श्रवण करतात. साहजिकच याची गोडी वाटून आपले मन फक्त ह्या नामघोषावर केंद्रित होते. जेव्हा मन पूर्णपणे एकाच गोष्टीवर लागून राहते तेव्हाच एकाग्रता प्राप्त होऊ लागते. नामघोषाने अनेक फायदे होतात. प्रथम मन एकाग्र होऊ लागते. एकदा एकाग्रता साध्य झाली की मानव कोणत्याही कार्यात यश संपादन करु शकतो. मनाला परमेश्वराच्या नामाची गोडी लागते. त्याच्या नामस्मरणाने आपल्या घरी पावित्र्य नांदू लागते. दुष्ट शक्तींचा घरात शिरकाव होत नाही आणि दुष्ट शक्ती घरात वावरत असतील तर त्या दूर होतात.

जेव्हा घरात पावित्र्य नांदू लागते तेव्हाच सुख, समाधान आपल्यासमोर हात जोडून उभी राहतात. परमेश्वर दर्शन आपल्याला होऊ लागतं, आपोआपच सिद्धी आपणास प्राप्त होऊ लागतात. परंतू सिद्धीच्या मागे आपण जाऊ नये; कारण माणूस त्या सिद्धीमध्येच अडकला जातो आणि इथेच माणूस आपल्या पारमार्थिक प्रगतीत मागे पडतो. कृष्ण चंचल आहे, तो एका जागेवर राहत नाही. स्थिर चित्र भजनातून पकडता येते, परंतू हे ही मानवाने पकडू नये, तर चलत चित्र पकडता आले पाहिजे. कृष्णाला सर्व गुणांनिशी पकडता आले पाहिजे. हापूस आणि बलसाड आंबा सारखा असतो. ज्याला ज्ञान नाही तो फसला जातो. तसंच कृष्णाचं आहे. मला जर कृष्ण धरायचा असेल तर तो सगुण आहे, ज्याच्याबद्दल मला ज्ञान आहे, ज्याला मी असा धरीन की त्याच्या गुणांनिशी आणि गुणांनिशी धरल्या नंतर काही काळाने माझ्या लक्षात येईल कृष्ण माझ्यामध्ये पूर्ण उतरला आहे.

कृष्ण तसा म्हटला तर, कुणाला निटसा कळला नाही. माझ्याकडे कुणी कुटुंब

येत होतं, त्यांचा एक मुलगा अपघातात मरण पावला. झालं, माझी निंदा सुरु झाली. भाऊंकडे आम्ही आलो आणि आमचा मुलगा गेला. मला कळत नाही, माझ्याकडे आलेला अमर होतो का ? आणि असं जर असतं तर माझ्याकडे रांगाच रांगा लागल्या असत्या. स्वतः कृष्ण आपल्या भाच्याला अभिमन्यूला वाचवू शकला नाही; घटोत्कचाला वाचवू शकला नाही, द्रौपदीच्या पाच मुलांना वाचवू शकला नाही. ही स्वतः कृष्णाची कथा आहे. परंतू कृष्ण या नामाचा महिमा, जो गात जातो तो संकटातून बाहेर पडतो. मी तर सामान्य माणूस. माझा हा जड देह गेल्यावर मी काम करु शकतो, कारण या जडदेहाला बरीच बंधने आहेत.

मी बऱ्याच वेळा सांगत आलो, तुम्ही आरतीला हजर राहा, जी स्तोत्रे पठण केली जातात त्यात सामील व्हा. जो काही भाग मी सांगतो अर्थात सहजयोग साधनेच्या संदर्भात, तो नीट ऐका. कारण मी जलद गतीने जात आहे. सूर्य हा कधीतरी अस्ताला जाणारच ! मी काही अमरपट्टा घेऊन आलो नाही. मी ज्या ज्या क्षेत्रात काम करीत होतो, तेव्हा तेव्हा माझी उपासना मी करीत होतो. माझे गुरु पी. अण्णास्वामी खूप श्रेष्ठ होते. त्यांना माहित होतं की हा माझा शिष्य खट्याळ आहे, तरीही तो काही काम करु इच्छितो; म्हणून ते सदोदित माझ्या मागे उभे राहिले. अनेक संतांच्या, सत्पुरुषांच्या भेटी त्यांनी मला घालून दिल्या. त्यांचं सर्व सामर्थ्य माझ्यामध्ये आहे असं मला वाटतं नाही, परंतू जे काही त्यांनी मला दिलं ते अजूनपर्यंत मी माझ्यामध्ये टिकवून ठेवलं.

आपणा सर्वांना सर्व शिक्षण देण्याची संपूर्ण व्यवस्था मी करुन ठेवली आहे. वाशिंदला जी सोसायटी निर्माण होत आहे, त्या ठिकाणी तलाव म्हणा, झाडी म्हणा, बागा म्हणा करायच्या आहेत. जसं जपानमध्ये प्रत्येक घरात जपानी लोक कृत्रिम बाग तयार करतात, कृत्रिम धबधबा उभे करतात, कृत्रिम डोंगर उभा करतात. ही 'कसण विद्या' आहे.

जपानी लोक निसर्गात विलीन होऊन निसर्गातील शक्ती पकडतात आणि ताजेतवाने होतात. खूप काम करतात. आपल्याकडे संप करतात म्हणजे काम बंद. परंतू जपानमध्ये संप म्हणजे खूप काम करणे. म्हणून मी जे काही करण्याचा प्रयत्न करतो आहे ते याचसाठी की 'कसण विद्या' म्हणजे काय ? निसर्गामध्ये कसे जावे ? त्यात विलीन कसे व्हावे ?

आपण मे महिन्यात एक महिना गावी जातो. खूप गरमा असून सुद्धा आपण जातोच! का? गावच्या त्या निसर्गात आपण विलीन होतो. पूर्ण ताजेतवाने होतो. उत्साह वाढतो आणि पुन्हा त्याच उत्साहाने कामाला लागतो. तुम्हांला या सर्व गोष्टींकडे घेऊन जाण्याचा माझा हेतूच असा की तुम्हांला तुमचे मागील जन्म-पुढील जन्म कळावेत. तुमचं प्रारब्ध तुम्हांला बदलता यावे. तुम्ही जे प्रारब्ध म्हणता ते आपल्याला सहजयोग साधनेने (सहजयोग साधनेत अनेक पायऱ्या आहेत, त्यातील एक कसण विद्या तुम्हांला सांगितली) बदलता येते, पाहिजे तसे घडवता येते.

आपल्या जीवनात कोणतीही गोष्ट घडत असते, ती हेतूपूर्वकच घडत असते, त्यापाठीमागे कारण असल्याशिवाय ती घटना घडत नाही. ते कारण आपल्याला ज्ञात नाही. संपूर्ण जग हे कारण-परिणाम या साखळीने जोडलं गेलं आहे. मी तुम्हांला जे काही करायला सांगतो, विशेषतः साईसच्चरित्र पारायण, श्रीगुरुचरित्र पारायण, अथर्वशिर्ष, श्रीगुरुगीता पठण इत्यादी, त्याने तुम्हांला आपोआपच अनेक सिध्दी चिकटतात. मी करायला सांगितलेल्या उपासनेने दुसऱ्यांची दुःखे समजली जातात, त्या दुःखाची कारणे समजू लागतात. त्यावर काय उपाय योजना करायच्या याचं ज्ञान होतं. मी तुम्हांला विक्षिप्त शास्त्र शिकविण्यास तयार आहे. आज तुम्ही माझ्यावर लोभ करणारे त्या शास्त्रामुळे कदाचित माझा द्वेष करु लागाल, मला सोडून जाल!

आपणास जे शास्त्रीयदृष्ट्या माहित असावं लागतं, ते माहित नाही. कुंतीला पांडव कसे झाले? श्रीविष्णूच्या नाभीतून बारीक गेलेला देठ, त्यावर ब्रह्मदेव बसलेला आहे, हे गणित कसं? ह्याची शास्त्रीय उत्तरे देता येणार नाहीत. व्यास हे स्वतःला ब्रह्मचारी म्हणवणारे तरीही ते धृतराष्ट्र, पंडू, विदूर यांचे पिता आहेत. हे कसं काय? पूर्वीचा असा नियम होता की, अंगाला तूप लावणे! याचा अर्थ असा, अंगाला तूप लावून वासना जाळून टाकणे. फक्त हेतूपूर्ती करावी. हे शास्त्र आम्हांला अवगत नाही. हे शास्त्र पाश्चात्यांनी जोपासलं! आम्ही आपले आहोत तसे आहोत. काय करायचं आपल्याला? आपण आपलं ज्ञान जोखून घेतलं पाहिजे. ते प्राप्त करुन घेतले पाहिजे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# स्पंदने

लहरी म्हणजे काय ? कंपण म्हणजे काय ? स्पंदन म्हणजे काय ? ध्वनी लहरींची स्पंदने आहेत, ही स्पंदने कशा कशांमध्ये आहेत ? ही स्पंदने शिव-पार्वतीमध्ये आहेत का ? हे शास्त्र मी शिकवतो.

# स्पंदने

शब्दामध्ये घर्षण विद्युत कशी असते? या घर्षण विद्युतचा वापर कसा करायचा? कोणत्या ट्रान्सफॉर्मर मार्फत आपल्यातील विद्युत शक्ती दुसऱ्याकडे पाठवू शकतो? तेही तारे शिवाय! लहरी म्हणजे काय? कंपण म्हणजे काय? स्पंदन म्हणजे काय? ध्वनी लहरींची स्पंदने आहेत, ही स्पंदने कशा कशांमध्ये आहेत? ही स्पंदने शिव-पार्वतीमध्ये आहेत का? हे शास्त्र मी शिकवतो. जेव्हा हे शास्त्र तुम्हाला समजू लागेल, उमजू लागेल तेव्हा मी शिकविलेली साधना तुम्हांला, जी आज विक्षिप्त वाटते ती वाटणार नाही.

कोणे एके काळी, लोक म्हणायचे देवीची लस टोचल्यावर देवी येत नाही. हे खरं कशावरुन? म्हणून मुलांना लस टोचायला घेऊनच जायचे नाहीत. परंतू ते सत्य आहे. उत्तर-दक्षिण झोपल्यावर शरीरातील पेशी ह्या राक्षसी पेशी होतात, विकृत होतात आणि त्याच्यातून कॅन्सर निर्माण होतो. ही गोष्ट सिध्द झाली आहे. हे विक्षिप्त वाटतं परंतु ते सत्य आहे. मी तुम्हांला असं सांगतो; तुम्ही रबरी सोल असलेली चप्पल सामान्यत: वापरु नका. एड्स वगैरे रोग चप्पलांचे सोल बरोबर नसल्यामुळे झालेले आहेत. रबरी सोल हे विद्युत शक्ती रोखतात. आपल्या शरीरात निर्माण होणारी विद्युत शक्ती जमिनीत रबरामुळे जात नसल्यामुळे ती अंगातच खेळत राहते आणि त्यामुळे अनेक आजार निर्माण होतात. अशी बरीच कारणे आहेत. आता त्याचे शास्त्रीय संशोधन बाहेर येत आहे. हे आपल्याला कळलं पाहिजे.

मी श्रावणामध्ये रुद्र शिकवितो आणि रुद्र मंत्र घेतो. हे रुद्र मंत्र म्हणजे नक्की काय गणितं आहे? रुद्र, शिव म्हणजे काय? आज सगळीकडे शिवपिंडी आपल्याला दिसते. असं का? सर्व जगामध्ये 'महावीर' असं शिवाला मानलं जातं, असं का? महादेव म्हटलं जातं, महादेव म्हणजे देवांचा देव! देव याचा अर्थ दिव्यत्वाचा नमुना. दिव्यत्वाचे प्रतिक म्हणजे दिव्यत्व (सुपर ह्युमन). मानवी शक्तीच्या पलिकडील शक्ती; अशा त्या देवांचा देव, महादेव, हे काय गणित आहे? आणि पिंडी हे काय गणित आहे? ती उत्तर-दक्षिण का ठेवली जाते? त्याचं कारण काय?

कोणे एके काळी शिवपिंडी मध्ये चार-चार मुखे त्याकाळच्या अनेकांनी पाहिलेली आहेत. ती ही चार दिशेला चार. हे काय गणित असावं ? १९७२ च्या आसपास 'नॉवेल' नावाच्या शास्त्रज्ञानाने एक निबंध प्रसिध्द केला. त्या निबंधात त्याने असं म्हटलं सुमारे १००० कोटी वर्षापूर्वी विश्वाची निर्मिती झाली असं त्याला वाटतं.

आजपासून सामान्यत: असं म्हणू १२००० वर्षापूर्वी मैत्रेय नावाचा ऋषी या भारतामध्ये होऊन गेला. त्याने ३७४४ कोटी वर्षापूर्वी विश्वाची निर्मिती झाली, असं मांडलं. त्यात त्याने असे मुद्दे नमूद करुन ठेवले की या जगामध्ये सत्-असत् काही नाही. सत् म्हणजे असणे, असत् म्हणजे नसणे. असणे ही नव्हते, नसणे ही नव्हते. जगामध्ये सगळीकडे अंधार होता. त्याच्यानंतर जे तेजोगोल निर्माण झाले ते पुढे फूटू लागले आणि त्याच्यातून अनेक तारे निर्माण झाले. त्यातून सूर्य हा तारा निर्माण झाला. त्याच्यानंतर कंपनं किंवा स्पंदन निर्माण झाली किंवा शब्द निर्माण झाला. ज्या ज्या ठिकाणी कंपनं आहेत, स्पंदनं आहेत, लहरी आहेत त्या त्या ठिकाणी जे निर्माण होतं त्याला आपण म्हणतो शब्द, त्याला आपण म्हणतो आकाशतत्व.

हे विश्व निर्माण झालं, ज्या विश्वामध्ये जे तेजोगोल निर्माण झाले ते कालांतराने थंड होऊ लगले. थंड होऊ लागल्यानंतर थंडपणातून जीव, क्रोमसोम म्हणजे सत्व, रज, तम गुण निग्लीअस निर्माण झाले. हे सर्व शिव असं मानलं गेलं. जो शिव आपल्या इच्छेने निर्माण झाला, आपल्यातून त्याने अनेक निर्माण केले. त्यातून त्याने निर्माण केलेला महाशिव, महादेव. महादेवाने निर्माण केला विष्णू. विष्णूने निर्माण केला तो कमळाच्या देठावर बसलेला ब्रह्मदेव. हा कमळाचा देठ अतिशय नाजूक, जो सहज तुटेल असा. जे सर्व निर्माण झालं, ते शिवाच्या कल्पनेत लपलेलं आहे. किती महान कल्पना आहे. हे आपल्याला समजू लागेल.

शास्त्र असं सागतं की सर्व जगामध्ये सजीव-निर्जीवामध्ये असतो तो 'अणू'. या अणूमध्ये जो बाहेरचा भाग असतो त्याला आपण म्हणतो 'इलेक्ट्रॉन'. आतला जो भाग तो 'प्रोटॉन' व 'न्यूट्रॉन'ने एकत्रित असतो. आपल्याला माहित आहे की इलेक्ट्रॉन हे ऋणभारीत आहेत आणि प्रोट्रॉन हे धनभारीत आहेत. न्यूट्रॉन

याच्यावर कसलाही परिणाम नाही. यालाच मैत्रेय ऋषींनी म्हटले आहे 'फसरेणू'. फस म्हणजे जीव. प्रोट्रॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉन म्हणताना म्हटलं गेलं रेणू. रेणू पासून शब्द झाला रेणूका. रेणूका म्हणजे आदिमाया. सर्व विश्वामध्ये फिरणारे जे इलेक्ट्रॉन; हे इलेक्ट्रॉन म्हणजेच माया. एका इलेक्ट्रॉन मधून दुसरे इलेक्ट्रॉन जातात आणि इलेक्ट्रॉनचे अनेक भेद निर्माण होतात, त्यातून विश्व निर्माण होतं.

प्रत्येक इलेक्ट्रॉनमध्ये मुलद्रव्ये वेगवेगळी आहेत, म्हणून वेगवेगळ्या वस्तू निर्माण झाल्या. अनेक मुलद्रव्यांचा संयोग होऊन त्यातून अनेक वस्तू निर्माण झाल्या. जे इलेक्ट्रॉन फिरतात त्याच्याभोवती निर्माण झाली साळुंकी! इलेक्ट्रॉन फिरण्याची कक्षा ती साळुंकी. संपूर्ण विश्वाची कक्षा ही लंबगोलाकार आहे. सारं विश्वच लंबगोलाकार आहे. आकाशगंगा लंबगोलाकार आहे. असं आईनस्टाईनच म्हणतो. म्हणून विश्वाची रचना झाली ती सुद्धा लंब गोलाकार, लांबट गोल. शिव हे प्रतिक मानलं आहे. प्रतिक कशाचं? भोवती फिरणारे इलेक्ट्रॉन आणि मध्यावर असणारे न्यूक्लिअस म्हणजे शिव! म्हणताना असं म्हणतात शिव हा अजिंक्य आहे. हे विचारात घेता येते.

नॉवेल हा शास्त्रज्ञ म्हणतो, जेव्हा तेजाचा स्फोट झाला, त्या स्फोटात थोडी जरी चूक झाली असती, तरी विश्व निर्माणच झालं नसतं. मैत्रेय म्हणतो जेव्हा सत्-असत् नव्हतं, त्या काळात आपणहून ठरवून ते फुटलं आणि त्यातून विश्व निर्माण झालं. तोच शिव! आपणहून फुटणारा तो शिव! या शिवामधून चित्र साकारण्याचा प्रयत्न झाला. आपण जर बारकाईने शिवपिंडीकडे पाहिले तर कळेल की शिवपिंडीवर जे गंध लेपन केलं जातं, ज्या तीन रेघा असतात, त्या जोडलेल्या असतात, त्यांना 'त्रिपूंड' असं म्हणतात.

जे सायन्स शिकतात, त्यांना माहित असेल की आरएनए (RNA), डीएनए (DNA) कसं असतात; तर ते बरोबर स्पायरल सापासारखे असतात. हे जे शिडीसारखे दिसते त्याला आपल्या पूर्वजांनी म्हटले कुंडलिनी शक्ती. योगाप्रमाणे दगडावर मांडले ते म्हणजे सापाचं युगुल. ह्या स्पायरल शिडीसारख्या सापाच्या आकाराला म्हणतात, 'कुंडलिनी शक्ती'. याचाच भाग आला तो नर आणि मादी. नर आणि मादी याचा अर्थ आरएनए (RNA) म्हणजेच जे कोणी

सजीव आहेत त्याची निर्मिती आरएनए मधून झाली. ते एक ॲसीड आहे. म्हणून त्याला आपल्या पूर्वजांनी म्हटलं आहे, शिव हा उग्र आहे. आरएनए हे जे मूल सूत्र आहे त्याला म्हटलं आहे वंशाकार. म्हणजेच एका आरएनए मधून दुसरा, तिसरा, चौथा निर्माण होतो; आणि सर्व निर्माण होत असतात ते आपोआपच निर्माण होतात. म्हणून शिवाला म्हटलेलं आहे 'वंशकर' अर्थात आपल्यातून दुसरा निर्माण करणारा.

अनेक आरएनए (RNA) मधून निर्माण होते पेशी. सजीवातील सूक्ष्मात सूक्ष्म गोष्ट पेशी. अशा अनेक पेशींनी निर्माण होतो मानव. या सर्वांसाठी आपल्यासमोर जे चित्र उभं केलं गेलं ते पंचमुख शिव.

मी जेव्हा तुम्हाला सूक्ष्म देह धारणेचं शिक्षण देणार आहे, त्यात तुमच्या सूक्ष्म देहाला, तुमचा जडदेह धरुन ठेवतो त्यातसुध्दा कमळाचा देठ येतो, त्याला सिल्व्हर कॉर्ड म्हणजे चंदेरी तार म्हणतात. हा सिल्व्हर कॉर्ड अतिशय धोकादायक विषय आहे. तो नीट राखला पाहिजे. जेव्हा मी ह्या सूक्ष्मदेह धारणेचा विषय तुम्हांला शिकवीन तेव्हा त्याचं गुपीत राखलं पाहिजे. हे गुपीत कुणाला कळलं आणि तो तुमचा शत्रू असेल तर तो तुमचा जडदेह व सूक्ष्म देह तोडू शकतो.

सिल्व्हर कॉर्ड म्हणजे ब्रह्मदेव बसला आहे ते कमळ आणि विष्णू म्हणजे तुमच्या जडदेहाला जोडणारी नाळ आहे. (मूल जन्माला येते त्यावेळी कापली जाते ती नाळ नव्हे). ही अदृश्य नाळ आहे. ही नाळ जर कापली गेली, तर जड देह आणि सूक्ष्म देह शिल्लक रहात नाहीत. सांगण्याचे माझे प्रयोजन असे की जो विष्णू किंवा जो ब्रह्मदेव, या ब्रह्मदेवाला जोडणारी किंवा सूक्ष्म देहाला जोडणारी जी नाळ आहे, तो हा कमळाचा देठ.

माणूस जेव्हा सूक्ष्मदेह धारणेची प्रक्रिया करु लागतो तेव्हा आकर्षून धरणारा भाग अस्तित्वात येतो. म्हणून शिवपिंडी ही समजून घेताना शिवपिंडीमध्ये असलेलं जे गणित आहे, त्यात फिरणारे इलेक्ट्रॉन्स आहेत जे आकर्षित करुन ठेवतात, त्यातला अर्थ आपल्याला धरता आला पाहिजे. तो रुद्रामधून धरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी जे म्हणालो, आपल्यात इलेक्ट्रॉन्स आहेत ते वाढवायचे कसे? आपल्यात असलेले इलेक्ट्रॉन्स् दुसरीकडे नेऊन नवीन गोष्ट कशी

निर्माण करायची ? हे मला कसे शक्य आहे ? त्यासाठी आपलीच असलेली वेगवेगळी शास्त्रे आपल्याला शिकायला हवीत. तुम्हांला योगासने शिकविणारे प्राणायाम काय आहे, हे व्यवस्थित सांगत नाहीत.

आपल्या शरीरात असणारा अपानवायू प्राणायामाद्वारे कसा वाढवायचा ? आपण एखादी वस्तू डब्यात भरुन ठेवतो पण पूर्ण गच्च भरुन ठेवत नाही, तर थोडी हवा जावी अर्थात थोडी पोकळी रहावी अशी आपण व्यवस्था करतो. तसंच देवाने काय केलं आहे ? ही देहाची पेटी उत्तम टेलर कडून (बाहेर उत्तम अस्तर टाकून) शिवून घेतलेली आहे. ते अस्तर आपण महागड्या साबणाने (टि.व्हीवर उत्तम प्रसिध्द माध्यमाद्वारे दाखविलेला साबण) धुतो. महागडी क्रिम वापरतो, आणि अधिक नीटनेटके करतो. परंतू आतमध्ये जी स्वच्छता पाहिजे ती आपण करतो का ? नाही ! नको ते खातो, कधी कधी जास्तही खातो, पोट बिघडवतो आणि डॉक्टरकडे औषधासाठी पळतो. अर्थात शरीरात जे काही बदल होत असतात त्याने आतील इंद्रिये खराब होत असतात हे आपल्याला कळत नाही.

जशी एखादी उशी बऱ्याच दिवसांनी फोडली असता त्यातील काळा काळा कापूस आपण बाहेर काढतो तशी आपल्या आतील भागाला आपण नीट न ठेवल्यामुळे उशीतील कापसासारखी परिस्थिती होते. शरीरात ज्या वस्तू ठेवलेल्या आहेत त्यात हवा आहे अर्थात आत सभोवती कुठेतरी पोकळी आहे. म्हणजेच आकाशतत्व आहे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# आकाशतत्व

मंत्रामध्ये असलेली भाषा आणि आपण बोलतो ती भाषा यात खूप फरक आहे. तुम्ही खूणा केलेली भाषा आणि खूणा न करता केलेली भाषा याच्यामध्ये फरक आहे. याच्याही पलीकडे एक भाषा आहे ती म्हणजे जी न बोलता दुसऱ्याला कळत असते. त्या भाषेमध्ये जी भावना लपलेली असते, जो भाव लपलेला असतो, तो दुसऱ्याला कळत असतो. आणि हा भाव, ही भावना सुरात लपलेली असते.

# आकाशतत्व

शरीरात ज्या ज्या वस्तू ठेवलेल्या आहेत तेथे पोकळी आहेच आणि त्यात हवा भरलेली आहे. म्हणजे आकाशतत्व आहे. आकाश तत्व याचा अर्थ आवाज (Sound) असा आहे. ज्या ठिकाणी कंपनं निर्माण होतात, त्या ठिकाणी शब्द निर्माण होणारच. आवाज निर्माण होणारच. आपल्या पोटामध्ये, हृदयामध्ये, फुफ्फुसामध्ये, आतड्याच्या आत, आतड्याच्या बाहेर सगळीकडे हवेची एक पोकळी आहे. तुम्ही म्हणाल असं कसं असू शकेल ?

सोपी तर गोष्ट आहे. तुम्ही जेव्हा भात खाता तेव्हा त्याची शिते दाबून खात नाहीत. त्या अनेक शितांमध्ये थोडी थोडी पोकळी असतेच. त्या पोकळी बरोबर हवा आतमध्ये जातच असते. असं नाही की, तुम्ही हवा फिल्टर करुन अन्न आत टाकता. अन्नबरोबरच हवा आत जाते. जी हवा आत गेलेली असते, ती आतड्यात राहते. ही आत आतड्यामध्ये गेलेली हवा आहे, तिला आपण प्राणवायू म्हणतो. कधी कधी आतमध्ये आतड्यात हवा जास्त गेली आणि बाहेर कमी राहिली तर एका बाजूला पोट गच्च रहाते तर दुसऱ्या बाजूला लबलबीत. समजायला सोपं. जेव्हा आपण फुगा फुगवतो, तेव्हा फुग्यात ज्या बाजूला हवा जास्त जाते त्या बाजूला तो फुगा टुमटुमीत होतो. हे जे सर्व गणित आहे ते आपल्याला नीट करायचं आहे. हवेच्या कमी जास्त प्रमाणाने आतील इंद्रियांमध्ये जे घर्षण होते त्याने रक्तवाहिन्या प्रसरण पावू लागतात. रक्तप्रवाह कमी जास्त घर्षणाने कमी जास्त वाहू लागतो, यालाच आपण म्हणतो घर्षण विद्युत !

घर्षण विद्युताने शरीरातील रक्तवाहिन्या दिशा बदलतात. आपल्याला हव्या त्या ठिकाणी रक्तवाहिन्या आणायच्या आहेत, त्या सर्व रक्तवाहिन्यांचा (ओघ वा प्रवाह) मेंदूमध्ये असणाऱ्या (Flagu) या भागाकडे आणायचा आहे. जेव्हा या रक्तवाहिन्या आपण या (Flagu) कडे पाठवू लागतो, तेव्हा अभ्यास करु शकतो. हवं तेव्हा वाचन करु शकतो. यासाठी मला प्राणायामाची मदत घ्यायला हवी. प्राणायाम शिकल्यानंतर मंत्रांची मदत घ्यायला हवी. कारण शरीरात जी हवा, ज्या पोकळीमध्ये भरलेली आहे, ज्याने कंपनं निर्माण होतात, आवाज निर्माण होतो, तो मंत्राने आपल्याला योग्य करायचा आहे, अशा तऱ्हेने की, आपलं शरीर, आपली

बुध्दीमत्ता, आपला जडदेह, सूक्ष्म देहामध्ये रुपांतरीत करुन जो शिव या सर्व विषयात भरुन राहिलेला आहे, त्याकडे आपला सूक्ष्म देह घेऊन जायचा आहे.

यश हे यत्नावर अवलंबून नाही तर प्रयत्नावर अवलंबून आहे. आपण जे काही पदार्थ घरी करतो तेच कॅटरींग कॉलेजमध्ये शिकविले जातात. त्यात एक तास त्याबद्दल भाषण दिलं जाते. कोणतीही गोष्ट पध्दतशीत केली म्हणजे त्याच्या पायऱ्या आहेत, एक दोन, तीन, चार इत्यादी. त्याच पद्धतीने करणे. रामभरोसे नाही, त्यालाच आपण म्हणतो प्रयत्न. आपण नुसताच करतो तो यत्न; कशा तरी टोपल्या टाकणं आणि खूप काही केलं, असं म्हणणं संयुक्तिक नाही.

एक गंमत म्हणून सांगतो, माझ्याजवळ असा प्रश्न केला जातो की आमची मुलं 'ढ' आहेत, त्यांना हुशार करा. एक लक्षात ठेवा, कुठल्याही औषधाने किंवा रसायनाने माणसाच्या बुध्दीमत्तेत वाढ होत नाही. थोडासा रक्तप्रवाह वाढतो. ताजेतवाने झाल्यासारखे वाटते. परंतु त्याच्या स्मरणशक्तीत वाढ होतेच, असं नाही. जे सायन्स मी आपल्याला शिकवणार आहे ते म्हणजे आपल्या शरीरात जी विद्युत निर्माण होते, त्या विद्युत शक्तीची केंद्रे कोणती ? ही विद्युत शक्ती काम कशी करते ? मी एक मुद्दा सांगतो, पालकांनी आपल्या बालकांकडून ते करुन घ्या.

मुळात आपण जे काही वाचतो ते चुकीच्या पध्दतीने वाचतो. वाचताना पुस्तक कसं धरावं ? आणि कसं वाचावं ? त्याचे एक शास्त्र आहे. मनन हा एक वेगळा भाग आहे. पुस्तक धरताना डावा हात वापरावा. अंगठा आतल्या बाजूला आणि पहिली दोन बोटे, (तर्जनी व मध्यमा) यामध्ये पुस्तक पकडावे. अनामिका व करंगळी पुस्तकाला लागता कामा नये. याच्यातून जाणारी विज किंवा विद्युत ही नलिक पाया नाहीसा करणारी आहे. तुमचा मेंदू कॉम्प्युटराईजड् आहे. या कॉम्प्युटर मेंदूमध्ये दोन बोटे व अंगठा, तुम्ही जे वाचना कराल, ते वाचन कॉम्प्युटराईज करणार आहेत म्हणजेच अधिक खोल नोंदणार आहेत. अनामिका आणि करंगळी ही दोन बोटे तुम्ही पुस्तकाला चिकटवलीत तर ते वाचलेले पुसून टाकणार आहेत. तुम्ही नेहमी बघा, बऱ्याच मुलांच्या वाचलेलं लक्षात रहात नाही; ते अशा पध्दतीने वाचत नाहीत. मेंदूचा द्रोल्क (येथे वाचलेले, पाहिलेले संग्रहीत होते.) नावाचा जो भाग

आहे, या भागाच्या संदर्भातच वाचन झालं पाहिजे.

काही ठिकाणी याचं योग्य शिक्षण दिलं जातं. काही ठिकाणी नाही. जी काही शिक्षण पध्दती आहे, त्यात प्रेशरचा भाग आहे. प्रेशर कसं द्यावं आणि आपल्या शरीरात विद्युत कशी वाढवावी, हे एक शास्त्र आहे. यातील बराचसा भाग गुप्त इंद्रियाशी संबंधित आहे. बरेचसे विद्यार्थी असं सांगतात माझं अभ्यासाकडे लक्ष लागत नाही. सुंदर मुली स्वप्नात येतात, इत्यादी इत्यादी. ते काही वाईट असं नाही; कारण ते नैसर्गिक आहे. त्याच्याबद्दल खंत बाळगण्याचे कारण नाही. परंतु त्या मुलाची जी एनर्जी फुकट जात असते, ती आपण चानलाईज् करायची म्हणजे योग्य दिशेने आणायची.

समजायला सोपे आहे. तुम्ही पातेल्यामध्ये काही करा आणि तेच कुकरमध्ये करा. फरक पटकन समजेल. पातेल्यामध्ये उष्णता फुकट जात असते. तीच कुकरमध्ये एक कण फुकट जात नाही. हाच गुणधर्म आपण वापरायचा. माझ्याकडे असलेली एनर्जी मला एकाच कामासाठी वापरायची आहे. जे मी काम योजले आहे त्याच ठिकाणी मन एकाग्र करायचे आहे. मनामधील शक्ती एकाग्र करायची आहे. थोडक्यात मन आणि शरीर या दोघांमध्ये नांदणारी विद्युत शक्ती एकाच ठिकाणी कामाला लावायची आहे. वस्तूतः हे शास्त्र मी स्वतः बऱ्याच अंशी केलेले आहे.

पाश्चात्य लोकांनी या शास्त्राचा वापर केला. पाश्चात्य लोक बँड, संगीत, मैदानी खेळ, परेड इत्यादी सर्व गोष्टी करतात. या सर्वांमध्ये रिदम आहे. तो चालू लागला तरी एका रिदम मध्येच चालणार आणि आपण कसे चालतो ? तुमचे तुम्हीच बघा. चालण्यामध्ये, बोलण्यामध्ये, कामामध्ये, खेळामध्ये जो रिदम आहे, तो पंचतत्वामध्ये जे सर्वात सूक्ष्म तत्व (आकाशतत्व) त्यात आहे! त्याचे मूळ लक्ष किंवा खुण म्हणजे शब्द होय! मंत्रामध्ये असलेली भाषा आणि आपण बोलतो ती भाषा यात खूप फरक आहे. तुम्ही खूणा केलेली भाषा आणि खूणा न करता केलेली भाषा याच्यामध्ये फरक आहे. याच्याही पलीकडे एक भाषा आहे ती म्हणजे जी न बोलता दुसऱ्याला कळत असते. त्या भाषेमध्ये जी भावना लपलेली असते, जो भाव लपलेला असतो, तो दुसऱ्याला कळत असतो. आणि हा भाव, ही भावना सुरात लपलेली असते.

माणूस जे बोलतो तो समोरचा मनुष्य योग्य तऱ्हेने ऐकतोच असं नाही, आणि त्याचा योग्य अर्थ करतो असं बिलकूल नाही. समजा, माझ्या बाजूला एक मुलगी राहते तिला मागणी आली. ज्यांच्याकडून आली ते समजा माझ्या परिचयाचे आहेत. त्यांनी मला विचारले, तुला ती मुलगी आमच्या ....ला कशी वाटते ? मी असं म्हणालो, ''जगात आणखी मुली नाहीत.'' झालं लग्न मोडलं. मी त्या मुलीला वाईट म्हणालो नाही. परंतु जी भाषा वापरली त्या भाषेने त्या मुलीचं लग्न मोडलं. किती चमत्कारिक प्रकार होतो. तेव्हा शब्द, खूणा या बराच गोंधळ घालतात, आणि गैरसमज निर्माण होतात.

शब्दाची भाषा ही तितकीशी खरी नाही. परंतु ''सुरांची भाषा ही खरी आहे.'' आकाशतत्व एकच गुण देते शब्द, श्रवण. शब्दाचा संबंध कानाशी येतो. आपल्या पूर्वजांनी सांगितले आहे, श्रवण श्रेष्ठ. मी जेव्हा तुम्हांला नामजप देतो तेव्हा नामजपामध्ये तुम्हीच नाम म्हणायचं आहे आणि तुमच्याच कानांनी ऐकायचं आहे. हेतू असा की शब्द म्हणजे आकाशतत्व तुमचा तुम्हीच पकडायचा. एक जीभेला चांगली सवय लावायची. कानाला एकाग्रतेची सवय लावायची, आणि (आकाशतत्व) - शब्द ऐकायचा. आकाशतत्व पकडायला शिकलात की, आपला सूक्ष्म देह आपण कुठेही नेऊ शकता! हा सुक्ष्मदेह खूप चांगलं काम करु शकतो. थोडक्यात आकाशतत्व धरता आलं पाहिजे. यासाठीच एकाग्रता साध्य झाली पाहिजे. म्हणूनच मी नामजपाचा, पारायणाचा मार्ग सांगतो. एकाग्रता झाली नाही तर कोणतीही गोष्ट साध्य होत नाही.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सर्व भाविक मंडळींना माझे सांगणे आहे की, माझ्याकडे अनुग्रह घ्यायला याल त्यापूर्वी माझे खाजगी जीवन, सार्वजनिक जीवन याची पूर्ण माहिती करुन घ्या. कारण आजकाल कोणीतरी कुठल्यातरी गावावरुन येतो आणि बाबा म्हणून आपलं दुकान खोलून बसतो. हे तुम्हांला ऐकून माहीत आहे.

माझ्या जन्मापासून इत्यंभूत माहिती तुम्हांला असायला हवी. मी जो जन्माला आलो तो बाबा म्हणून नाही. हा गाढवपणा आहे. साटम महाराज कामाठीपुरात रहात असत. त्यांचे दारुचे गुत्ते होते. स्वतः दारु पीत असत. हातात सुरा घेऊन

दादागिरी करीत असतं. जेव्हा ते पश्चातापदग्ध झाले तेव्हा त्यांना कुणीतरी सत्पुरुष भेटला आणि त्यांचा मार्ग बदलला. त्यांचे शिष्य भालचंद्र महाराज. त्यांचा प्रसाद मला मिळाला आणि मी बदलून गेलो.

माझं जीवन काय आहे ? मी चमत्कार करतो की नाही ? मी काय शिकवतो ? त्याचा फायदा किती जणांना झाला, की झाला नाही ? याबद्दल पूर्ण माहिती आपणास असायला हवी. वागणूकीमध्ये मी बऱ्याचवेळा विक्षिप्त आहे; ते का ? हे बऱ्याच वेळा आपणास पटकन समजणार नाही. मानव हा जगामध्ये अनेक नात्याने खेळत असतो. वागत असतो. कृष्ण हा वसुदेव देवकीचा सत्यपुत्र, यशोदेचा, नंदाचा पाळीतपुत्र, राधेचा शिष्य, राधेचा मित्र, रुक्मिनी, सत्यभामा, जांबूवती इत्यादींचा पती, अर्जूनाचा सखा, द्रौपदीचा मानल्यापेक्षाही श्रेष्ठ भाऊ! ही सर्व नाती गुंतागुंतीची आहेत. तरीही त्या सर्व नात्यानिशी भगवान कृष्णाने प्रवास केला.

मानव जगामध्ये जगत असताना, अनेक नात्यांमध्ये गुरफटलेला असतो ? ही नाती नाजूक असतात, ती कैचीने कापता येणारी नाहीत. या सर्वांशी माणूस प्रवास करीत असतो. हे सर्व नियतीने दिलेलं असतं. सद्गुरु त्याला वेगळ्या अर्थाने मदत करीत असतात. मी सर्व यासाठीच सांगतो आहे की, गुरुपौर्णिमेनिमित्त सर्वांनी माझी सखोल चौकशी करा, घाई करु नका. कारण पुढीलही गुरुपौर्णिमा उपलब्ध असेल. माझ्या म्हणण्याचा रोख असा की '' गुरुंबद्दल पूर्ण चौकशी करुन नंतरच गुरु करावा.'' आणि एकदा शिष्यत्व घेतलं की वाटेल तेव्हा तोडावे असं करु नये. ते बरोबर नाही. तुमचं माझं जेव्हा नातं निर्माण होईल, तुम्ही संकट काळात केव्हाही हाक माराल, तेव्हा मी तेथे हजर होईन. त्यासाठी तुमचं माझं नातं जुळायला हवं. ज्या गुरुंचा जो शिष्य, त्या गुरुंची ती जबाबदारी असते.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# पांडुरंग - योगपीठ

शंकराचार्यांनी पंढरपूरला योगपीठ म्हटलेलं आहे. योगपीठ म्हणजे शिवकुंड! कारण पांडुरंगाच्या मस्तकावर शिवलिंग आहे. पंडरींगे, पांडुरंग हे शंकराचे एक नाव आहे. पंचमुखी हा शिव आहे. चार दिशेला चार मुख आणि वरती (उर्ध्व दिशेला) एक मुख. हे पांढरे आहे. म्हणून त्याला पांडूरंग म्हणतात, असं सर्व संतांनी मांडलेलं आहे.

# पांडुरंग - योगपीठ

कोण एके काळी मी पंढरपूरला गेलो होतो, साल होतं १९५४! मला सांगायला वाईट वाटते, विठ्ठलाला न भेटता मी परत आलो? पंढरपूकडे जाईपर्यंत मला ओकाऱ्या सुरु झाल्या. का? घाण येत होती. त्याच पंढरपूरला मी दिंडीतून गेलो! पंढरपूर तेच होतं. स्वच्छ झालं नव्हतं. आता आता कुठे स्वच्छ झालं आहे. परंतू त्या दिंडीत मला ज्ञान प्राप्त झालं, विठ्ठल पंढरपूरात असेल की नाही पण दिंडीत मात्र नक्कीच आहे. अर्थात संत समागम! माझ्या कोणी नात्यातले, ना सगेसोयरे त्या दिंडीत होते, त्यांच्या सोबत मला विठ्ठल मिळाला. मला बाबा म्हणून खाऊ घातले, मला झोपायला चादर दिली. ''मला विठ्ठल भेटला तो त्या दिंडीत''.

मग वारकरी म्हणजे नक्की काय? तर त्याच्या स्वभावाने तो वारकरी! तो वारी करतो म्हणून तो वारकरी नाही तर आठवड्याच्या सात वारात विठ्ठल आहे, सातही वार विठ्ठलमय आहेत असं म्हणतो तो वारकरी! या दिंडीतूनच मी बदललो. जेव्हा मी माझ्या सहकाऱ्यांना घेऊन गाणगापूरला जाऊ लागलो तेव्हा सुगंध आमच्या आजूबाजूला दरवळत असे. म्हणजे परमेश्वराच्या दर्शनाला जाताना, त्याच्या स्थळी जाताना परमेश्वरमय होऊन जावं, त्याचं नाम घेत जावं. त्यात जो आनंद मिळतो, ताजेपणा मिळतो, त्याने आपली चिंता दूर होते. आपण न खाता, न पिता ताजेतवाने होतो, हे आपल्याला जाणवते. आपण जे रिफ्रेश म्हणतो, (शरीराला दिलेली विश्रांती ते रिफ्रेश नव्हे) त्याच्याही पेक्षा वेगळा रिफ्रेश मिळतो. गंमत म्हणून तुम्हांला एक ऐतिहासिक कथा सांगतो;

अकलूज हे पंढरपूरजवळ गाव आहे. तेथे औरंगजेबाची छावणी होती. तेथे औरंगजेब असताना त्याने या गावाला नांव दिले आसदनगर, त्यावेळी औरंगजेबाकडे बातमी आली की तेथे काफरांची बरीच देवस्थाने आहेत. औरंगजेबाचे म्हणणे असे मी मूर्तीफोड्या आहे. येथे जर काफरांची मोठे देवस्थाने असतील तर ती फोडा असा आदेश दिला. त्याने इनायतखान नावाचा आपला सरदार याला पाठवले. हा बादशहाकडे निरोप घेऊन आला; मान खाली घालून उभा राहिला. तो म्हणाला, फोडायला मूर्तीच नाहीत. पंडित, बडवे यांनी मूर्ती पळवून नेली. मूर्ती ज्या गावी बडव्यांनी पळवून नेली त्या गावाचे नाव आहे देगांव. हे

पंढरपूरपासून खाली १०-१२ किलो मीटरवर आहे. औरंगजेबाने अशी दवंडी पिटवली की, काफरांचा देव माझी माणसे गेल्यावर पळून जातो. तो भक्तांचे काय रक्षण करणार ?

त्याच काळामध्ये इनायतखानाला पुण्याच्या बाजूला संपूर्ण मराठी सैन्य नामषेश करावे म्हणून औरंगजेबाने जेजूरीला पाठवले. जेजूरीवर इनायतखानाने हल्ला केला. आपल्या लोकांना सांगितले, जेवढ्या मूर्ती असतील तेवढ्या फोडून टाका. जेव्हा इनायतखान आत देवळाकडे गेला तेव्हा आतील पुजारी ( जे धनगर) होते त्यांनी सांगितलं आम्ही बाहेर येणार नाही. हवं तर तू आतमध्ये ये आणि मूर्ती घेऊन जा. इनायत खान आत देवळात पाऊल टाकणार तोच अनेक भुंगे बाहेर पडून त्यांनी इनायतखानाला सळो की पळो करुन सोडले.

औरंगजेबाला ही बातमी समजली, तेव्हा तो स्वतः सैन्यानिशी जेजूरीला, खंडोबाचे मंदिर जमिनदोस्त करण्यासाठी आला. पुन्हा मोठ-मोठ्या भुंग्यांचा हल्ला त्याच्या तळावर झाला. सर्व सैनिक पळून गेले. औरंगजेबाचा तंबू (गुलालबार) सांभाळणारे सर्व नोकर पळून गेले. एकटा औरंगजेब आणि त्याची मुलगी झोन्नततूल्ला हे दोघेच शिल्लक राहिले. मग औरंगजेबाने सव्वा मणाचा सोन्याचा भुंगा जेजूरीच्या खंडोबाला अर्पण केला. तेव्हा हे सर्व थांबले आणि औरंगजेबाने दिलेले फर्मान रद्द केले. त्याच्यानंतर औरंगजेब नगरकडे जाताना मृत्यूमुखी पडला.

आपण असे म्हणतो विठ्ठलाचा महिमा अगाध आहे. पण विठ्ठल याचा अर्थच मुळी आपल्याला कळला नाही, जो गोराकुंभाराने आपल्या भक्तित सांगितला, विठ्ठल हा मूर्तीत नाहीच. सर्व संतांनी विठ्ठलाची भक्ती, त्याची प्रचिती, त्याचा महिमा आपल्या भक्तीतून गायला. सर्व जनतेला सांगितला. परमेश्वर भक्ती करताना संतांनी जो मार्ग सांगितला तो वेगवेगळ्या तऱ्हेने दत्तभक्तीमध्ये आहे. रुद्र सूक्तामध्ये आहे, शिवमहिम्न स्तोत्रात आहे. शंकराचार्यांनी पंढरपूरला योगपीठ म्हटलेलं आहे. योगपीठ म्हणजे शिवकुंड! कारण पांडुरंगाच्या मस्तकावर शिवलिंग आहे. पंडरींगे, पांडुरंग हे शंकराचे एक नाव आहे. पंचमुखी हा शिव आहे. चार दिशेला चार मुख आणि वरती (उर्ध्व दिशेला) एक मुख. हे पांढरे आहे. म्हणून त्याला पांडूरंग म्हणतात, असं सर्व संतांनी मांडलेलं आहे.

विष्णू पुजक आणि शिव पुजक हे वेगळे नाहीत. दत्तभक्ती वेगळी नाही. गुरुचरित्र करणारे सुध्दा पंढरपूरच्या विठ्ठलाचे अभंग, गाणी म्हणतात. एकनाथांच्या गवळणी, आणि कृष्ण हे काही वेगळं नाही. शिव आणि कृष्ण हे एकच तत्व आहे. जसं शंकराची पाच मुखे म्हणजे काय हे समजत नाही. जे पंचप्राण आपल्या शरीरावर वर्चस्व गाजवतात; ते पंचप्राण म्हणजेच शिव होय. ह्या पंचप्राणाचा त्याग करता येतो. ज्या प्राणामध्ये कष्ट, दुःख, वेदना आहेत तो बाजूला करुन, दुरुस्त करायचा आणि पुन्हा जोडायचा असा प्रकार आहे. हे शास्त्र मी शिकवतो.

ज्यांना केसाची व्याधी, मुळव्याध अशा प्रकारच्या व्याधी असतात, त्या या प्राणांवर अवलंबून असतात. ज्या प्राणावर असतात तो प्राण दुरुस्त केला असता ती व्याधी दूर होते. जसं साईबाबांनी केलं. आपल्या सहकाऱ्यांना सांगितलं, मी मरणार आहे. तीन दिवसांनी परत येईन. तो पर्यंत तुम्ही माझ्या देहाचा सांभाळ करा. साईबाबांना दम्याचा आजार होता. त्यामुळे त्यांची फूफ्फूसे खराब झाली होती. फुफ्फूसाच्या संबंधी जो प्राण आहे तो साईबाबांनी बाहेर काढून दुरुस्त केला व पुन्हा फुफ्फूसाच्या जागी सोडला.

मी तुम्हांला जे जे काही शिकवतो ते या सर्व गोष्टींशी संबंधित आहे. हे शिक्षण सतत पॉलिश करत राहिले पाहिजे. परंतु तुम्ही, मी शिकविलेल्या गोष्टी एकदा शिकलात की त्या म्यान करुन ठेवता त्या पुन्हा वर काढत नाहीत. जेव्हा काही संकट तुमच्यावर येते, तेव्हा मी दिलेल्या अस्त्रांची आठवण होते. परंतु बराच कालावधी फुकट गेल्यामुळे ते म्यान केलेलं अस्त्र गंजते व गंजल्यामुळे ते संकटाशी सामना करण्याकरीता समर्थ रहात नाही. मग माझ्याकडे धावत येता. भाऊ आता काय करायचे ? असा हा सारा प्रकार आहे. माझ्यापरीने जे जे मी सांगतो ते तुमचा गंज काढण्याचा प्रकार होय. (You are rusted) भयंकर गंजलेले आहात, म्हणूनच नानाविध दुष्परिणाम तुम्हांला दिसतात. हा सारा माझा प्रयत्न गंज काढण्याचा आहे. मला माझ्या गुरुंनी दिलं, मला ते तुम्हांला द्यावसं वाटलं म्हणून मी ते तुम्हांला देण्याचा प्रयत्न करीत आहे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# पिशाच्च बाधा होणे ते शरीरात घुसणे?

आपणं सर्व माणसे अपवित्र आहोत. साहजिकच आपलं घरही अपवित्र असते. त्यामुळे पिशाच्चाची पिशाच्चे वावरत असतात. अशा विचित्र गोष्टी आपल्या घरात घडतात. तेव्हा आपण त्या गोष्टींचा सामना करु शकत नाही. ना शस्त्राने ना आणखी कशाने ! हे सामर्थ्य मनामध्ये आहे. ''जेथे दुबळं मन तेथे पिशाच्चाचा वावर''. जेथे सबळ मन तेथे पिशाच्च वावरत नाही.

# पिशाच्च बाधा होणे ते शरीरात घुसणे?

बरेच जण माझ्याकडे येतात, त्यापैकी सर्वांचाच मला एक प्रश्न असतो; आमच्या घरात शांती नाही. आम्ही तिघे भाऊ, परंतु एकमेकांचे तोंड बघत नाही. असं आपलं कुटुंबच्या कुटुंब, सर्व भाऊ अशांत. कुणाबाईचं नाव शांती असते, परंतु घरात अशांती ! असं का ?

मला माझ्या लहाणपणीची गोष्ट आठवते. तेव्हा देवीची लस टोचली जाई. एक छोटे चक्र असायचे, त्याला औषध लावलेलं असे. ते चक्र करकन चामडीत फिरवत, सर्व चामडी तोडून टाकत. हात सुजायचा आणि एक महिना बोंबाबोंब ! ते मोठे डाग माझ्या हातावर आहेत. माझ्या आजीने याच्याबद्दल तक्रार केली. माझी आजी अस्सल मालवणी बोलायची. तिचे उद्‌गार असे ''मेल्या सरकारचा कसला या काय ? हाताक काय तरी लावून मोठी बाय ती काय येवची थांबतली !''

देवी येणं याला ''मोठी बाय येणं'' असं म्हणत असतं. ''छोटी बाय व मोठी बाय!'' छोटी बाय म्हणजे ''कांजण्या'' व मोठी बाय म्हणजे ''देवी'' आणि सगळ्यात लहानात लहान ताई म्हणजे ''गोवर''. मोठी बाय येवची ती येतलीच आणि सरकारने कसला चक्र आणल्यानं तरी ती येतलीच. काय एक मी सरकारचा ऐकतल्य नाय. हा तिचा आरडा-ओरडा मी ऐकायचो. एकदा देवी टोचायला डॉक्टर आले, त्यांच्यात खाकी कपडेवाला शिपाई असायचा. काय झालं त्या खाकी कपडेवाल्याने मला पाहिलं. मी दरवाजाच्या आत लपलो होतो. त्याने मला पकडलं आणि मला डॉक्टरांकडे घेऊन गेला. जाता जाता माझ्या आजीने माझा लंगोट काढून घेतला. का ? नंतर धुवावा लागेल म्हणून !

आमचं नाव भानुदास, परंतु घेऊन गेले दिगंबर म्हणून. येणेप्रमाणे कोंबडी कापतात तसा मला धरुन करकन माझ्या हातात ते चक्र फिरवलं. बोंबाबोंब, सगळे विधी केले आणि काय काय झालं, ते आठवत नाही.

एक महिनाभर तो हात दुखत होता. माझ्या आजीला हे मंजूर नव्हतं. परंतु तीन चार महिन्यांनी जे डॉक्टरने केले ते तिला पटू लागलं. त्यावेळी आमच्या गावी देवीची साथ आली होती. आमच्या वाडीत ही साथ जास्त होती. परंतु ज्या मुलांना ही लस टोचली होती, त्यांना देवी आल्या नाहीत. ज्या मुलांना देवी आल्या ती मुले

दगावली आणि माझ्या आजीला ते पटलं. काही आंधळी झाली, काही पांगळी झाली. वस्तुत: देवी येणे आणि याचा तसा काही संबंध नाही. परंतु बऱ्याच गोष्टींचा संबंध हा परस्पर लक्षात येत नाही. प्रत्यक्ष (Direct) नसतो. आणि अप्रत्यक्ष संबंध आपल्याला कळत नाही. तो आपल्याला कळला पाहिजे.

माझ्या घरात का बरं नाही? आजारपणं का येतात? त्यात अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. सामान्य माणसाच्या बुध्दीला ते पटत नाही. काही लोकांच्या घरात अचानक भांडी पडतात, घरात कोणी नसताना कुणीतरी गळा दाबल्यासारखं वाटते. असे बरेच प्रकार होतात. हा विषय पटणारा नाही. विक्षिप्त प्रकार घडत असतो. मी थोडक्यात त्याचे उत्तर देईन. पिशाच्चाने नोकरीला ठेवलेले पिशाच्च हे काम करीत असतो. त्याला आपण म्हणतो भानामतीचा प्रकार. समजायला सोपं आहे.

महानगरपालिका रस्ता साफ करायला नोकर ठेवते. ते काय करतात, दुसरा नोकर ठेवतात. कुठे चहा पीत असतात. विड्या फुकत असतात. तो मुळ नोकर पगार घेतो, त्यातला काही हिस्सा ठेवलेल्या नोकराला देतो; तेवढ्या काळात तो दुसरेच धंदे करत असतो. थोडक्यात असं सांगतो, आपणं सर्व माणसे अपवित्र आहोत. साहजिकच आपलं घरही अपवित्र असते. त्यामुळे पिशाच्चाची पिशाच्चे वावरत असतात. अशा विचित्र गोष्टी आपल्या घरात घडतात. तेव्हा आपण त्या गोष्टींचा सामना करु शकत नाही. ना शस्त्राने ना आणखी कशाने! हे सामर्थ्य मनामध्ये आहे. ''जेथे दुबळं मन तेथे पिशाच्चाचा वावर''. जेथे सबळ मन तेथे पिशाच्च वावरत नाही.

आपल्याला हे बऱ्याच अंशी कळणार नाही आणि पटणारही नाही. परंतु मी कोकणातला असल्यामुळे पिशाच्चांवरील बरीच कारणे शोधून काढलेली आहेत. त्या ठिकाणी मी रात्री १२ वाजता, १ वाजता हिंडलो आहे. तुम्हांला सांगितलं तर पटणार नाही, माझ्या आजोळी मोगर्णे गावी स्मशानात अहमदाबादी मेव्याचे झाड आहे. त्या स्मशानात रात्री मेवा खाण्यास जात असे. तेथे कोणीतरी येत आहे असं दिसलं की त्या झाडावरुन विचित्र आवाज काढायचो म्हणजे येणाऱ्याला वाटावं पिशाच्च आहे. हे मी का करायचो ? तर देवा, माझ्या वाट्याला सर्व मेवा यावा.

तेथेच एक आंब्याचे झाड होते, त्याला म्हणायचे बाळंतीणीचा आंबा. त्याच्यावर कोणी चढायचे नाही. परंतु मी चढायचो. ही माझी चोरी माझ्या आजीने पकडली. तिला गावातील सर्व आंब्यांच्या जाती माहिती होत्या. मी त्या आंब्याचे आंबे घरात लपवून ठेवले होते. ते आजीने पाहिले. तिने मला विचारले, ''अरे बाबी (मला बाबी म्हणायचे) हे स्मशानातल्या बाळंतीणीच्या आंब्याचे आंबे, तू त्याच्यार चढललंस काय रे ?'' इतकी माझी आजी हुशार होती. अशा बऱ्याच ठिकाणी मी रात्री-बे रात्री हिंडलो आहे. बरेच प्रकार यातील मला माहिती आहेत.

तुम्ही डॉक्टरकडे गेलात. रिपोर्ट नॉर्मल. डॉक्टर म्हणतात सर्व ठिक आहे. तुम्हांला काय होतयं ? काही नाही. बऱ्याच वेळा अशी परिस्थिती निर्माण होते की तो मनुष्य झिजून झिजून संपायला येतो. जीवनामध्ये अशा गोष्टी घडतात. एक लक्षात ठेवलं पाहिजे, आपण दुर्बल म्हणून आपण पिशाच्चाचे गुलाम होतो. ''ह्या जीवनामध्ये घडणाऱ्या गोष्टीला सामोरं जाता आलं पाहिजे.'' स्वसामर्थ्याने लढता आलं पाहिजे. लढून विजय प्राप्त करता आला पाहिजे. बऱ्याचवेळा मुल न होण्यामागे ही हे एक कारण आहे. मी या विषयाकडे तुम्हांला नेतो आहे की जी साधना तुम्हांला शिकविणार आहे, त्या साधनेमध्ये हा एक भाग आहे. आपल्या पूर्वजांनी काही मार्ग घालून दिलेले आहेत. मार्ग सांगताना सांगितले आहे, भक्तीमार्ग सर्वात श्रेष्ठ आहे. परंतु मोठा प्रश्न आपल्याला पडलेला असतो, भक्ती आपल्याला करता येते की नाही ? त्याला तन-मन-धन द्यावं लागतं.

एखाद्याला देवळात झाडू मारायला सांगितली तर तो एक दिवस मारेल, दोन दिवस मारेल, तीन दिवस मारेल, नंतर मी झाडू मारायची काय ? असं म्हणेल (मनातल्या मनात). बाहेर काय बोलणार नाही. मग ते झाडू मारण्याचं काम फुकट गेलं. अशी उदाहरणे अनेक ठिकाणी घडलेली आहेत. म्हणजे तप, श्रम, घाम हा जेथे देण्याची तयारी नाही, मनाचं तर काही नाही, मन द्यायचं प्रश्नच नाही. मग तुम्ही जीवनात यशस्वी होणार कसे ? 'परमेश्वर प्राप्त होतो. केव्हा ? तर तन-मन-धन निर्लेप भावाने दिले तर.' त्याला काही चिकटता कामा नये. अळूच्या पानावर पाणी पडते आणि काही काळाने काहीही अंश न राहाता निघून जाते. तसं आपलं मन आहे का निर्लेप ? त्यागच नीट नाही, भक्ती नीट नाही, तर परमेश्वर प्राप्त कसा होणार ? तन-मन-धन अर्पण करायचे तेव्हा हे सर्व प्राप्त व्हावे.

तुम्हांला एक मजेदार गोष्ट सांगतो. माझा एक मित्र आहे. त्याचा नामोल्लेख करीत नाही. त्याच्या एकदा डोक्यात काहीतरी घुसलं. दिल्लीला आला तेथून तो पुण्याला यायला निघाला. जायचं होतं पुण्याला, तिकिट पुण्याचं, पण उतरला मनमाडला. मनमाडहून कोपरगांवला आला. कोपरगावाहून शिर्डीला तेव्हा बसेस होत्या. आतासारख्या मुंबई-शिर्डी बसेस नव्हत्या. एकच बस तेव्हा सुटायची त्या बसला जाण्या-येण्याचे तिकीट द्यायचे. (काळ जुना आहे.) बस बुधवारी सुटायची ती रात्री पोहचायची आणि गुरुवारी आरती झाली की ती बस शिर्डीहून सुटायची. कोपरगावाहून माझा मित्र शिर्डीला गेला. साईबाबांच्या समोर उभा असता त्याला साईबाबा भावले. त्याच्यात काही वेगळा बदल झाला. इथे काहीतरी सेवा करावी. अशी त्याला मनोमन उर्मी येऊ लागली. माझा शब्द लक्षात ठेवा 'उर्मी'. उर्मीचे इच्छेत रुपांतर झाले की निर्माण होते ती 'वासना'.

वासना शब्द प्रयोग फार महत्वाचा आहे. तो फार भानगडीचा आहे. त्याला काहीतरी वाटू लागलं. त्या दिवशी संध्याकाळी तेथे जे कॅन्टीन आहे त्या कॅन्टीनमधील उपकरणे तयार करावयाची होती. त्याचं टेंडर भरायची त्याच दिवशी शेवटची तारीख होती. त्याला अशी इच्छा झाली की, आपण हे टेंडर भरावे, पण वेळ निघून गेली होती. त्याचे प्रमुख जे बाखलीवाल त्यांच्याशी माझ्या मित्राचा कुणीतरी परिचय करुन दिला. हा म्हणाला, मला पण टेंडर भरायचे होते. बाखलीवाल म्हणाले, अजून भरा ना! मी घेतो. त्यासाठी जी अनामत रक्कम भरावी लागते ती याच्याकडे नव्हती. बाखलीवाल म्हणाले, हरकत नाही, दोन दिवसांनी भरा. टेंडर विचारात घ्यायला अजून वेळ आहे. ह्याने ते टेंडर भरले. अंदाजाने सर्व टेंडर सहा लाखाचं होतं. त्याने पुण्याहून कोणाकडून तरी कर्जाऊ पैसे घेतले आणि टेंडरची अनामत रक्कम भरली. गमतीची गोष्ट अशी की सर्वांचे टेंडर नामंजूर झाले आणि ह्याचे टेंडर मंजूर झाले.

ह्याच्याकडे ना नोकर! ना पैसा! ना भांडवल! हा माणूस कामाला लागला; तत्पूर्वी हा साईबाबांकडे काय म्हणाला, ''बाबा नाममात्र एक रुपया घेऊन मी हे काम करीन, मला याच्यात फायदा नको आहे.'' साईबाबा ते! जरी देहाने गेले तरी ऐकायचे काम सोडले नाही. ''मी गेलो जरी, तरी माझी हाडे बोलतील'' असा त्यांचा संदेश. फार कडक काम. तर हे काम करीत असताना त्याच्या एक गोष्ट

लक्षात आली, यात बराच फायदा आहे. म्हणून त्याने काय केलं एका बिलामध्ये गोलमाल केला (फायदा काढण्यासाठी). त्याने कॅन्टीनचे काम पूर्ण केलं. गुरुपौर्णिमेला कॅन्टीनचे उद्‌घाटन (उपकरणांसह) झालं. पुढची गुरुपौर्णिमा आली तरी याचं बिलं मिळालं नाही. म्हणून त्याने शिरडी संस्थानला नोटीस दिली. १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण! माझं बिल मिळालं नाही तर येथेचं मरणार! शिरडी संस्थान कसं पैसे खाते, याच्या मुलाखती सर्व पेपरमध्ये दिल्या. शिरडी संस्थानवाले चिडले आणि त्याच्यामागे हात धुऊन लागले.

त्याचकाळात मी शिरडीला गेलो होतो. (मी त्यावेळी शिरडी संस्थानचा सल्लागार होतो.) शिरडी संस्थानचे कोर्ट रिसीवर श्री. काकडे मला भेटले. त्यांनी माझ्या कानावर माझ्या मित्राचा प्रताप घातला. त्याचवेळी माझा मित्रही भेटला. मी त्याची समजूत घातली आणि शिरडीतील संस्थानचे अधिकारी, शिवाय नानासाहेब रासणे यांच्याशी मी चर्चा करुन हे प्रकरण मिटवले.

संस्थानने याचा पैसा दिला परंतु एक बिल ठेवलं. ज्यात त्याने गोलमाल केला होता. मी त्याला मजेत म्हटलं, जर हे बिल तुला मिळाले तर तुला किती फायदा होईल ? मला म्हणाला, कसला फायदा, फक्त एक रुपया! कारण त्या बिलाचे पैसे मी जे कर्ज घेतलं होते त्या व्याजातच जाणार! बघा साईबाबा किती उस्ताद ते! तेही बिल त्याला दोन दिवसात मिळाले. मी त्याला गंमतीने विचारलं, काय रे तू साई बाबांना असं म्हणाला होतास, फक्त एक रुपया फायदा घेईन. होय तर! त्याचं उत्तर, मी जास्त फायदा काढायला गेलो त्याचं असं झालं.


ही गोष्ट आपल्याला कळली की आपल्याला समजेल आपण साधू, सत्पुरुष यांच्याशी कसं वागतो ? त्याची जर कुठेतरी चूक असेल तर त्याला प्रायश्चित हमखास मिळालचं पाहिजे. आणि विश्वास असेल तर मोठ्या संकटातूनही ते सहज तारुन नेतात. माझ्याकडे एक मुलगा यायचा. त्याचं नाव झब्यावरुन आहे. त्याच्याकडे मी एक दिवस गेलो होतो. तेथे त्याचा मित्र आला होता. त्याला घरी जायची घाई होती. मी त्याला थांब रे जाशील, असं करुन रात्रीचे दहा वाजवले. तेवढ्यात काळात काय झाल ? तो जेथे रहात होता तेथील काही गुंड त्याला घरी मारण्यासाठी आले होते. परंतु हा तेथे नव्हता म्हणून याच्या मित्रावर

कमरेच्याखाली सपासप वार करुन त्याला लुळा बनविला. हा जेव्हा घरी गेला, तेव्हा याला कळलं की मला मारायला पोरं आली होती; परंतु भाऊंनी मला जबरदस्तीने थांबवलं, म्हणून मी वाचलो!

मी सत्पुरुष आहे असं मला वाटतं नाही. परंतु माझ्या गुरुकृपेने मी जी काही परमेश्वराची विचित्र भक्ती केली, त्यामुळे काही भविष्यातील घटना कळतात. त्यातून मी माझ्या सहकाऱ्यांना, शिष्यांना वाचवण्याचा असा प्रयत्न करतो. काही लोकांना असं वाटतं की माझ्याकडून काही पैसा मिळेल. सिध्दी प्राप्त होतील. मी जरुर सिध्दी प्राप्त करुन देतो, परंतु तुम्ही माझ्याकडे आल्याबरोबर ती मिळेल हे संभवनीय नाही. आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे, मी सिध्दी देणार त्याचे प्रकार काय? मी सहज तुम्हांला सांगितलं 'भक्तिमार्ग' परमेश्वराला तन-मन-धन दिल्याशिवाय काही प्राप्त होत नाही. भगवान कृष्णाने सांगितले, ज्ञानमार्गने जा. तो कळतो आहे कुणाला? ज्ञान मार्ग म्हणजे मनाला ज्ञान झालं पाहिजे. मनाला कळून ते बुध्दीकडे गेलं पाहिजे. आणि बुध्दीकडे जाऊन ते अंतर्मनामध्ये घुसलं पाहिजे. अंतर्मनाकडून ते, चित्त नाहीसे करत गेलं पाहिजे. हे कसं संभवनीय आहे?

'तिसरा मार्ग कर्ममार्ग! निर्लेप कर्म' काहीच त्या कर्माचं फळ घेणार नाही. हे मी तुमच्याकडून करुन घेतो. मी तुम्हांला गाणगापूरला यायला सांगतो. तेथे तुम्ही झाडू मरा, भांडी घासा, कपडे धुवा. माझी बरीच मुलं तेथे काम करतात, कारण त्यांचं पुढील जीवन चांगलं जावं. 'कर्मण्येवादिकारस्ते महाफलेषु कदाचन' असं कोण करतं? ज्या कर्मात फळ तर मिळत नाही, लाथा मिळतात! तरीही कर्म मार्गाने जाता येतं. परंतु आपली तयारी नसते. आपण असा विचार करता, कसलं भाऊंचं काय? माझ्याकडे चार गडी काम करतात आणि मी गाणगापूरला जाऊन काम करणार? ज्या कर्माला पान येत नाही, फळ येत नाही ते निष्कर्म! ते मी करुन घेतो. त्याची फळं तुम्हांला आपोआपच मिळतात म्हणून कर्म हे केलेचं पाहिजे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# मन पारदर्शक असावे

माणसाने स्वच्छ आणि पारदर्शक असायला हवं. मी स्वच्छ शब्दामध्ये सांगतो, मी असा होतो, असं केलं होतं आणि आता असा आहे. मग लपवाछपवी कशासाठी? साटम महाराज सुध्दा वाईट होते, असे त्यांच्या चरित्रातच लिहिलं आहे.

# मन पारदर्शक असावे

मी बऱ्याच वेळा बोलताना असं सांगतो, मला सुध्दा काही व्यसनं होती आणि ती मी अमान्य करीत नाही. माणसाने नेहमीच पारदर्शक असलं पाहिजे, स्वच्छ असलं पाहिजे. तुम्ही जर कोणती गोष्ट लपवायला गेलात तर कधी ना कधी ती बाहेर २पडणार आणि तुमचा नक्षा उतरणार.

एक सुनबाई होती. तिच्या हातून एकदा कप फुटला. सासू आल्यानंतर बघणार, कप फुटला. तिने त्या कपाचे तुकडे गोळा केले आणि गटारात नेऊन टाकले. सासू बाहेरुन आली आणि तिने चहा मागितला. सुनेने चहा दिला पण दुसऱ्या कपातून. आपल्याला घरी सवय असते, आपण एकाच आवडीच्या भांड्यातून चहा पितो, एकाच ग्लासातून पाणी पितो. त्याचप्रमाणे या सासूचं होतं. आज चहा दुसऱ्या कपातून मिळाला म्हणून तिने सूनेला हाक मारली. तेव्हा सून घाबरुन पटकन म्हणाली, मी नाही. (म्हणजे बोलायचं होतं कप मी फोडला नाही.) तेवढ्यात त्या फुटलेल्या कपाचा एक तुकडा सासूच्या पायात घुसला. असा घोटाळा होतो.

माणसाने स्वच्छ आणि पारदर्शक असायला हवं. मी स्वच्छ शब्दामध्ये सांगतो, मी असा होतो, असं केलं होतं आणि आता असा आहे. मग लपवाछपवी कशासाठी ? साटम महाराज सुध्दा वाईट होते, असे त्यांच्या चरित्रातच लिहिलं आहे. दारु पिणारा म्हणतो, एका पेगने काही होतं नाही. दोन-तीन पेग पोटात गेले की बरं वाटतं. मग चालताना त्याची पाऊलं बरोबर पडत असताना सुध्दा त्याला वाटतं आपली पाऊलं बरोबर पडत नाहीत. तो मुद्दाम बरोबर टाकतो. मग तक्रार करतो, महानगर पालिका साला बेकार आहे. रस्ता असा केला आहे की नुसता चढ-उतार. एका बाजूला सखल आणि दुसऱ्या बाजूला उंच! हरामखोराचा एक पाय असतो फूटपाथवर आणि दुसरा पाय रस्त्यावर. तेव्हा अशी ही कथा आहे. माझ्या साधनेमध्ये अशी काही वैशिष्ट्ये आहेत. दारु तर प्यायची नाही पण नशा मात्र आली पाहिजे.

मी माझ्या काही शिष्यांना ही साधना शिकवायला सुरुवात केली आहे. राऊळ

महाराज तर पूर्ण बाटली दारु प्यायचे म्हणजे १४ पेग. ( ही दारु पिणाऱ्यांची भाषा आहे.) तुम्ही जरी दारु पित नसलात तरी ही भाषा समजायला हरकत नाही. दारु प्यायलाच पाहिजे, असं नाही पण जगाचं ज्ञान असायला हवं. राऊळ महाराज अख्खी बाटली प्यायचे पण नशा काही नाही.

सत्यपाल सिंग ठाकूर हे मोतीलाल नेहरुंचे (जवाहरलाल नेहरुंचे वडील) मित्र. पण वारले १९६२ साली, ११० वर्ष झाल्यावर. त्यांना पार्टीला एका न्यायधीशाने नेलं आणि सांगितलं, आज तुम्ही दारु प्यायलाच हवी. नाही म्हणजे काय ? सत्यपाल सिंग ठाकूर त्या न्यायधीशांना म्हणाले, तुम्ही मला आग्रह करु नका! का? तर ते म्हणाले, तुमच्या जवळची सगळी दारु संपून जाईल! काय संपेल, दोन अलमाऱ्या भरलेल्या आहेत. असं ! होऊन जाऊ द्या.

सत्यपाल सिंगांनी दोन्ही आलमाऱ्या मध्ये असलेल्या दारुच्या बाटल्या प्यायले आणि न्यायधीशांसह सर्व पाहुण्यांची जिरवून टाकली. इतकं होऊन परिणाम शून्य. हे कसं काय ? इतकी दारु पिऊन काहीच झालं नाही ? खरं वाटण्यासारखी गोष्ट आहे का? पण ते सत्य आहे. जठराग्नी पेटवून नशा ट्रान्सफर करुन टाकली. परिणाम जे दारु प्यायले नव्हते ते त्या पार्टीत आडवे झाले. त्या सर्वांना त्यांनी नशा देऊन टाकली. किती महान विभूती.

त्याच्याही पुढे एक पौराणिक उदाहरण देतो. कोणे एके काळी दुर्वास ऋषी आपल्या चाळीस हजार शिष्यांसह धर्मराजाची परीक्षा घेण्यास गेले. अशावेळी द्रौपदी हाक मारते आहे, कृष्णा धावत ये, माझ्यावर मोठं संकट आलं आहे. अब्रू जाणार! दुर्वास ऋषी माझ्या नवऱ्यांना शाप देणार आणि भस्म करुन टाकणार! आपल्या लाडक्या बहिणीवर मोठ संकट आलं आहे, हे समजून सगळ्या लिमिटेड बसेस गेलेल्या, टॅक्सीचा संप म्हणून टॅक्स्या बंद, पाऊस भरपूर पडल्यामुळे मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे बंद. काय कसला विचार कृष्णाने केला नाही. पळत सुटला! कसा गेला काय माहित नाही. पण द्रौपदी समोर जाऊन उभा राहिला. द्रौपदीला विचारले, कशाला माझ्या नावाने बोंबाबोंब करतेस! म्हणे दुर्वास आला आहे. आपल्या चाळीस हजार शिष्यांनिशी. त्यांना जेवण हवे आहे. मी त्यांना आंघोळीला पाठविले आहे. एवढचं ना ! बघू या आपण काय ते !


लक्षात ठेवा कृष्णाने फार महत्वाची गोष्ट सांगितली, पहिलं मला काय तरी खायला दे. (योगाच्या दृष्टीने याला फार महत्व आहे.) द्रौपदी ती! कशीही झाली तरी बाईच. बायकांना एक सवय असते, भांडी 'फार स्वच्छ' घासतात. द्रौपदीने सांगितले, खायला काहीही नाही. मला सूर्याने दिलेली थाळीदेखील जेवण झाल्यावर स्वच्छ घासून-पुसून, उलटी करुन ठेवली आहे. आता काय असणार. असेल गं काही तरी त्याला चिकटून राहिलेलं. कृष्णाचा सवाल! कारण कृष्णाला माहित होत, बाई आहे ती, तिच्या भाषेत जरी स्वच्छ घासणे, तरी ते नसणारचं. तेच खरं झालं. थाळीला भाजीचं पान चिकटलेलं होतं, ते कृष्णाने खाल्ले आणि ढेकर दिला. तो त्याने दुर्वास ऋषी आणि त्यांचे शिष्य यांच्याकडे ट्रान्सफर केला, त्यांची पोटं भरलेली, असे हे योग शास्त्र आहे.

जे कृष्णाने भक्तांना दिलं, परंतु आपण त्याचा नाश केला, ते आपल्या जीवनातून योगशास्त्र नष्ट केलं. आपलचं ज्ञान, आपणच संपवलं आणि गोऱ्या कातडीने ते आत्मसात केलं. आपली वस्तू आणि आपणच दुसऱ्याकडे भीक मागायला जातो.

माझ्या सद्‌गुरुंच्या कृपेने त्यांनी शिकविलेल्या सहजयोग साधनेनं या सर्व विषयांचं थोडफार ज्ञान मला मिळालं ते तुम्हां भक्तांना मी देण्याचा प्रयत्न करतो आहे. तुमची किती तयारी आहे हे तुम्हीच ठरवा.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# मेंदूसाठी वातावरण निर्मिती

हे कसं करता येईल? माझा मेंदू मला चांगला कसा करता येईल? त्यासाठी तसं वातावरण निर्माण केलं पाहिजे. वातावरण निर्मिती शिवाय आपल्याला कोणतीही गोष्ट पटत नाही. वातावरण निर्मिती याचा अर्थ असा, किर्तनकार वातावरण निर्मिती करतात, ''रामकृष्ण हरी'' असा घोष १०-१५ मिनिटे करतात.

# मेंदूसाठी वातावरण निर्मिती

काही मंडळी माझ्याकडे येतात ती त्रासलेली असतात, पिडीत असतात. त्यांना मी काही मार्ग सांगतो. तुम्ही अमूक अमूक करा, सर्व ठिक होईल. जे करतात त्यांना त्याचा अनुभव येतो. परंतु त्यांनी जर असं म्हटलं, भाऊ आमच्या वतीनं तुम्हीच काहीतरी करा, ते कसं शक्य आहे? समजा मी कुणासाठी काहीतरी केलं; एकदा केलं, दोनदा केलं, झालं त्याला हे फुकटचं मिळत गेल्यावर तो आळशी बनत जाणार, हे संयुक्तिक नाही.

तुम्ही स्वतः काही तरी केलं पाहिजे तर त्याचा मोबदला तुम्हांला मिळणारं. माझा मुद्दा असा तुम्हांला जी संकटे आहेत त्याचे अनेकमार्ग मी देतो, अगदी कुठल्याही संकटाशी मुकाबला करण्याचं सामर्थ्य यावं यासाठी मी अनुष्ठान पध्दती शिकवतो की ज्याने आपल्याला संकटाशा मुकाबला करता येतो. माझ्याकडे ज्या लहरी आहेत, त्या संकटात संकटाशी फिरवता आल्या पाहिजेत, ते संकट दूर करता यायला पाहिजे. आपल्याला जे जे शक्य आहे ते आपण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

माणसाच्या जीवनात आयुष्य महत्वाचे आहे. तुम्ही जगलात तर पैसा कमवू शकता, सुख मिळवू शकता ( जे खरं नाही ते. खऱ्या सुखाची कल्पना वेगळी आहे. आपण समजतो ते खरं सुख नसतेच.) अशी जी काही संकटे त्यातील एक आजारपण. आपण डॉक्टरकडे जातो. डॉक्टराकडून बरं वाटलं नाही की दुसऱ्या मग तिसऱ्या डॉक्टराकडे... थोडक्यात विश्वास नाही. सर्व डॉक्टरांकडे फिरुन झाल्यावर मग कोणत्या तरी भगताकडे जातो. भगत हे काही जादू करुन तात्पुरते बरे करतात आणि आपल्याला वाटते, बघा त्या बाबाने मला बरं केलं. आणि आपण त्या बाबाचे भक्त बनतो. काही काळाने पुन्हा आजारी पडतो, यावेळी बाबाचा जादूटोणा काम करीत नाही. शेवटी आपल्याला त्या दयाळू परमेश्वराची आठवण येते. मग साहजिकच देवाला आश्वासनं दिली जातात. मी हे करीन, ते करीन; पण मला बरं कर. मी २१ नारळाचे तोरण बांधीन, एक मोठा डबा तेल देईन वगैरे वगैरे.

ज्या देवाने सर्व काही निर्माण केलं त्याचचं त्याला देण्याची आपण लालच

दाखवतो. थोडक्यात देवाला आपण लाच देतो. परंतु आपण हे शेवटी करायला जातो. ज्या वेळेस देवाचे गुणगान करायचे असते, त्याचं नामस्मरण करायचं असते ती वेळ आपण फुकट घालवलेली असते. माझ्याकडे जे येतात त्यांना मी काही अस्त्र देतो. (अस्त्र म्हणजे बंदूक, दारुगोळा, तोफ यातला प्रकार नाही.) काही मंत्र, तप, पारायण इत्यादी करायला शिकवतो. त्याची उजळणी घेतो आणि मी दिलेली ही अस्त्र आपल्याला संकटकाळी, अडचणींतून सहज बाहेर काढतात.

संकटे कोणावर येत नाहीत ? ती कुणाला चुकलेली नाहीत. परंतु त्याचे वाईट परिणाम आपल्यावर होत नाहीत. त्याची झळ आपल्याला पोहचत नाही. त्यासाठी नुसता यत्न करणे महत्वाचे नाही, तर सर्व दृष्ट्या यत्न करणे म्हणजे प्रयत्न! आपण सर्व काही करु शकतो. त्यासाठी लागते ते देवाचे संधान. हे साध्या नामस्मरणातून प्राप्त होते.

आपल्या जीवनात आपल्याला बऱ्याच गोष्टी करता येतात, असं मी म्हणतो. त्या शक्य आहेत. आजारावर उपाय आहेत. संकटावर उपाय आहेत. कर्जमुक्तीवर उपाय आहेत. त्यातील आपल्याला सतत भेडसावणारा प्रश्न म्हणजे आजारपण. हे आपल्या पाचवीला पूजलेलं असतं. मग आजारपण हे नक्की काय ? आपल्या वयोमानानुसार आपल्या शरीरात दोन गोष्टी घडत असतात. पेशी मरणे (Catabolism) आणि पेशींची नव्याने उत्पत्ती (Metabolism). जसं बेडूक आपलं आयुष्यमान शीत समाधी आणि उष्ण समाधी घेऊन वाढवतो, थोडक्यात कॅटाबोलिझम थांबवतो.

तुम्हांला साईबाबाचं उदाहरण माहितच आहे. त्याहीपुढे आणखी एका संतांचे उदाहरण देतो. माणिक नगरचे माणिकप्रभू, ज्यांना आतल्या बाजूला (Intistanal Cancer) आतड्याचा कॅन्सर झाला. या कॅन्सरमधून सुटका होणे नाही म्हणून त्यांनी ते गळू बाहेरच्या बाजूला आणले आणि साफ करुन आपलं आयुष्य सहा वर्षांनी वाढविले. झालेल्या कॅन्सरमधून पेशीचं मरण त्यांनी थांबवलं. त्यांनी देवाला कसली लाच दिली नाही, की कसला नवस बोलले नाहीत. परंतु देवाचे नामस्मरण मात्र केलं, त्याचा जप केला. भगवंताच्या नामस्मरणाने आपले आयुष्य वाढविले.

ही मागील उदाहरणे मी तुम्हांला सांगितली, आणखी एक उदाहरण अगदी अलीकडचं, माझ्याकडे भट्ट कुटुंब येत असे. त्यातील प्रकाश भट्ट याला ब्रेन ट्युमर झाला होता. डॉक्टरांनी निकाल दिला हा फक्त सहा महिने जगेल. तुम्ही ऑपरेशनच्या भानगडीत पडू नका. फक्त त्याच्या आईचा माझ्यावर विश्वास होता. तिने मला उपाय विचारला, ती दत्तभक्त असल्याने दत्त महाराजांच्या मंत्रांचा प्रभाव तिला माहित होता. मी तिला दत्तमहाराजांचे एक स्तोत्र ''घोरकष्टोध्दरण'' करायला सांगितले. केव्हा ? जेव्हा प्रकाशला ऑपरेशन थेटरमध्ये घेऊन जाणार त्यावेळेपासून ऑपरेशन होईपर्यंत. त्याप्रमाणे त्या माऊलीने हे अनुष्ठान केले. ऑपरेशन कामयाब ! प्रकाश सुखरुप ! आज पाच वर्षे झाली तो ठणठणीत बरा आहे आणि मानवी स्वभावानुसार...... असो.

माझा मुद्दा असा, आपण हे सर्व करु शकतो. बाबा-बुवा यांचेकडे जाऊन पैसा खर्च करुन नुकसान करुन घेत असतो. शाम मानव यांचं पुस्तक वाचलतं तर कळेल की या जगामध्ये बरीच जनता अंधश्रध्देची बळी पडलेली आहे आणि आजही अंधश्रध्देच्या नावाने मृत्यूही पडत आहे. ही भोंदूगीरी जगामध्ये माजलेली आहे. म्हणून चमत्कारांच्या मागे जाऊ नये.

माझ्याकडे येणाऱ्यांना मी साधना शिकवतो, मंत्र शिकवतो, पठण पध्दती शिकवतो, नामघोष शिकवतो आणि नुसतं शिकवत नाही तर ते करुनही घेतो. त्याची उजळणी घेतो. त्यांना सामर्थ्यशाली बनवतो. योग्य वेळेला योग्य काही केलं तर त्याचं योग्य फळ मिळतं. हे सर्व तुमच्या हिताचं आहे.

या जगामध्ये विश्वसनीय काही नाही. तरीही आपल्याला चांगलं जीवन जगायचं आहे. हे जीवन कसं ? आजचं जीवन स्पर्धात्मक आहे. या स्पर्धात्मक जीवनात तुम्ही उतरलं पाहिजे. त्यात पास झालं पाहिजे. पास होण्यासाठी एकतर तुम्ही मोठ्या बापाचे असलं पाहिजे किंवा तुम्ही स्वत: आपोआप मोठं असलं पाहिजेत. तुमचं बोलणं चांगलं असलं पाहिजे, तुम्ही ज्या सोसायटीत राहाता ती उच्च असली पाहिजे. थोडक्यात तुमचं व्यक्तीमत्व मोठं असायला हवं. तुमचं बोलणं प्रभावशाली असलं पाहिजे. ज्याच्या समोर मी बोलेन त्याने मला मान्य केलं पाहिजे, याचा अर्थ जीभेत सामर्थ्य असायला हवं. माझ्या जीभेद्वारे येणारे विचार

मेंदूतून येतात. हा मेंदू आपण नामघोषाने, जपाने स्वच्छ करावा. अर्थात वाईट विचार, वाईट गोष्टी काढून टाकाव्यात.

हे कसं करता येईल ? माझा मेंदू मला चांगला कसा करता येईल ? त्यासाठी तसं वातावरण निर्माण केलं पाहिजे. वातावरण निर्मिती शिवाय आपल्याला कोणतीही गोष्ट पटत नाही. वातावरण निर्मिती याचा अर्थ असा, किर्तनकार वातावरण निर्मिती करतात, ''रामकृष्ण हरी'' असा घोष १०-१५ मिनिटे करतात. आपण एखाद्याच्या लग्नाला जातो, हॉलमध्ये जाताना दरवाज्यातच तुमचं स्वागत अत्तर लावून केलं जाते. हातात गुलाबाचं फूल दिलं जातं, त्याच्याबरोबर एक पेढा दिला जातो. आतमध्ये गेल्यावर बसायला जागा दिली जाते. अशा तऱ्हेने लग्नाला तुम्ही आला आहात ती वातावरण निर्मिती केली जाते.

वातावरण निर्माण केल्याशिवाय प्रश्न कळत नाहीत, शिकता येत नाही आणि मेंदूला काही ग्रहण करता येत नाही. यासाठी प्रथम जीभेला ''रामनामा'' ची गोडी लावली पाहिजे. ही गोडी जेव्हा वाढत जाईल तेव्हा जीभेद्वारे मेंदूकडे जाणाऱ्या संवेदना ह्या परमेश्वरी असतील. त्यातूनच आपला मेंदू वाईट विचार, घाणेरड्या वासना यातून स्वच्छ होऊन, ताजातवाना होऊन, चांगल्या म्हणजे परमेश्वराच्या नामाने भरुन जीवनात चांगल्या गोष्टी घडत जातील. जीवन सुखी होईल. जीवनात यशाच्या पायऱ्या आपोआपच चढल्या जातील!

आपल्या जीवनात बरेच बदल घडत असतात. काही घटना घडत असतात. काही फायद्याच्या असतात. काहीत नुकसान होते. बऱ्याच वेळी आपल्याला वाईट अनुभव येतात. त्यात आपण खचले जातो. योग्य निर्णय घेता येत नाहीत आणि माणूस सदोदित कुठल्या ना कुठल्या चिंतेत दबला जातो, त्यात भरडला जातो.

माझ्याकडे बरीच माणसे येतात, त्या बऱ्याच माणसांना भेडसावणारा प्रश्न असतो तो पैशांचा! पैसा घरात रहात नाही, त्यासाठी मी उपाय सांगितला, मंगळवारी नखे काढायची, ती जमिनीवर पडू द्यायची नाहीत, कागदामध्ये गोळा करुन रस्त्यावर फेकून द्यायची. लग्न जमत नाही, त्याच्यासाठी मी सांगितले, मंगळवारी गणपतीला ''सफेद फूलाने'' पुजायचे (एका फूलाने). हे साधे साधे उपाय आहेत. याच्यापलीकडे काही उपाय आहेत.

प्रापंचिक सुखाच्या पलीकडे परमार्थामध्ये गुरुंकडे असं काही कोणी मागत नाही. साईबाबा साध्या-सोप्या भाषेत सांगतात, ''मी तुम्हांला फेटा द्यायला बसलो आहे, मग तुम्ही चिंधी का चोरता?'' प्रापंचिक विषयामध्ये देव, नाही म्हटले तरी बरीच कामे करतो. प्रश्न असा पडतो, देव कोणाची कामे करतो? जसं माणसामध्ये आपल्याला अधिकार लागतो की दुसऱ्याला सांगायला आणि त्याने आपलं काम करायला. माझं जर त्याच्यावर प्रेम असेल किंवा काही अधिकार असेल, तर ज्या भक्ताने देवावरचं प्रेम, अधिकार, त्याच्या नामस्मरणातून, भक्तीतून मिळविला असेल, त्याच्यासाठी देव धावून जातो. त्याची कामे करतो. बऱ्याच वेळा हा अधिकार, प्रेम आपलं नसतं.

आपण उदाहरण बघू या; नवस हा प्रकार असा असतो, माझं देवा अमूक काम झालं, तर तुझं नामस्मरण करीन किंवा आणखी काही. या निमित्ताने त्याने देवाची आठवण केली. आपलं काम झालं की येणेप्रमाणे बोललेला नवस माणूस विसरतो.

आपली बरीच कामे त्यानंतर अडतात ती नवस न फेडल्यामुळे! ते शोधून काढावं लागतं. तेव्हा नवस करतो म्हणजे देवाचं स्मरण करतो आणि सोयीस्करपणे ते विसरुन जातो. देव इकडे-तिकडे नाही. तो आपल्यातच आहे. तुम्ही मागताना देवाकडे काही मागू नका. जसं तुमचं नामस्मरण, तसं तुम्हांला मिळत जातं. जैसा देशी तैसा घेशी, ऐसा उदार! हे देवाचं गणित आहे. हे नीट समजलं पाहिजे. म्हणून आपल्या ज्या काही चुकीच्या कल्पना असतात, त्या दुरुस्त करुन घेतल्या पाहिजेत. आपण देवाला हाक मारतो आणि ती हाक देव ऐकत नाही. याचं कारण आपला देवाकडे काही अधिकार नाही. हा अधिकार देवाकडे पोहोचण्यासाठी काही गोष्टी आहेत.

पहिली गोष्ट, गुरुंमार्फत देवाकडे जाता येतं. कसं? तुमचे जे पूर्व जन्म असतात, त्या जन्मात जे मंत्र तुम्ही म्हटलेलं असतात, त्याचं ऋण गुरु तुम्हांला देतात. अशा तऱ्हेने त्या मंत्रांची संख्या, कित्येक जन्मातील अशी मिळून बारा कोटी गुरु करतात आणि तुमचं जीवन सत्वपूर्ण करतात.

जसं सीतेचं, बलरामाचं, कृष्णाचं, जीजाबाईचं, तसं आपलं जीवन गुरु सत्वपूर्ण म्हणजे रज आणि तम गुणांमध्ये न ठेवता करतात. तर रज आणि तम या

गुणांमध्ये असलेला माणूस ओळखावा कसा? जो थोडीफार संधी मिळाली की हात मारण्याचा प्रयत्न करतो, तो तम गुणामध्ये मानला जातो. जे महापुरुष इत्यादींची पूजा करतात ते रजोगुणी असतात. ज्या वेदातील देवता, त्यांना पुजणारा सत्वगुणी असतो.

आता सत्व गुणी असणे, आपलं काम करुन घेणे यासाठी किती देवतांची मदत लागते? २४ देवतांची मदत लागते. आपल्या शरीरामध्ये प्रमुख नाड्या २७! त्यातील तीन बंद आहेत, त्या पारमार्थिक क्षेत्रातील अर्थात उन्मर्णीय अवस्थेतील आहेत. या अवस्थेत माणूस जेव्हा जातो, तसतसा त्या नाड्या उघडत जातात.

या २४ नाड्यांवर २४ देवता आरुढ आहेत. यामध्ये वीर हनुमान ही देवता आहे. वीर हनुमान म्हणजे रामदूत हनुमान नव्हे. भूत-पिशाच्च, वेताळ यांचा प्रमुख! त्याचं पूजन शनिवारी होत नाही. तर बुधवारी होते.

या २४ नाड्यांवरील २४ देवता गायत्री मंत्रांमध्ये आहेत. जर २४ लाख गायत्री जप झाला तर गायत्री देवता प्रसन्न होते. इतका जप होईपर्यंत आपण म्हातारे झालेले असतो. त्यावेळी आपण काय मागणार?

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# धारणाशक्ती संचलन

आपण जी ‘‘ध्यान-धारणा-समाधी’’ म्हणतो, त्यातील धारणा हा भाग महत्वाचा आहे. मी तो शिकवतो. या धारणेने आजारपण (दुसऱ्याचे) घेता येते, तसेच आपले आजारपण काढता येते. धारणेनं आपलं मन जे कमकुवत असते ते प्रबळ करता येते.

# धारणाशक्ती संचलन

बऱ्याच जणांना महत्वाच्या दोन-तीन गोष्टी पाहिजे असतात. लग्न झालेलं नसेल तर ते व्हावे, लग्न झालेल्यांना संतान हवं असतं, संतती चांगली व्हावी असं वाटतं, चांगली याचा अर्थ ती आई-वडिलांच्या डोक्याला ताप देणारी नसावी, कुणाला संपत्ती हवी असते, संपत्ती असली तर ती घरात रहात नाही. त्याला पाय फुटतात; कारण नवरा जुगारी, दारुड्या इत्यादी ! कशी संपत्ती राहणार ? तर ती टिकावी असं बऱ्याच महिलांच्या तक्रारी येत असतात, यासाठी काही उपाय आहेत.

मंगळवारी नखे काढणे, गुरुवारी दत्त महाराजांचे दर्शन घ्यायचे. कारण आपला गुरु (ग्रह) प्रबळ नसतो. तो दत्त महाराजांच्या दर्शनाने गुरु (ग्रह) प्रबळ होतो. शुक्रवारी देवीला गुळचणे वहाणे, गजरा वाहणे कारण देवी ही संपत्तीशी संबंधीत आहे. ज्या देवीच्या समोर चंडीहोम होतो त्या देवीच्या दर्शनाला जाणे, कमीत कमी पाच शुक्रवार देवीकडे वेणी घेऊन गेले पाहिजे. थोडक्यात संतती आणि संपत्ती दोन्ही देवीच्या हातात आहेत.

आमच्या घरी दर शुक्रवारी चणे आणि गुळ वाटलं जातं. त्यावेळी आम्ही ठाण्याला रहात होतो. माझी पत्नी २१ दिवसांचे उपवास करीत असे. बरीच वर्षे निघून गेली. साध्य काही झालं नाही. त्यानंतर आम्ही लालबागला राहायला आलो. येताना सर्व सामान घेऊन आलो. मी थोडं नवीन घर म्हणून बरेच बदल केले. आमची लाकडी शोकेस होती, त्यामध्ये संतोषी मातेचा फोटो होता. तो नव्याने लावला, त्यावर माझ्या पत्नीने गजरा लावला आणि चणे-गुळ यांचा प्रसाद चढवला. असे तीन शुक्रवार झाले. चौथ्या शुक्रवारी आमच्याकडे एक बोहारीन आली. (बोहारीन म्हणजे कपडे घेऊन भांडी देतात ती) ही पहिलीच वेळ आली होती. तिला मी कधी पाहिलं नव्हतं. अंगावर बरेच दागिने होते. (खरे दागिने) तिने मला तिच्या डोक्यावरची फाटी उतरवायला सांगितली. मी आपला तिला फाटी उतरवायला मदत केली. मला म्हणाली, मला चहा हवा आहे. माझी पंचाईत झाली. कारण पत्नी घरी नव्हती, मला स्टोव्ह पेटवायचा कंटाळा. तरीही स्टोव्ह पेटवून तिला चहा करुन दिला. चहा पिऊन ती निघून गेली.

काही वेळानंतर माझा एक मित्र आला. एअरफोर्समध्ये होता. रिटायर्ड झाल्यावर तो गॅसची एजन्सी करायचा. मी त्याचं कधी काळी एक काम केलं होतं. मला भीतभीत त्याने विचारले, साहेब तुमच्याकडे सर्व आहे; पण एक गोष्ट नाही ? गॅस! आपण परवानगी दिलीत तर एका तासाच्या आत मी तुम्हांला नवीन गॅस आणून देतो आणि त्याने तासाभरात गॅस, त्याची शेगडी आणून लावली सुध्दा!

सांगण्याचा माझा मुद्दा असा, मी आणि माझ्या पत्नीने देवीची सेवा सुरु केली, त्यानंतर मला कधीही कशाचाही तुटवडा पडला नाही. पैसाही आला पण मी त्याचा दुरुपयोग केला नाही. हे जर तुम्ही नीटपणे केलंत तर तुमच्याकडे जे येतं ते जाणार नाही. त्याचा सदुपयोग केला पाहिजे. यासाठी जो पाया आहे, जो मी शिकवतो, तो अथर्वशीर्ष, गुरुगीता, संतचरित्राचं पठण ह्या गोष्टी आपल्या हातून झाल्या पाहिजेत. मग आपल्याला आवश्यक ते सुख मिळवता येते.

आपण जी ''ध्यान-धारणा-समाधी'' म्हणतो, त्यातील धारणा हा भाग महत्वाचा आहे. मी तो शिकवतो. या धारणेने आजारपण (दुसऱ्याचे) घेता येते, तसेच आपले आजारपण काढता येते. धारणेनं आपलं मन जे कमकुवत असते ते प्रबळ करता येते. काहीवेळा आपल्या बोलण्यात संकल्प असतो (वाईट असो वा बरा). तुम्हांला भस्मासूर-मोहिणीची गोष्ट माहित असेल. भस्मासूर याचा अर्थ आपणच आपला नाश करणे. प्रत्येक व्यक्ती स्वत:च स्वत:चा नाश करत असते. तो स्वत:हून नाशाकडे जात असतो. परंतु धारणा करणारा माणूस ह्या सर्व गोष्टी फेकून देऊ शकतो. धारणा म्हणजे प्रथम आपल्या शरीरावर नियंत्रण करता आले पाहिजे.

दुसरा मुद्दा असा की, बऱ्याच वेळा बऱ्याच लोकांना असं वाटतं की आमच्या वाट्याला दु:खं का ? तुम्ही जे कधी पाप केलेलं असतं त्याचं फळ म्हणजे दु:ख आणि कधी तरी पुण्य केलेलं असतं त्याचं फळ म्हणजे सुख. समजा पुण्य आपल्या बँकेत असेल, त्याचं सुख भोगताना ते संपून जातं आणि जेव्हा आपण बँकेत आपली जमा विचारायला जातो तेव्हा आपल्याला उत्तर मिळतं there is no sufficient fund म्हणून मी कुंतीचं उदाहरण देतो. तिने कृष्णाकडे दु:खंच मागितली; कारण दु:खं भोगताना जी काही पापं असतील ती संपून जावीत, दु:ख काळामध्ये पाप संपवताना देवाची आठवण येते. एरवी देवाची आठवण माणसाला


येत नाही. तेव्हा दु:खाचे भांडवल करु नये.

गुरुचरित्र जे वाचतात, त्यांना माहित आहे की दु:ख भोगल्या शिवाय मार्ग नाही. गुरु असतील तर ते आपल्या शिष्याचं दु:ख सौम्य करतील. म्हणून दु:खाचा बाऊ करता कामा नये. ''दु:खाशिवाय परमेश्वर प्रार्थना होत नाही आणि परमेश्वर प्रार्थना झाल्याशिवाय संचित म्हणा क्रियमान म्हणा, प्रारब्ध म्हणा, दैव म्हणा, हे संपवता येत नाही''.

मी असं म्हणतो, आपलं चित्त शुध्द नाही ते शुध्द करण्यासाठी आज कोणताही साबण बाजारात उपलब्ध नाही. एकच मार्ग, परमेश्वराचे शुध्द भावनेने केलेले स्मरण. याचा अर्थ देवाकडे जायचं पण काही मागायचं नाही. फक्त देवा दे ! हेच साकडे देवाच्या मागे आपण लावलेले असते.

यासाठी मी माझ्याकडे येणाऱ्या भक्तांना मानसिक संकल्प शिकविताना सांगतो, ''देवा मला तुझ्या भक्तीच्या कक्षेत घे'' मग देवाला आपोआपच वाटते हा भक्त माझ्याकडे काहीच मागत नाही, मग तो स्वत:हून भरभरुन देत राहतो. कामना पूर्ण करुन, भक्ताला तृप्त करतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# स्मरणशक्ती वाढविणे.

माझ्या दृष्टीने बिनमहत्वाच्या गोष्टीही आपल्या लक्षात रहायला पाहिजेत. थोडक्यात निरुपयोगी गोष्टी लक्षात ठेवणे म्हणजेच स्मरणशक्ती वाढवणे. निरुपयोगी लक्षात ठेवण्यासाठी काय करावं ? मी ते तुम्हांला शिकविले आहे. 'अगरबत्ती त्राटक.' ते केलं असता नजर स्थिरावते, नजर स्थिरावते तेव्हा लक्षात रहाण्याची स्थिती निर्माण होते.

# स्मरणशक्ती वाढविणे.

चातुर्मासामध्ये माणसे लसूण आणि कांदा खात नाहीत. माझं म्हणणं आहे, माणसाने लसूण ही खावीचं. आपलं जे हृदय चालतं, ते थायमस नावाच्या ग्रंथीमुळे. ही ग्रंथी बऱ्याच गोष्टी करत असते. त्यातील प्रमुख गोष्ट, आपल्या मनाची एकाग्रता वाढविण्याचे काम करते. यासाठी आपण थायमस ग्रंथीला कामाला लावले पाहिजे.

भीती वाटणे, छातीत धडधड होणे, हे सर्व प्रकार थायमस ग्रंथी काम न करण्यामुळे होतात. जेव्हा आपण थायमस ग्रंथीला कामाला लावतो तेव्हा मनाची एकाग्रता वाढते आणि मनाची एकाग्रता वाढली की आपली स्मरणशक्ती वाढू लागते. ही ग्रंथी कामाला लागण्यासाठी काय करावं ? त्यासाठी काही योग्य खाणं हवं, हे कोणतं ?

सर्वात उत्तम, सोयाबीन! यात नत्रयुक्त पदार्थ आहेत. हे नत्रयुक्त पदार्थ पोटात गेल्याशिवाय थायमस ग्रंथी काम करीत नाही. तसेच तुपात किंवा ताकात भिजवलेली लसूण खाणे, नुसती लसूण नाही. थोडक्यात मनाच्या एकाग्रतेसाठी थायमस ग्रंथी चांगली झाली पाहिजे. ती काम करु लागली पाहिजे.

आपल्याकडे एक वस्तू येते, केळफूल! ज्याला आपण बोंडाची भाजी म्हणतो. पण नुसती बोंडाची भाजी खाऊ नये, त्यात काळे वाटाणे टाकून ती भाजी खावी. काळे वाटाणे एवढ्यासाठी टाकायचं की, केळफूलामध्ये डी-४ हे विटामीन नसते, ते काळ्या वाटण्यातून मिळते. हे आहाराचे नाना प्रकार आहेत, त्याने थायमस ग्रंथी वाढते.

आपण आहार घेताना बऱ्याच चुका करतो. काही माणसे (मोठी) मटण वगैरे खाल्यानंतर आईस्क्रीम खातात, काही लस्सी पितात. मटण खाल्ल्यानंतर दुधाचा कोणताही प्रकार खाऊ नये, त्यामुळे थायमस ग्रंथी काम करण्याचे थांबवते. हे प्रकार, आम्ल म्हणजे थोडक्यात विष आपल्या शरीरात निर्माण करतात. या थायमस ग्रंथीचा आणि मेंदूचा काही परस्पर संबंध आहे, जो स्मरणशक्तीत येतो.

आपला मेंदू उपयोगी गोष्टी लक्षात ठेवतो आणि निरुपयोगी गोष्टी सोडून देतो. उदाहरणार्थ आपण रस्त्याने चालत असताना शेकडो माणसे आपल्या समोरुन,

आजूबाजूने जात असतात, त्या सर्वांचे चेहरे आपल्या लक्षात राहतात का? नाही. कारण ते निरुपयोगी आहे. म्हणून मेंदू ते सोडून देतो. तेच जर कोणी चमत्कारीक माणूस आपल्यासमोर आला, विचित्र बोलू लागला, हातवारे करु लागला, तर ते आपल्या लक्षात राहते. आपण त्याला म्हणतो कॉन्ट्रास (Contrass) याचा अर्थ मेंदू उपयोगी वाटणाऱ्या गोष्टी लक्षात ठेवतो, परंतु कधी निरुपयोगी गोष्टीही त्याला उपयोगी वाटली तर तो लक्षात ठेवतो.

माझ्या दृष्टीने बिनमहत्वाच्या गोष्टीही आपल्या लक्षात रहायला पाहिजेत. थोडक्यात निरुपयोगी गोष्टी लक्षात ठेवणे म्हणजेच स्मरणशक्ती वाढवणे. निरुपयोगी लक्षात ठेवण्यासाठी काय करावं? मी ते तुम्हांला शिकविले आहे. 'अगरबत्ती त्राटक.' ते केलं असता नजर स्थिरावते, नजर स्थिरावते तेव्हा लक्षात रहाण्याची स्थिती निर्माण होते.

आपण जे लक्षात ठेवतो त्यातील एक पध्दत, नोंदणी पध्दतीने लक्षात ठेवतो. पेटी म्हटल्यावर ती पेटी वाजविणारा हा लक्षात राहातो. म्हणजेच नोंदणी. दुसरी पध्दत साखळी पध्दतीने लक्षात ठेवणे. समजा एक मनुष्य निवडणूकीला उभा राहिला. निवडणुकीला उभे राहणे म्हणजे आठवतं, गेल्या निवडणूकीत अमक्यानं मला मदत केली, त्याने मला पैसा दिला, दुसऱ्याने कचेरी बांधली, ह्या सर्व गोष्टी लक्षात रहातात. साखळी पध्दतीत मेंदूच्या पेशी काम करतात (म्हणजे भावंडं). ह्या पेशी कामे वाटून घेतात. त्या पेशीच्या भोवती एक पातळ पदार्थ असतो. त्यात विद्युत कंपनं भारीत होतात, आणि साखळी पध्दतीने गोष्टी लक्षात राहातात.

तिसरी गोष्ट फास्ट रिडींग! जलद वाचणे! यासाठी काय लागतं? 'पश्यंती दर्शन!' हे पश्यन्ती दर्शन म्हणजे काय? डोळ्याकडून चित्र मेंदूकडे जाऊन, मेंदूकडून अर्थ करुन तो रवंथ करणे, याला म्हणतात पश्यन्ती दर्शन. मी ज्या स्मरणशक्तीच्या पायऱ्या सांगितल्या, त्या सर्व पायऱ्या, त्राटक, मानसिक त्राटक आणि पश्यन्ती दर्शन यावर अवलंबून असतात. जेव्हा ह्या तिन्ही गोष्टी पूर्ण होतात, तेव्हा स्मरणशक्ती पूर्ण होते. स्मरणशक्ती पूर्ण करणे म्हणजेच वरुण उपासना करणे. जी भगवान कृष्णाने केली आणि सहा महिन्यात ७ वर्षाचा अभ्यास पूर्ण केला. तो भाग प्रत्यक्ष केला पाहिजे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# कृष्ण भेटीसाठी कृष्णभक्ती.

कृष्णाचे अनुभव बऱ्याच जणांना येतात. नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर यांना आलेले अनुभव त्यांनी आपल्या अभंगातून, गवळणीतून मांडलेले आहेत. इतकचं काय एका मुसलमान बादशहाला सुध्दा कृष्णाचे दर्शन घडलेले आहे. त्याचं नावं आहे 'सिकंदर योगी.'

# कृष्ण भेटीसाठी कृष्णभक्ती.

कृष्ण हे माझं अतिशय लाडकं दैवत आहे. कृष्णाची भक्ती ही सोपी भक्ती आहे. ज्याला ध्रुव भक्ती असं म्हणतात. त्याच्या लहानपणातील खोड्या बरचं काही शिकवून जातात. जेव्हा गोपी यशोदेकडे तक्रार घेऊन येतात तेव्हा यशोदा त्याला दोरीने बांधून ठेवते. त्यावेळी तो ती दोरी तोडतो (यात चमत्काराचा भाग नाही.) आणि यशोदेला दाखवून देतो की मला कुणीही बंदी करु शकत नाही, मी मुक्त आहे, मला माणूस बांधून ठेवू शकतो पण प्रेमाने! मी माझ्या भक्तांचा नोकर होऊ शकतो, तो त्यांच्या भक्तीने! त्यांच्या प्रेमाने! मला फक्त प्रेम बांधू शकते.

हा कृष्ण (बालकृष्ण) गोप-गोपींना, सर्वांना सांगतो, तुम्ही भूमीची पूजा करा, गोवर्धन आपलं रक्षण करतो, त्याची पूजा करा; परंतु इंद्राची पूजा करु नका. इथे त्याने क्रांतीकारक पाऊल टाकले आहे. अंधश्रध्देला तडा दिला आहे. सर्व गोकुळवासीयांना योग्य दिशेने नेण्याचा कृष्णाचा प्रयत्न आहे. तुम्हांला सांगायला वाईट वाटते, कृष्णापासून इंद्राची पूजा बंद झाली ती आजतागायत. इंद्राची पूजा केली जाते, वर्षातून एकदा, पण आपल्याला ते माहित नाही. होळीच्या ठिकाणी जो दगड ठेवला जातो, तो पूजला जातो, ही इंद्राची पूजा.

जेव्हा कृष्ण-बलराम मथुरेला निघाले. वृंदावनातून कृष्ण मथुरेला आल्यानंतर परत वृंदावनात गेला नाही. पुन्हा कधीतरी वृंदावनात जाण्याचा योग आला तेव्हा कृष्णाने बलरामाला तेथे पाठविले. बलरामाने विचारले, ''कृष्णा असं का? तू वृंदावनात का येत नाहीस?'' तेव्हा कृष्णाचे उत्तर असं की, त्यांच्या वाट्यातील आयुष्य आणि चैतन्य माझ्यासोबत जोडलेलं होतं, ते मी त्यांना दिलेलं आहे. याच्यानंतर एकही अंश मी त्यांना देणार नाही, त्यांना वैकुंठ लोकाचा मार्ग मी मोकळा करुन दिला आहे. ते सर्व पूर्वीचे पिढ्यान पिढ्या मुक्त जीवन भोगतील, त्याचं जे पूर्वीचे काही कर्ज माझ्यावर होतं त्याची परतफेड मी केली आहे. आता मला दुसऱ्यांची सेवा करणे भाग आहे.

मथुरेला येण्यापूर्वी कृष्ण राधेला भेटला, तेव्हा राधा म्हणाली, ''कृष्णा, तुझा विरह आम्हांला सहन होणार नाही.'' त्यावेळी कृष्णाने एक गाणं म्हटलं, इतकं की त्या गाण्याने राधेला, सर्व गोपींना विसरायला लावलं आणि कृष्ण नाहिसा झाला.

राधेच्या हातात मुरली देऊन! तेव्हा राधेला कळलं, आमच्या सर्वांचा सुखाचा मार्ग कृष्णाने या मुरलीद्वारे दिला आहे.

कृष्णाचे अनुभव बऱ्याच जणांना येतात. नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर यांना आलेले अनुभव त्यांनी आपल्या अभंगातून, गवळणीतून मांडलेले आहेत. इतकचं काय एका मुसलमान बादशहाला सुध्दा कृष्णाचे दर्शन घडलेले आहे. त्याचं नावं आहे 'सिकंदर योगी.' हा मथुरेचे मंदिर पाडायला निघाला. तेव्हा एका ब्राह्मणाने त्याला सांगितले, ''तुम्ही हे मंदिर पाडू नका. तुम्हांला कृष्णाची भेट घडवून आणतो.'' बादशहाने ते मान्य केलं. त्या ब्राह्मणाने भागवत ग्रंथाचे पारायण सुरु केले. त्या पारायणाचे बादशहाने आपल्या सैन्यासह सर्व नियम पाळले. परिणाम, सिकंदर योगीचं सर्व सैन्य कृष्णाच्या वेणू नादात तल्लीन झाले. सकल जगाचा त्यांना विसर पडला. बादशहाला कृष्णाचं दर्शन झालं. म्हणून बादशहाने तेथील ६४ चौरस किलोमीटर जमिन इनाम म्हणून दिली.

आजही ती इनाम म्हणूनच आहे. अशा बऱ्याच मुसलमान बादशहांना कृष्णाचं दर्शन झालं आहे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# व्रतस्थ राहण्याचे शिक्षण

व्रत करताना त्याचे काही नियम आहेत ते पाळले पाहिजेत. व्रत करताना मोठ्याने बोलायचे नाही अर्थात त्यात आज्ञा असता कामा नये. कोणाशी भांडता कामा नये. प्रेमाने सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. कारण आपण जे व्रत करतो त्यात काहीतरी उद्दिष्ट असतं, ते आपण देवावर सोपवलेलं असते.

# व्रतस्थ राहण्याचे शिक्षण

माझ्याकडे जी काही मंडळी येतात, त्यांना मी आध्यात्मिक अनेक मार्ग सांगतो. विशेषतः स्तोत्र-मंत्राचे शिक्षण देतो. नवरात्रात देवीचे मंत्र शिकवतो. त्यातील 'कुंजरिका स्तोत्र' हे महत्वाचे आहे. हे स्तोत्र पैसे देणारे आहे. ह्या स्तोत्राने कुलदेवतेचं स्मरण केलं जातं, त्याने कुलदेवता प्रसन्न होते. कशी प्रसन्न होते ?

तुम्हांला एक खरी गोष्ट सांगतो, आद्य शंकराचार्य यांनी कुंजरिका स्तोत्र म्हणून लक्ष्मीला प्रसन्न केलेलं आहे. लक्ष्मीला प्रसन्न कशासाठी करुन घेतलं ? एकदा शंकराचार्य नदीवरुन परत येत असताना उन्हामुळे ते तहानेने व्याकूळ झाले. तेथे असलेल्या एका घरात बाईकडे त्यांनी पाणी मागितलं. त्यावेळची पध्दत अशी की नुसतं पाणी दिलं जात नसे आणि त्या बाईकडे अठरा विश्वे दारिद्य्र. तिने तिच्याकडे असलेला आवळा शंकराचार्यांना दिला व पाणी दिले.

आवळा खाऊन झाल्यावर शंकराचार्यांनी त्या बाईला विचारले, ''आई तू एवढी गरीब का ?'' असं म्हणून त्यांनी तेथे कुंजरिका स्तोत्र म्हणण्यास सुरुवात केली. (हे लक्ष्मी स्तवन आहे.) पण कसं लक्ष्मी स्तवन. एकदम लक्ष्मी प्रसन्न होत नाही, प्रथम सरस्वती प्रसन्न होते, नंतर कालिका, त्यानंतर लक्ष्मी.

हे स्तोत्र पूर्ण झाल्यावर लक्ष्मी त्यांच्यासमोर साक्षात उभी राहिली. तिने शंकराचार्यांना विचारलं, ''बाळ तू मला इतकं का आळवलसं ? '' शंकराचार्य लक्ष्मीला म्हणाले, ''ज्या माऊलीने मला पाणी दिलं, तिची मी परतफेड करु इच्छितो. परंतु माझ्याकडे काही नाही म्हणून मी तुला आळवलं.'' लक्ष्मी म्हणाली, ''या बाईने मला लाथाडलं आहे. मी तिला काही देऊ शकत नाही. परंतु तुझ्यासाठी मी तिला काहीतरी देते. तिने तुला आवळा खावयास दिला, तद्वत मी तिच्या घरावर सोन्याच्या आवळ्यांचा वर्षाव करते.'' आणि लक्ष्मीने त्या बाईच्या घरावर सोन्याच्या आवळ्यांचा वर्षाव केला. माझ्या बोलण्याचा हेतू असा की, कुंजरिका स्तोत्राने लक्ष्मी प्रसन्न होते. (आपण अशी अभिलाषा धरु नका की आपल्याही घरावर सोन्याच्या आवळ्यांचा वर्षाव होईल.)

आवळ्याचं एक व्रत आहे. विष्णूला आवळा प्रिय का ? हे व्रत कठीण आहे. परंतु कुंजरिका स्तोत्राने लक्ष्मी, श्रीहरी, शिव हे आपल्याला प्रसन्न करुन घेता येतात. जी काही स्तोत्रे आहेत, सुक्ते आहेत, त्याने आपली पापं कमी करता येतात. बऱ्याच बायका बरीच व्रते करतात. व्रत करताना त्याचे काही नियम आहेत ते पाळले पाहिजेत. व्रत करताना मोठ्याने बोलायचे नाही अर्थात त्यात आज्ञा असता कामा नये. कोणाशी भांडता कामा नये. प्रेमाने सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. कारण आपण जे व्रत करतो त्यात काहीतरी उद्दिष्ट असतं, ते आपण देवावर सोपवलेलं असते.

थोडक्यात व्रत म्हणजे व्रतस्थ असणे. यासाठी मला सांगावसे वाटतं, व्रताने, स्तोत्राने, मंत्राने, परमेश्वराला साध्य करता येते, तो आपली कामे करतो, कारण अधिकार, प्रेम आपल्याला प्राप्त झालेलं असतं, म्हणूनच देव आपल्या हाकेला (गाडी-घोड्याची फिकिर न कराता) धावत सुटतो. परंतु हे केव्हा होईल, मी दिलेला मार्ग तुम्ही नीट हाताळलात, प्रामाणिकपणे तो मार्ग चोखळलात, तरच सर्व गोष्टी तुम्हांला प्राप्त होतील.

यासाठी आपल्या गुरुंवर नितांत विश्वास ठेवायला हवा, त्यांची कधीही निंदा करु नये. जी जगात ईश्वरी सत्ता नांदत आहे, त्या सत्तेवर आपण देवाच्या भक्तीने, त्याच्यावरील प्रेमाने सत्ता गाजवू शकतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# सर्व सोपवा त्याला

बऱ्याच परमेश्वर भक्तांना देवाचं दर्शन होत नाही, असं का? दर्शन देणे, भेट देणे म्हणजे द्वैत! मी वेगळा, तू वेगळा! भेट नाही, दर्शन नाही याचा अर्थ तो भक्त परमेश्वरमय होय. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, 'विठ्ठला भेटाया गेलो आणि विठ्ठलची होऊन ठेलो.'

# सर्व सोपवा त्याला

आपण बऱ्याच वेळा बघतो की जीवनात सतत अपयश येत असतं. त्याची कारणे आपल्याला माहित नसतात. काही वेळा आपल्या पूर्वजांच्या हातून काही चूका घडलेल्या असतात. त्या दुरुस्त कराव्या लागतात. त्यासाठी 'नारायण नागबली' करता येतो, 'सपिंडी श्राध्द' करता येते. आपल्या पूर्वजांनी काही धर्मसंस्कारामध्ये काही गोष्टींना वाव ठेवलेला आहे. त्यातील एक सोपा उपाय आहे तो नामजप. तो मी करुन घेतो. त्याला पाच-सहा वर्षांचा काळ जावा लागतो. त्यानंतर तुमचं जीवन अतिशय सुखमय होते. ह्यासाठी थोडी चिकाटी असायला लागते.

जेव्हा माणूस कळत नकळत पाप करतो ते नामजपाने जळून जाते. नामजप करताना सर्व कामे करता येतात, त्या कामातच देवाचे दर्शन होऊ लागते. बऱ्याच परमेश्वर भक्तांना देवाचं दर्शन होत नाही, असं का ? दर्शन देणे, भेट देणे म्हणजे द्वैत! मी वेगळा, तू वेगळा! भेट नाही, दर्शन नाही याचा अर्थ तो भक्त परमेश्वरमय होय. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, 'विठ्ठुला भेटाया गेलो आणि विठ्ठलची होऊन ठेलो.'

एकदा तुकारामांची पत्नी त्यांना म्हणाली, ''तुम्ही जे विठ्ठल-विठ्ठल करीत असता, पण विठ्ठलाने तुम्हांला कधी दर्शन दिलं आहे का ? मला दिलं ? कसं ? तर मी त्याला खेटरानं बडवलं, तेव्हा त्या काळ्याने माझा हात पकडला आणि मला विचारलं माझा अपराध काय? मी चकित झाले, कारण प्रत्यक्ष काळ्या माझ्यासमोर माझा हात धरुन उभा!''

तुकाराम महाराज म्हणाले, ''तू उद्या पुन्हा जाऊन त्याला विचार माझ्या पतीला दर्शन का देत नाहीस ?'' ती दुसऱ्या दिवशी पुन्हा विठ्ठलाकडे गेली. विठ्ठल समोर उभा! कशाला आलीस ? काय काम काढलंस ? माझा नवरा तुझी इतकी भक्ती करतो त्याला तू अजून दर्शन दिलं नाहीस! असं का ? तेव्हा विठ्ठल म्हणाला, ''तू तुझ्या नवऱ्याचे रात्री पाय चेपतेस, तेव्हा नवऱ्याकडे बघ, मग तुला समजेल!'' रात्री तुकारामांचे पाय चेपताना तिने तुकारामाच्या चेहऱ्याकडे पाहिलं तर विठ्ठलाचा चेहरा, असं सारखं तिला दिसू लागलं. तुम्हांला कळलं असेल जर

परमेश्वर आपल्यामध्ये विलीन होतो, तर त्याचं दर्शन कशासाठी ? 'जेव्हा भक्ताला देव भेटत नाही. तेव्हा तो उत्तम भक्तच देवमय होतो.'

दुसरं मी तुम्हांला अलीकडचं ताजं उदाहरण देतो, कोकणामध्ये चिंदर गांव आहे. या गांवात दत्त मंदिर आहे. तेथे दत्तावतार होऊन गेले. त्यांना काही नाव नव्हते, ज्या गावकऱ्याने त्यांना धरले त्या गावकऱ्याचे नांव पाताडे, ते त्यांनी धारण केले. त्याची सत्यकथा अशी, त्यांनी दत्तमहाराजांची भेट व्हावी म्हणून पंचगंगेच्या काठावर स्वतःला गळाभर गाडून घेतलं. शेवटी त्याच्यासमोर दत्त महाराज उभे राहिले. तूला भेट कशाला हवी ? मीच तुझ्यामध्ये घुसतो आणि दत्त महाराज त्यांच्यात घुसले.

ते फिरत फिरत चिंदरात आले. करवंद खायचे, मध्येच गुप्त व्हायचे. त्या गावातील बऱ्याच जणांनी त्यांना पाहिलं. हे प्रकरण प्रमुख गावकरी पाताडे यांच्या कानावर गेलं. आपल्या गावात कुणीतरी सत्पुरुष आला आहे व तो फिरत असतो. पाताडेंनी एक दिवस पाठीमागून जाऊन त्यांना मिठी मारली, त्यांना गावात घेऊन आले. पाताडेंनी विचारले, तुमचं आडनांव काय ? त्यांनी पाताडेंना विचारले, तुमचे आडनांव काय ? पाताडे ! माझंही पाताडे ! भक्ताची भक्ती इतकी असते की देव त्याचा देह व्यापून टाकतो.

आपलं चित्त अशुध्द, वाईट वासनांनी भरलेलं, म्हणून त्याच्यात परमेश्वर वास करत नाही. 'जसं जसं आपलं चित्त परमेश्वर नामाने शुध्द होऊ लागतं, तसा परमेश्वर आपल्यामध्ये नांदू लागतो.' त्यासाठी भजन, मंत्र हे मार्ग आहेत. विचार स्वच्छ असले पाहिजेत. विचार स्वच्छतेसाठी पारायण (संतचरित्र पठण) करावे. संतचरित्र पठणाने वाईट विचार लोप पावतात आणि चांगले विचार येऊ लागतात. म्हणून विचार, आचार आणि उच्चार ह्या तीन सोप्या गोष्टीतून परमेश्वराकडे जाता येते. आपल्या मनामध्ये शंका असते, देवाचे काही खरं नाही, का शंका असते ? कारण आपण आयुष्यात देवाचे काही करत नाही आणि प्रसंग आल्यावर देवाला म्हणतो धाव ! आपण काही केलेलं नाही तरीही देव दयाळू आहे, त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे आणि त्याच्यावरचं सर्व सोपवलं पाहिजे तरच ती जबाबदारी देव सांभाळतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# तालमय विश्व

भगवान कृष्णाने माणसाचं जीवन बदलण्याचा प्रयत्न केला! कशाप्रकारे ? कृष्णाने मुरलीचं महत्व वाढवलं म्हणजे वेणूनाद! या वेणूनादावर माणसाने आपलं जीवन रंगवावं, असं कृष्णाने बालपणापासून सर्वांना मार्गदर्शन केलं आहे.

# तालमय विश्व

हिंदू धर्माप्रमाणे आपण ३३ कोटी देव म्हणतो. कोटी याचे संस्कृतामध्ये दोन प्रकार होतात. पहिला, कोटी म्हणजे ''प्रकार'' आणि दुसरा ''धनुष्याच्या बाणाचे टोक''. धनुष्यकोटी म्हणजे बाणाच्या टोकाने निर्माण केलेले तीर्थ. तेहतीस कोटी, याचा अर्थ तेहतीस प्रकार. ते कोणते ?

अकरा रुद्र - (शंकराचे गण मानले जातात.)

बारा आदित्य - ( १२ सूर्य) म्हणजे सूर्याचे १२ प्रकार

आठ वसू - (भीष्म हा आठ वसूंपैकी एक)

अष्टदिक्पाल - आठ दिशांचे प्रमुख

इंद्र - याचं पूजन कुठेच होत नाही. परंतु त्याचं पूजन होतं. पूर्वी गणेशचतुर्थीच्या ऐवजी इंद्रोस्तव साजरा करायचे. त्यावेळी जो झेंडा उभा करायचे त्याला म्हणायचे भगवन भजगण. त्याच्यापासून झाला ''भगवा झेंडा'' हा झेंडा म्हणजे काठी उभी करायचे, त्याच्या मूळामध्ये इंद्राची पूजा करायचे. ही २००० वर्षापूर्वीची गोष्ट आहे. तेव्हा गणपती माघात पूजायचे. लोकांना इंद्र पूजायला हवा होता, त्याचं काहीतरी पूजन करायचं होतं म्हणून त्याचं पूजन होळीत करु लागले.

प्रजापती - याचं पूजन होमाद्वारे करतात. खरं तर प्रजापती याचा अर्थ यज्ञ, विश्व निर्माता. होमामध्ये प्रथम पूजन प्रजापतीचे केलं जातं.

अशाप्रकारे हिंदू धर्मामध्ये ३३ कोटी देव आहेत, असं वेदामध्ये सांगितले आहे. त्याला त्यांनी नाव दिलं ''द्यू'' म्हणजे ''दिव्यत्व'', ''तेज''. हे जे तेज आहे याचा अर्थ आपण प्रकाश असा करतो, तो नसून तेज म्हणजे ''जीवंतपणा''. आपल्या लक्षात येईल, आपल्या पूर्वजांना अभिप्रेत होता तो देव एकच आहे.

कार्यानुसार त्यांनी देवाचे वेगळवेगळे भाग केले. जसे ब्रह्मा, विष्णू आणि महेश.

त्याकाळात यज्ञामध्ये पशूंना बळी दिले जात असे. लोक अनेक पशू मारत असत. सर्व लोक मांसाहारी होते. कृष्णाने त्या काळात ओळखले की यापुढे सतत पशू हत्या होणार आहे आणि त्यात हिंदूधर्माचा लय होणार आहे. (त्यापुढील काळात गौतम बुध्दाने पशू हत्या बंद केली.)

हे द्रष्टेपणाने ओळखून कृष्णाने मोहीम उघडली ती वेगळ्या अर्थाने. त्यावेळी त्याने प्रथम गोवर्धन पर्वताचे महत्व सांगितले. भूमीपूजन करायला सांगितले. आमचं गोधन म्हणजे गाई, गुरे, खिल्लारे, त्यांचं महत्व वाढविले पाहिजे. आपण गाईंना दूध देणाऱ्या असं समजतो, याच्यापेक्षाही गाईचं महत्व होतं.

आपण जशी कुठलीही गोष्ट पैशात मोजतो तसं त्याकाळात नाणं, गाय होती. तू मला तुझी मुलगी दे त्याच्याबद्दल मी तुला पाच गाई देतो. म्हणजे मुलीची किंमत पाच गाई. गाय हे चलन होतं ती देऊन तिच्याबद्दल दुसरी गोष्ट घेतली जाई. त्याच्या अगोदर आर्य हे वासरु कापत असत, त्याचं मासं वाटलं जात असे, म्हणून शाकाहारासाठी शेतीचा पुरस्कार केला पाहिजे, जो त्या काळात होत नव्हता.

त्यासाठी कृष्णाने गाई-गुरांचं महत्व वाढवलं, चराऊ कुरणाचं महत्व वाढवलं. पशूपक्षांची हत्या बंद केली, म्हणजे साडेतीन हजार वर्षांपूर्वी कृष्णाला कळलं, पर्यावरण व्यवस्थित चालवण्यासाठी पशु-पक्षी आवश्यक आहेत.

भगवान कृष्णाने माणसाचं जीवन बदलण्याचा प्रयत्न केला! कशाप्रकारे? कृष्णाने मुरलीचं महत्व वाढवलं म्हणजे वेणूनाद! या वेणूनादावर माणसाने आपलं जीवन रंगवावं, असं कृष्णाने बालपणापासून सर्वांना मार्गदर्शन केलं आहे. (आपल्या गुरुंकडे शिकायला जायच्या अगोदर.)

सांदिपनी ऋषींनी कृष्णाला जे काही शिकवलं आहे, ते बासरीच्या संबंधीत, वेणूच्या संबंधीत आहे. पण थोडं निराळं आहे.

वेणू याचा अर्थ पोकळीमध्ये हवा फुंकणे. कृष्णाने जी वेणू, मुरली शोधून काढली त्यात हवा फुंकून सूर, लय, ताल असा निर्माण केला की तो पशु-पक्षांना समजावा. गाईला समजावा, वाघाला समजावा, सापाला समजावा. याचा आणि

आपल्या श्वासाचा प्रत्यक्ष संबंध आहे. आपल्या ह्या देहाच्या पोकळीमध्ये आपण श्वास फुंकतो म्हणजे श्वास घेतो आणि सोडतो त्यालाच ''प्राणायाम'' म्हणतात.

श्वास घेणे आणि सोडणे याच्यावर मानवाची संपूर्ण प्रगती आहे. असं मुरलीद्वारे कृष्णाने दाखवून दिले. हे थोडं वेगळं शास्त्र आहे. ज्याला उच्चार शास्त्र (Phonetic Science) असे म्हणतात.

हे शास्त्र मी शिकवतो. या उच्चार शास्त्राचा सांगोपांग अभ्यास भगवान कृष्णाने केलेला आहे. तुमच्या लक्षात येईल. श्वास, सुर, लय, ताल हे सर्व एकात एक गुंफलेले आहेत. संपूर्ण विश्व हे एका तालामध्ये, लयीमध्ये गुंफलेले आहे हे कृष्णाने सर्व जगाला दाखवून दिलं.

म्हणून आताच्या काळातला पूर्ण पुरुष म्हणून भगवान कृष्ण मानला जातो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# कृष्ण रंग

आपण जे सप्तरंग म्हणतो ता, ना, पि, हि, नि, पा, जा, त्यातील जो निळा रंग किंवा कृष्णाचा रंग आहे तो अधिक उष्ण आहे. हा निळा रंग आपल्या शरीरात आहे. जेव्हा साधक साधना करु लागतो तेव्हा हा निळा रंग त्याच्या शरीराभोवती दिसू लागतो. त्याला 'आरा' असे म्हणतात.

# कृष्ण रंग

कृष्णाने जे जगाला दिलं किंवा आपल्या पूर्वजांनी एकत्रित करुन कृष्णामार्फत जे पुढे आणले त्याचा थोडा परिचय करुन देतो. या जगाची वाढ किती झाली? बुध्दीमत्तेची वाढ किती झाली? आणि कशाची वाढ झाली नाही. गंमत म्हणून मी एक विषय मांडतो, तुम्ही जर बारकाईने पाहिलंत तर तुमच्या लक्षात येईल, कृष्णाच्या पूर्वीपासून ते अगदी हजारो वर्षांपूर्वी कुठून कुठे जायचं असलं तर कसली तरी चाक, कसली तरी गाडी आणि त्याला कसले तरी जोडलेले पशू याच्यातून माणूस प्रवास करीत होता. मग ती गाडी बैलाची असेल, रेड्याची असेल, खेचराची असेल नाहीतर उंटाची असेल! मानवाच्या बुध्दीचा विकास किती झपाट्याने होत गेला. त्याचं एक उदाहरण तुमच्यासमोर ठेवतो. रोगराई, इमारती बांधणे या विषयाकडे जात नाही तर वेग, गती या विषयाकडे मी येतो.

२०० वर्षांपूर्वी भारतामध्ये बोरीबंदर ते ठाणे पहिली आगगाडी सुरु झाली. हे सगळीकडे कौतुक म्हणून पाहिलं गेलं. एकही पशू, एकही जनावर जोडलेलं नसताना हे काहीतरी धावतयं, चाकं आहेत परंतु ती ओढण्यासाठी पाहिजे ते काही नाही. तिथून या जगाच्या गतीमध्ये बदल झाला. जे चाक वाहन ओढायला वापरलं गेलं, तेच चाक गिरणीच्या साच्यासाठी वापरलं गेलं, तेच चाक कुंभाराच्या मडक्यासाठी वापरलं गेल, तेच चाक नांगराचं आधुनिक रुपांतर ट्रॅक्टरसाठी वापरलं गेलं.

चाकाचा वापर जगामध्ये इतक्या झपाट्याने झाला की एका दिवसात एक शर्ट व्हायचं तेथे एका दिवसात हजार शर्टस्‌चा कपडा होऊ लागला. जी जमीन नांगरायला महिना लागायचा तेथे फक्त काही तास लागतात. हे सर्व या चाकाने घडविलेलं स्थित्यंतर. चाक आणि वाफ (उष्णतामान) याने जो वीस हजार वर्षांमध्ये जगात बदल झाला नाही तो फक्त दोनशे वर्षांत झाला. हे तुमच्याही लक्षात येईल. कोणाशीही टेलीफोनवर बोलू शकता, बसल्या जागी टी.व्ही वर सगळं जग पाहू शकता.

पूर्वी कुठलीही गोष्ट टिकविण्यासाठी फार भानगडी कराव्या लागत असत.

गंमत सांगायची झाली तर, गरम मसाला जन्माला आला तो मुळातच मांस टिकवून धरण्यासाठी. आपण तो आता कसाही वापरतो. म्हणण्याचा रोख असा, टिकविण्याचं गणित आपल्याकडे आलं, भरपूर पीठ करण्याचं गणित आलं. इतक्या सोईस्कर गोष्टी आपल्याकडे आल्या की माणसाची प्रगती झपाट्याने होऊ लागली. याच्यातील चाक आणि उष्णता, या गोष्टींचा कृष्णाशी संबंध आहे. ही उष्णता आपल्या शरीरात आहे आणि ही चाकंही आपल्या शरीरात आहेत. त्याला कृष्णाने गती दिलेली आहे आणि ती आजतागायत चालू आहे. परंतु कुठेतरी थोडा घोटाळा आहे, म्हणून माणूस या सर्व गोष्टींचा उपयोग एकमेकांना मारण्यासाठी करतो. शिशुपालचा वध कृष्णाने केला, जे तुम्ही 'सुदर्शन चक्र' म्हणता याचा उष्णतेशी संबंध आहे. ते उष्णतेचे चक्र आहे. अती उष्णतेची धार, त्याने शिशुपालचा वध केला. जे आपण आजच्या काळात आर. डी. एक्स. म्हणतो ते अती उष्णतेची धार होय. अणूबॉम्ब, अती उष्णतेची धार आहे.

आपण जे सप्तरंग म्हणतो ता, ना, पि, हि, नि, पा, जा, त्यातील जो निळा रंग किंवा कृष्णाचा रंग आहे तो अधिक उष्ण आहे. हा निळा रंग आपल्या शरीरात आहे. जेव्हा साधक साधना करु लागतो तेव्हा हा निळा रंग त्याच्या शरीराभोवती दिसू लागतो. त्याला 'आरा' असे म्हणतात. हा कृष्णाचा निळा रंग विषनाशक आहे. आता तुम्हांला ही गोष्ट कळेल, कृष्णाने कालीयाचे मर्दन कसे केले ?

विषनाशक याचा अर्थ अति उष्णतेने विष मारुन टाकणे. आपल्याला माहित असेल, ज्याला विषबाधा झालेली असते, त्याला निळ्या रंगाच्या खोलीत ठेवतात. ह्या निळ्या रंगामुळे कालीयाचे विष कृष्णाला काही करु शकले नाही. कृष्णाचे सर्व जीवन विक्षिप्त आहे, न समजण्यासारखे आहे.

कृष्णाच्या जन्माची गोष्ट आपल्याला माहित आहे. कृष्णाचा जन्म झाला आणि सर्व पहारेकरी झोपेच्या लीन झाले. वसुदेव कृष्णाला घेऊन बाहेर पडला, मग पहारेकरी आपोआप झोपेत गेले कसे ? दरवाजे उघडले कसे ? हे काय गणित आहे ? आपोआप झोपेत जाण्याचे गणित नील किरणांमध्ये आहे म्हणजे आजच्या हिशोबाने आपण असं म्हणू, माणसाला हिप्नोटाईज करणारी किरणं, ज्याला 'मोहिनी विद्या' म्हणतात. कृष्ण जन्माला आल्याबरोबर तेथील वातावरण या नील

किरणांनी भारलं गेलं. वसुदेव जस जसा कृष्णाला घेऊन बाहेर येऊ लागला, तसतसे तुरुंगाचे पहारेकरी झोपेत जाऊ लागले. याच्यापुढे सुरु होतो यमुनेचा प्रवास.

किर्तनकार, प्रवचनकार सांगतात की यमुनेला कृष्णाच्या आंगठ्याचे चुंबन घ्यायचे होते, म्हणून ती उचंबळू लागली. ही कथा ऐकायला चांगली वाटते. शास्त्रीयदृष्ट्या कितपत खरी आहे ? हे संभवनीय आहे का ? ज्यांना माहित आहे त्यांना कळेल की गुरुत्वाकर्षणाचा नियम. चंद्र-सूर्य एकाच दिशेन येऊ लागले तर कुठलेही पाणी उचंबळेल! पण तो दिवस आहे अष्टमीचा. अष्टमीला भरती कमी असते. हे जे पाणी उचंबळण्याचं गणित आहे, तेही कृष्णाच्या नील किरणांत आणि जेव्हा अती नील किरणांच्या टोकांचा संपर्क पाण्याशी आला तेव्हा पाणी खाली जाऊ लागले. नियम कसा आहे ते पाहू!

पूर्वी शेंडी ठेवायचे! सर्व तुळतुळीत आणि डोक्यावर मध्ये करवंटी सारखा भोर, त्याच्यामध्ये शेंडी. परंतु ती शेंडी पडायची. फक्त एकाचीच पडायची नाही, तर ती उभी रहायची. कोणाची ? नारदाची! त्याचीच शेंडी उभी रहायची अर्थात ताठ रहायची. असं का ? समजा आपल्या अंगावरचे केस याच्याकडे विद्युत भारीत ब्रश आणलं तर ते ताठ उभे राहतात. तसे ते शेंडीवरचे केस विद्युत भारीत झाल्यावर ताठ उभे राहतात. हे आपण थोड्या निराळ्या तऱ्हेने पाहू या. आपल्या हाताची बोटे आहेत याच्या टोकातून विद्युत बाहेर पडते, तसा कृष्णाच्या आंगठा आहे, हा अणकुचीदार आहे, टोकदार आहे त्याच्याकडे ते पाणी खेचलं गेलं. आपणास हा नियम माहित्‍हे की दोन्ही टोकांचे विद्युत एकत्र आले की ते समान होतात, त्याप्रमाणे आंगठ्याचे आणि पाण्याचे दोघांचेही विद्युत भार सारखे झाले आणि पाणी खाली गेले.

थोडक्यात कृष्ण हा विद्युत भारीत याचा समुदाय आहे, हे विद्युत भारीत तो प्रत्यक्ष परमेश्वर असल्यामुळे झालं की देवकीने काही केलेल्या तपश्चर्येमुळे निर्माण झालं हे सहजा सहजी सांगता येणार नाही. परंतु त्यातील एक गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे की देवकी अथर्वशिर्ष म्हणत असे. ती गणपतीचं पूजन करत असे पण गणपतीच्या मूर्तीचं नव्हे, तर साडेतीन मात्रामध्ये जो गणपती आहे त्याचं! तो

अथर्वशिर्षात आहे. गायत्रीमंत्रात सुध्दा आहे. म्हणून त्याला ‘अर्धत्रिपादनाडी’ असं म्हटलेलं आहे.

माझा मुद्दा असा की देवकी नियमितपणे तुरुंगात अथर्वशिर्ष म्हणत असे. त्याचप्रमाणे ती वरुण देवतेची उपासना करत असे आणि यासाठी खूप नियम पाळावे लागतात. (अलीकडील काळात ते शक्य नाही.) देवकी जशी उपासना करीत असे, तशी उपासना वसुदेवही करत असे, ती म्हणजे सूर्योपासना, या दोघांच्या उपासनेचा परिणाम म्हणून कृष्णासारखा पुत्र त्यांच्या पोटी जन्माला आला.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# मातीची दर्पोक्ती

आपण बारकाईने जर पाहू लागलो तर आपल्याला समजेल शंकराला भस्म आवडते. भस्म म्हणजे चितेवरील भस्म. साईबाबांना उदी आवडायची. दत्त महाराजांना भस्म आवडते. या सर्वांचा संबंध मातीशी आहे. याचा थोडक्यात अर्थ असा, मानव किंवा सजीव या मातीतूनच जन्म घेतो आणि मातीतच जातो. (गाडला तरी जातो नाहीतर जाळला तरीही जातो.)

# मातीची दर्पोक्ती

माणसं देवाकडे सुख मागतात आणि देव त्यांना दु:ख देतो, तरी माणसं त्याला पसंत करतात. मी एकदा म्हणालो होतो, दु:ख देऊन देव तुमचं पाप झिजवतो. गुरु तुमचं पाप झिजवतो आणि तुमच्या खाती पुण्याचा संच असा करतो की तुमचं हे जीवन सुखावह होईल.

आपण कृष्णाचंच उदाहरण घेऊ; कृष्ण जन्माला यायच्या अगोदर दहा वर्षे आणि जन्माला आल्यानंतर दहा वर्षे वसुदेव-देवकीला तुरुंगवास भोगावा लागला. कृष्णाने खोड्या केल्या, त्याचा उपद्रव सगळ्यांना भोगावा लागला. तो खोड्या करायचा, चेष्टा करायचा, त्याचा परिणाम सासू-सूनेत भांडण व्हायचे, नणंद-भावजय मध्ये भांडण व्हायचे, नवरा-बायकोमध्ये भांडण व्हायचे. थोडक्यात याचा त्रास बायकांना व्हायचा. तरीही प्रत्येक बाई (गोपी) कृष्णावर प्रेम करायची असं का? हे प्रेम म्हणजे काय? ती गोपींची भक्ती म्हणजे काय? मग या गोपींमध्ये हे प्रेम, ही भक्ती कशी निर्माण झाली?

एक गोष्ट अशी आहे; एकदा नारद कृष्णाला म्हणाला, देवा सर्व बायका असं म्हणतात, गरोदरपणा, बाळंतपणा हे सर्वात वाईट. मला हे पटत नाही. कृष्ण नारदाला म्हणाला, मी तुला बाई करतो, सर्व गोष्टी तू अनुभव आणि मग मला सांग. नारद म्हणाला, मी बाळंतपणाला घाबरत नाही तेव्हा कृष्णाने साठ बाळंतपण त्याच्या वाट्याला घातली. अर्थात साठ मुले (हे सर्व कृष्णाने मायेने निर्माण केले होते, ही कथा सर्वश्रूत आहे.) कोण हात ओढतो, कोण पाय ओढतो असे नाना त्रास नारदाला (स्त्री झाल्यानंतर) सहन करावे लागले.

या सर्व गोष्टीना नारद कंटाळला आणि कृष्णाचा धावा करु लागला. भक्तांचा कैवारी तो गोविंद नारदाच्या समोर उभा राहिला आणि विचारलं, कशाला माझा धाव करतोस? नारद काकुळतीस येऊन म्हणाला, देवा जे काही अनुभवायचं ते मी अनुभवलं, आता यातून माझी सुटका कर. मी तुला शरण आलो आहे. मग श्रीकृष्णाने नारदाला पूर्वस्थितीत आणलं.

सांगण्याचा रोख असा देवकीने कृष्णाला जन्म देताना खूप भोगलं, परंतु ते सर्व तिने आनंदाने सहन केले. याचं कारण देवावर असलेली तिची भक्ती व तिचं प्रेम.

आपण कृष्णाचा अवतार का समजून घ्यायचा ? कृष्ण हा द्वापार युगाचा शेवट आणि कलीयुगाची सुरुवात आहे. द्वापारयुगात श्रीविष्णूकडे ज्याने जे जे मागितले त्या सर्वांच्या इच्छा कृष्णावतारामध्ये श्रीविष्णूने पूर्ण केल्या. कलीयुगामध्ये देवाला हे पूर्ण करता येत नाही, कारण कलीयुगामध्ये देव आणि भक्त यांचा परस्पर संबंध येत नाही. देव अंशावतारामध्ये येतात.

सांगण्याचे तात्पर्य असे, आजकाल जी अंधश्रध्दा चालली आहे. जी देवाच्या नावाने बोंबाबोंब केली जाते, कुणीतरी बाबा निर्माण होतो, समाजाला आपल्या नादी लावतो आणि शेवटी हातात बेड्या ठोकून घेतो. देव राहिला बाजूला, देवाच्या नावाने नको ते धंदे! परंतू सत्य काय ? देव म्हणजे काय ? देवाशी आपलं नातं काय ? देवाचा मार्ग कोणता ? देव कसा धरावा ? स्तोत्र-मंत्र म्हणजे काय ? स्तोत्र-मंत्र आणि विज्ञान यांचा परस्पर संबंध काय ? इत्यादी अनेक गोष्टी आपण समजून घेत नाही. ज्यांच्याकडून समजून घ्यायच्या ते परमेश्वराचं सगुण रुप सद्‌गुरु यांच्याकडे पाहायला आपल्याला फुरसत नाही.

सद्‌गुरु नक्की काय शिकवतात ? साधना म्हणजे काय ? साधनेची विविध अंगे कोणती ? याही गोष्टी आपण ज्ञात करुन घेत नाही. देवाने जन्म दिला आहे, तो सत्कारणी लावण्यासाठी. परंतू ते राहिले बाजूला, नको ते खा, नको त्या उठाठेवी करा, दु:खं, संकटे अंगावर ओढावून घ्या आणि दु:खातच धरणीवर पडा, असं हे आपलं जीवन! ज्याचा आपण कधी शांत मनाने विचार केला नाही. जीवनाचा खरा आनंद आपण घेत नाही. जो भगवान श्रीकृष्णाने आपल्याला दिला, त्या आनंदाची विविध रुपे आपल्याला सांगितली, सोपे सोपे मार्ग सांगितले, परंतु ते सर्व आपण विसरुन गेलो.

ज्या मातीत आपण जन्म घेतो त्याच मातीत आपण विलीन होतो. हे चक्क काय आहे ? मुलत: माती म्हणजे काय ? मातीचा आणि मानवाचा परस्पर संबंध काय ? आपण छोटसं उदाहरण घेऊ; सर्व लहान मुलांना सवय असते, अंगठा चोखायची! आपल्या हाताचा, दुसऱ्याच्या हाताचा नाहीतर पायाचा . सगळीच मुलं आपल्या पायाचा अंगठा चोखतात, असं नाही. परंतु कृष्ण आपल्या पायाचा आंगठा चोखायचा, तोही उजव्या पायाचा! असं भागवत सांगते.

उजव्या पायाचा अंगठा हा आध्यात्मिक भाग आहे. हा जन्म-मरणाच्या

सीमेवरचं काम करतो म्हणून त्याला ''संजीवन नाडी'' असे म्हणतात. लहानपणी मुलं माती खातात. का खातात ? मुलांच्या आईही (पूर्वीच्या) गरोदर राहिल्यानंतर दुसऱ्या महिन्यापासून माती खात असत (काही महिने). कारण मुलाचा पिंड हा गर्भामध्ये तयार होत असतो, त्याला पृथ्वीतत्वाची गरज दुसऱ्या महिन्यापासून लागते. ही गरज ती बाई, भाजलेली माती खाऊन भागवे. हा सर्व देह, जो अनेक तत्वांनी झालेला आहे त्याची सुरुवात पृथ्वी तत्वापासून चालू होते. जन्माला आल्यानंतर सुध्दा ते मूल माती खाते यात अनेक अर्थ आहेत.

आपण बारकाईने जर पाहू लागलो तर आपल्याला समजेल शंकराला भस्म आवडते. भस्म म्हणजे चितेवरील भस्म. साईबाबांना उदी आवडायची. दत्त महाराजांना भस्म आवडते. या सर्वांचा संबंध मातीशी आहे. याचा थोडक्यात अर्थ असा, मानव किंवा सजीव या मातीतूनच जन्म घेतो आणि मातीतच जातो. (गाडला तरी जातो नाहीतर जाळला तरीही जातो.) जे मूल जन्म घेते ते मातीकडे जाण्याचा प्रयत्न करीत असते. साधारणतः हे तीन वर्षापर्यंत चालते. तीन वर्षानंतर मूल ते विसरते आणि आपल्या भावात राहू लागते. अर्थात हा माझा बाबा, ही माझी आई, हा माझा अमका इत्यादी. माझा बोलण्याचा रोख असा की कृष्ण आपण समजून घेतला तर आपलं जीवन खरं सुखमय करु शकतो. कृष्णाने हे आपल्याला साध्या-साध्या गोष्टीतून दाखवून दिलं आहे. त्यातील एक गोष्ट माती (पृथ्वीतत्त्व), हे मी तुम्हांला सांगितले. त्याचाच भाग असा लहान मुलं आपले दोन्ही गुडघे टेकून पुढे पुढे जातात. परंतु कृष्ण एकाच गुडघ्याने रांगायचा. एक गुडघा जमिनीपासून दूर असायचा, याचा अर्थ आपले दोन्ही पाय पृथ्वीच्या संपर्कात असतात, म्हणून आपण मायेच्या छायेखाली वावरत असतो. या मायेपासून कृष्ण अलग होता. हे नक्की काय ? आपले सर्व विषय, आपल्या सर्व आनंदाच्या गोष्टी या पृथ्वीच्या संबंधात आहेत, म्हणून माणूस हा (पृथ्वीच्या) त्या विषयाच्या, त्या आनंदाच्या शोकामध्ये मग्न होऊन राहतो आणि जे काही परमेश्वराचे विश्व आहे, ते तो विसरतो. भगवान कृष्णाने एक पाय पृथ्वीच्या संबंधात ठेवला आणि एक पाय परमार्थासाठी ठेवला म्हणूनच म्हटलं गेलं ''देव एका पायाने लंगडा''.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# देव एकनाथांचा बछडा

सर्व देवांनी कुणी गवळी, कुणी गवळणी, कुणी दैत्य अशा अनेक तऱ्हेने अवतार घेऊन देवाला मदत करण्याचे ठरविले. प्रत्यक्ष देव कसा वागतो हे सर्व देवांनी पाहिले. त्याच्या लीला पाहिल्या. कलियुगामध्ये देवाचा जगाशी संबंध कसा असेल, कोणत्या नात्याने असेल, देव आणि पृथ्वी यांना जोडणारं एकच पाऊल आणि ते कोणते पाऊल ?

# देव एकनाथांचा बछडा

सर्व देवांनी एकदा विष्णूला विचारले, देवा हे पूर्णावतारी रुप (मानवाचे) घेण्याचं कारण काय? तेव्हा विष्णूचं उत्तर असं आहे, ''माणसांनी माणसांशी कसं वागलं पाहिजे, हे सांगण्यासाठी माझा पूर्ण अवतार आहे. तुम्ही सर्व देवांनी मी कसं वागतो ते पाहायला पाहिजे. माझ्या वागण्यामध्ये पृथ्वीशी, सर्वांशी माझा संबंध येणार आहे. पूर्णावतार असल्यामुळे, मानवी अवतारामध्ये माझी आई असणार आहे, माझे वडिल असणार आहेत, या सर्वांशी मी नाती राखून सुध्दा स्वतःला कसा अलिप्त ठेवतो, हे तुम्ही देवांनी पाहायला पाहिजे.''

सर्व देवांनी कुणी गवळी, कुणी गवळणी, कुणी दैत्य अशा अनेक तऱ्हेने अवतार घेऊन देवाला मदत करण्याचे ठरविले. प्रत्यक्ष देव कसा वागतो हे सर्व देवांनी पाहिले. त्याच्या लीला पाहिल्या. कलियुगामध्ये देवाचा जगाशी संबंध कसा असेल, कोणत्या नात्याने असेल, देव आणि पृथ्वी यांना जोडणारं एकच पाऊल आणि ते कोणते पाऊल? हे कृष्णाने सर्व देवांना, सर्व जगाला दाखवून दिले. हे पाऊल म्हणजे भक्तीचं! ना मला ज्ञानाने जिंकता येणार, ना मला पांडित्याने जिंकता येणार, मला फक्त भक्तीनेच जिंकता येईल हे पूर्णावताराने कृष्णाने जगाच्या लक्षात आणून दिलं.

कृष्णाच्या संपूर्ण लीला आहेत गोकुळातल्या, वृंदावनातल्या. ह्या भक्तीरुप आहेत. या सर्व भक्तीरुप लीलांमध्ये फसवणूक आहे, छळवणूक आहे, मिष्किलपणा आहे, थोडासा वात्रटपणा आहे. या सर्व मानवी जीवनाला आवश्यक आहेत, हे दाखवून दिलं. आपल्या स्वतःच्या वागणूकीतून कसं वागायला पाहिजे, कसं राहायला पाहिजे याचे धडे घालून दिले. चांदभट बोधले यांनी भागवत दशम स्कंदावर टीका लिहिली. हे त्या काळातील अतिशय विद्वान पंडित. काशीच्या विद्यापीठाच्या एका विभागाचे प्रमुख. हे सूफी पंथाचे प्रमूख. यांचे मार्गदर्शन एकनाथांना लाभले. शिवाय जनार्दन स्वामींसारखे गुरु लाभले. प्रत्यक्ष दत्तमहाराजांचे दर्शन घडले.

अशा एकनाथांनी प्रत्येक गोष्टीमध्ये अनेक अर्थ भरुन ठेवलेले आहेत. 'गवळ्या घरी जातो, दही-दूध खातो' गवळी याचा अर्थ, मूळ शब्द गोवळी. गो

म्हणजे जशी गाय! गो म्हणजे पृथ्वी आणि गो म्हणजे इंद्रिय. गोवळी, इंद्रियांना वळविणारा! अशा त्या गोवळ्यांच्या घरी जातो, जे इंद्रयांना वळवितात.. चुकीच्या दिशेने, अशांच्या घरी जातो. घर याचा अर्थ मकान, खोली असा नव्हे तर घर याचा अर्थ 'मन' असा आहे. त्या मनात जातो.

माणूस हा प्रत्येक वेळी काम्य गोष्टींच्या मागे असतो. 'काम्य' म्हणजे ज्याच्यामुळे त्याची वासना शमेल, असं त्याला वाटते, त्या गोष्टींच्या तो मागे असतो. भूक ही वासनाच आहे. माणूस सकाळी खातो, दुपारी खातो आणि संध्याकाळीही खातो, वासना तशीच असते. तेव्हा जे काम्य आहे त्याच्या मागे माणूस असतो. त्या काम्याच्या मागे असलेले दूध, दही हे जे त्याला वाटत असतं वासना शमवणारे हे प्रत्यक्ष भगवानच खातो. आणि त्याची वासना शमवण्याचा प्रयत्न करतो. सर्व शमवल्यानंतर कृष्ण दह्या, दुधाचा रबडा करतो, सर्व चिखल करतो की त्यातला प्रसाद एखाद्याला मिळावा आणि त्याचीही वासना शमावी. हे वासना शमवण्याचं गणित इतरांचं सुध्दा व्हावं म्हणून देवाने खाली काहीतरी टाकून ठेवले. सर्वांनाच कृष्णाने असं केलं नाही.

एकनाथ महाराज पुढे म्हणतात, 'शिंकेची सोडतो आणि मडकेची फोडतो!' माणूस भांडवलदार झाला याला मूळ कारण मडके. याची सुरुवात कुंभाराने केली. त्याकाळी माणूस जेवढे धान्य पिकवायचा ते शिल्लक ठेवण्याची गोष्ट माणसाकडे नसल्यामुळे तो तेव्हाचं तेव्हा खाऊन टाकायचा, तरीही कोणतीही तोशीत पडत नसे. पण कुंभाराने चाक जन्माला घातले, त्याबरोबर मडके जन्माला घातले. हळूहळू माणसाच्या लक्षात येऊ लागलं की आपण काहीतरी शिल्लक ठेवले पाहिजे. त्यासाठी तो मडक्याचा उपयोग करु लागला आणि इथून तो भांडवलदार झाला.

भांडवलदार याचा अर्थच असा दुसऱ्याच्या खिशातील काढायचं आणि आपण श्रीमंत व्हायचे. एकीकडे खणायचं आणि आपल्याकडे ढीग उभा करायचा. थोडक्यात आपली वासना पुरवण्याची सोय फक्त माणसाने केली, हे कृष्णाला मंजूर नव्हतं. म्हणून शिंक सोडून मडके फोडायचा. सर्वांना खायला द्यायचा आणि 'नवनीताचा सडा' नवनीत हे दूधामध्ये आहे पण दिसत नाही. तसेच ते सहज

मिळत नाही. त्यासाठी बऱ्याच प्रक्रिया कराव्या लागतात हे आपणां सर्वांस माहित आहे. 'जैसे नवनीत, तैसा मंथून घे भगवंता'. जसं दूधाचं दही, दह्याचं ताक, ते घुसळावं तसं आपल्या चित्तामध्ये वासना, आसक्ती, वाईट गोष्टी या सर्व घुसळा आणि मग भगवंत आपोआप वर येईल, तो नवनीताचा सडा.

त्यापुढे एकनाथ म्हणतात, 'वाळवंटी जातो आणि किर्तन करीतो, लावी साधुसंतांचा झगडा.' साधु म्हणजे संसार सोडून जंगलामध्ये जातात, स्वतःला जमीनीमध्ये पुरुन घेतात पण सर्वांपासून दूर! संत जे संसारामध्ये राहतात तरी सुध्दा अळवाच्या पाण्यासारखे असतात, सर्वांपासून अलिप्त, आसक्ती चिकटत नाही, वासना शिल्लक राहात नाहीत. संत हे संसारात असतात, याचं कारण या मानवी लोकांशी नांदल्याखेरीज त्यांची दुःखं कळणार नाहीत आणि त्यांना अधिकाराने सांगता येणार नाही. संसार केल्यामुळे बोलण्याचा अधिकार प्राप्त होतो. नाहीतर अधिकार येणार नाही. त्या अर्थाने साधूसंतांचा झगडा लावतो.

वाळवंटी जातो, किर्तन करतो. वाळवंटाचा अर्थ आपण समजतो तसा नाही. वाळवंट याचा अर्थ रुक्ष, निरस. निरस म्हणजे काय ? जिथे जिथे मी अठराशे पेय पितो तरीही मला तहान लागतेच. मी माझ्या अनेक हौशी पुरवतो, तरीही त्या वाढतातच. माझ्या जीभेला मी नाना प्रकार देतो, तरीसुद्धा ती जीभ म्हणते मी हे कुठे खाल्ले आहे. ते खा! बरं ते एकदाच खाल्लं आहे पुन्हा खायला काय हरकत आहे ? म्हणून पुन्हा खा! ते सुख नाही. म्हणून वाळवंटी जातो - या निरस जीवनात तो कृष्ण आपल्याला सांगायला येतो, अरे या वासनेच्या आहारी किती जाशील ? काम्य, भोग्य याच्या मागेच जातोस आणि मलाच भोगतोस. मी कुठ नाही, फुलांमध्ये सुगंध आहे तो मीच, फळांमध्ये चव आहे ती ही मीच. सगळीकडे मी आहे. जे कृष्णाने मीरेला सांगितले, तू जेथे बघशील तेथे मीच आहे. हे सर्व सांगण्यासाठी परमेश्वर नाना रुपात आला.

संतांनी आपल्याला बऱ्याच गोष्टी भक्तीतून सोप्या करुन सांगितल्या. परंतु त्याही आपल्याला समजत नाहीत. आपण त्याचा भलताच अर्थ करुन घेतो, दुसऱ्यांनाही चुकीचं सांगतो, म्हणजे आपलंही नुकसान आणि दुसऱ्याचंही नुकसान. एक साधी गोष्ट घ्या, आपण सर्व एकादशीचा उपवास करतो, आणि

एकादशी नी दुप्पट खाशी अशाच तऱ्हेने वागतो. एकादशी म्हणजे काय हे नीटसं माहित नाही.

उप म्हणजे जवळ, वास म्हणजे राहणे! देवाच्या जवळ राहणे! काही न खाणे, असा अर्थ नाही तर, काहीतरी न खाणे असा अर्थ आहे. देवाच्या जवळ राहताना उपवास करावा लागतो. काही खायचं नसतं याचं कारण आपल्याला जेव्हा भूक लागते तेव्हा देवाची आठवण येते. आज सोमवार - शंकराचा उपवास, आज संकष्टी गणपतीचा उपवास या निमित्ताने आपण देवाचं स्मरण करतो. पण एकादशी असं का म्हणतात? एकादशी (एक + आ + दशी)! माणसाची इंद्रिये दहा! पाच कर्मेंद्रिय आणि पाच ज्ञानेंद्रिय! ही दहा इंद्रिये दुनियेभरातील बऱ्याच उचापती करत असतात. ही सर्व मनाच्या ताब्यात असतात.

आपल्याला सर्वश्रूत आहे की डोकं ढिलं असलेले लोक पौर्णिमेला बिघडतात. अंगात वगैरे येण्याचे प्रकार पौर्णिमेला घडतात. चंद्रबल वाढलं की त्याचा परिणाम मनावर होतो. मन हे जडरुप असूनही द्रवरुप आहे, कारण ते अतिचंचल असल्यामुळे शास्त्र असं सांगते, चतुर्थी, अष्टमी, द्वादशी आणि चतुर्दशी या दिवशी शुभ कार्य करु नयेत.

मुद्दा असा चंद्रबल जेव्हा जास्त असते, तेव्हा मन अधिक चंचल असते. प्रतिपदे पासून दशमीपर्यंत (दहाव्या तिथीपर्यंत) मनाची अवस्था वाढत्या प्रमाणात असते. एकादशीला ती जास्त होते. अकरावी तिथी ही मनाची चंचलता वाढवणारी, उडी घेणारी तिथी आहे. त्याच तिथीला नियंत्रण आणायचं असतं म्हणजे पौर्णिमेपर्यंत चांगलं असतं. अमावस्या म्हणजे कृष्ण पक्षातील एकादशी, मनाचं सामर्थ्य कमी होत जातं, कारण चंद्रबळ कमी होत जातं. तेव्हा एकादशीला पुन्हा मनावर नियंत्रण ठेवायचं आणि अमावस्येला एकदम मनाचं बळ कमी होत जातं ते कमी होऊ द्यायचं नाही. म्हणून एकादशी. त्यातील महत्वाची गोष्ट अशी आहे; तुळशीदल खावं! तुळशीचं पान खावं, प्रभूचं नावं घ्यावं.

आपल्या गावी अशी पध्दत होती, एकादशीला नांगरायचं नाही. शेतीची कामं करायची नाही, जोत धरायचं नाही. मोट लावायची नाही. याचे नीट अर्थ आपल्याला माहित नाहीत. परंतु बैल किंवा गाय सुध्दा त्यांचं प्रभूनाम घेतात.

त्यांना प्रभूनाम घ्यायला मोकळीक द्यायची, शेतकऱ्याने स्वत: नाम घ्यायला मोकळं रहायचं, तो समजा कामात असेल तर त्याचं लक्ष नांगराकडे असणार! म्हणून त्याने नाम घ्यायचं. आपलं चित्त, आपलं मन चंद्राच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेतून काढून परमेश्वराच्या कक्षेत न्यायचं म्हणून एकादशी! सहज विषय आला म्हणून एकादशीचं महात्म्य सांगितले.

माझा मुद्दा असा, एकनाथ महाराज पुढे म्हणतात, ''एका जनार्दनी भिक्षा वाढा माई, देव एकनाथांचा बछडा!'' असं म्हणताना त्यांनी सांगून टाकलं, माझा देव, माझं वासरु! खरं पाहिलं तर सर्वांचाच देव! परंतू आपण ते मानत नाही. मानत नाही म्हणजे कसं ? आपलं लेकरु आलं की काय म्हणणार, हे माझं लेकरु! परंतु असं म्हणत नाही, देव माझं लेकरु!

जसं अर्जूनाला देवाचं स्मरण होतं, जसं मीरेला स्मरण होतं, जसं राधेला स्मरण होतं तसं एकनाथांना सदा सर्वदा परमेश्वराचं स्मरण होतं. माझा नाथ, माझा स्वामी, माझं लेकरु अशी एकनाथांची परिस्थिती होती. जसं आपण संपत्तीला, पोरा-बाळांना, बायकोला, नातलगांना माझं म्हणतो, (जी नाती खरी नाहीत,) त्यांना माझं माझं म्हणतो, परंतु देवाला माझा म्हणत नाही. खरा सोयरा देवच, जो कधीच आपल्याला टाकत नाही. त्याचं मनोमन स्मरण केलं तरी त्या स्मरणाची तो जाणीवपूर्वक दाद देतो, बाकीची सर्व नाती, बाजू देऊन जातात, फसवतात. म्हणून एकनाथ महाराज सरळ म्हणतात, देव एकनाथांचा बछडा! माझा त्याच्यावर हक्क आहे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# नियंत्रणाने देव वश्य आहे

गुरुचरित्रामध्ये सरस्वती गंगाधर असं म्हणतात, ब्रह्मदेवाने कलीला पृथ्वीवर पाठवलं. हा कली आहे कसा? ज्याने एका हाताने जीभ धरली व एका हाताने लिंग धरलं आणि तो काय सांगतो, या दोन गोष्टींनी मी जगाला बिघडवायला जातो आहे.

# नियंत्रणाने देव वश्य आहे

एका जनार्दनी भिक्षा वाढा माई ?

काय भिक्षा वाढा ? 'विषय' जाऊ द्या. विषयाकडे बघण्याचा गुण जाऊ द्या. त्याच्याऐवजी प्रभूचरणी चित्त राहू द्या. ही भिक्षा वाढायला नाथ सांगतात. विषय नको, सर्व विषय म्हणजे वस्तूंकडे माणसाचं जे आकर्षण आहे ते. जीभ किती ठिकाणी वळते ?

गुरुचरित्रामध्ये सरस्वती गंगाधर असं म्हणतात, ब्रह्मदेवाने कलीला पृथ्वीवर पाठवलं. हा कली आहे कसा ? ज्याने एका हाताने जीभ धरली व एका हाताने लिंग धरलं आणि तो काय सांगतो, या दोन गोष्टींनी मी जगाला बिघडवायला जातो आहे.

आपल्या हे लक्षात येईल, वरील दोन गोष्टींनी (वासना खाण्याची आणि भोगाची) सर्व जग बिघडत चाललं आहे.

द्वापारच्या शेवटी जन्माला आलेला कृष्ण कलीयुग काय असणार आहे, हे ओळखून कलीयुगामध्ये आपल्या सर्व भक्तांना मार्गदर्शन करताना, कृष्णाने वरील दोन गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यास सांगितले. तुमची सर्व कर्मे (बरी असो अथवा वाईट) मला अर्पण करा. हे कृष्णाने जरी सांगितलं तरी ते आपल्याला समजलं नाही.

आपण कृष्णाचचं उदाहरण घेऊ या. कृष्ण खोड्या करीत असे. दुसऱ्यांचा थोडा छळ होईल, असं बघायचा. थोडा त्रास झाला पाहिजे. यासाठी कृष्णाने द्रौपदीला पुढील काळात उत्तर दिले. पांडव वनवासात असताना, कृष्ण त्यांना भेटायला गेला तेव्हा द्रौपदी त्याचे पाय धरते, आणि विचारणा करते, देवा, मी तुझी भक्ती करते, मग हा मला त्रास का ? तू माझ्यासाठी काय करतोस ? कृष्णाचं उत्तर असं, मी बरचं काही करतो पण ते तुला समजत नाही.

सर्व माणसे देवाला हा प्रश्न करतात की आम्ही तुझी एवढी भक्ती करतो, रोज मोठा हार घालतो, एक किलो पेढे प्रसाद दाखवतो इत्यादी इत्यादी ! तरी तुला आमची पर्वा नाही. कारण त्यांना त्रास झालेला असतो. कृष्णाने द्रौपदीला उत्तर

दिलेलं आहे, कृष्णे, तुझे सर्व मागील अपराध, मागील चुका स्वच्छ व्हाव्यात म्हणून माझ्या डोळ्यांसमोर तुला वनवास ठेवला आहे. कारण तू दु:ख भोगताना सुध्दा देवाला शिव्या देण्याचा संभव आहे. ते होऊ नये, तुझ्या शिव्या मी सोशीन आणि तुला गोलोकीचा मार्ग मोकळा होईल.

मुद्दा असा, जेव्हा देव आपल्यावर प्रेम करतो तेव्हा तो आपल्याला काही कष्ट देतो. आपल्या डोळ्यासमोर देतो, त्यातील त्रास आपल्या भक्ताला देवून त्याचं जे काही पाप असेल ते क्षालन करुन त्या भक्ताला वैकुंठाचा मार्ग मोकळा करुन देतो.

म्हणूनच माणसाने वासेवर (खाणे व भोगणे) ताबा ठेवून चित्ती परमेश्वर धरला की त्याची जबाबदारी परमेश्वरच उचलतो आणि त्याला सुखी ठेवतो.

म्हणून नियंत्रण हे माणसाकडे असायलाच हवे. मगच परमेश्वर वश होऊ शकतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# कृष्णाने गोपींची वस्त्रे लपविली

कृष्णाला गोपींना सांगायचं आहे की तुम्ही जे काही व्रत करता ते नीट करा, योग्य तऱ्हेने करा, मनाप्रमाणे करा, तरच देवाकडून तुम्हांला योग्य ते मिळेल आणि तुम्हांला जर कृष्ण हवा असेल तर माझी पूजा करा. मलाच सर्व अर्पण करा.

# कृष्णाने गोपींची वस्त्रे लपविली.

सर्व स्त्रिया एक व्रत करतात. हे फार पूर्वीपासून चालत आले आहे. त्याला 'कात्यायनी व्रत' असे म्हणतात. त्या व्रतामध्ये बायका काय मागतात ? हे त्यांना नीटसं कळत नसल्यामुळे किंवा संकल्प समजत नसल्यामुळे, ते व्रत म्हणजे वरच्यावर केल्यासारखे होते. या व्रतामध्ये विष्णू पती असावा, असं मागितलं जाते. ह्या व्रताचे नियम आहेत, ते असे की उजाडायच्या अगोदर नदीवर जायचे असते, सर्व वस्त्रे काढून स्नान करायचे असते. विष्णूची मनोमन पूजा करायची असते. आणि विष्णू तू माझा पती हो, माझ्या उदरी ये असे दोन वर मागितले जातात.

धर्मशास्त्राच्या नियमानुसार जिच्या उदरी परमेश्वर जन्म घेतो तिला जन्म-मरणाचा फेरा नसतो, जेव्हा इच्छा असते तेव्हा ती जन्म घेऊ शकते. म्हणून प्रत्येक स्त्री देवाजवळ, तू माझ्या उदरी ये ! असा वर मागते (त्याकाळी हे होत असते.). कृष्णाला अनेक स्त्रियांनी (गोपींनी) दूध पाजलं. देव आपल्या स्तनातील दूध प्यायला की आपली सर्व पापे धुवून जातील, म्हणून त्या गोपींनी देवाला स्तनपान दिलं.

कात्यायनी व्रतामध्ये जो दुसरा वर मागितला जातो की देवा तू माझा पती हो. सर्व गवळणी (गोपी) यमुनेमध्ये स्नानाला गेल्या. (त्यावेळी कृष्णाने गोपींची सर्व वस्त्रे लपविली ही गोष्ट आपण ऐकतो) कृष्णाला हे कळलं की सर्व गोपी कात्यायनी व्रत करता आहेत. कृष्ण या सर्व व्रतांच्या विरोधात आहे. त्याला कोणतीही व्रते मान्य नाहीत. कृष्णाला एकच व्रत मान्य आहे ते म्हणजे पुरुषोत्तम व्रत !

कात्यायनी व्रत गोपी करत आहेत हे कृष्णाला कळल्यावर कृष्णाच्या लक्षात आलं, हे चुकीचं आहे म्हणजे चुकीच्या तऱ्हेने केलं जात आहे. कृष्ण यमुना नदीच्या काठावर कदंब वृक्षाकडे आला आणि सर्व गोपींची वस्त्रे कदंब वृक्षावर टाकून ठेवली. स्नान आटोपल्यावर गोपींच्या लक्षात आलं, आपली वस्त्रे नाहीत, हा खटाटोप कृष्णाचाच असणार ! तेव्हा कृष्णाने सांगितलं मीच तुमची वस्त्रे लपविली आहेत. तुम्ही प्रथम सूर्याला नमस्कार करा. गार्ग मुहूर्त आहे. सूर्याची प्रार्थना करा, त्याशिवाय कात्यायनी व्रत पूर्ण होणार नाही.

गोपींची अवस्था दोलायमान झाली. विवस्त्र अवस्थेत कृष्ण आपल्याकडे पाहतो

आहे आणि आपण सूर्याला नमस्कार कसा करणार? (ह्या कथेचा बराच वाईट अर्थ करुन दिला जातो किंवा केला गेला.) कृष्णाचं वय आहे सात वर्षे. त्याला गोपींची ती अवस्था काय आहे (लाज-शरम) हे काही कळत नाही. परंतु त्याला त्या गोपींना इतकंच सांगायचं आहे की तुम्ही जे काही व्रत करता ते नीट करा, योग्य तऱ्हेने करा, मनाप्रमाणे करा, तरच देवाकडून तुम्हांला योग्य ते मिळेल आणि तुम्हांला जर कृष्ण हवा असेल तर माझी पूजा करा. मलाच सर्व अर्पण करा.

मुलं काही खरं सांगायला गेली की आई-वडील त्यांना मारायला जातात. कारण ते त्यांना पटत नाही. कृष्णही नेहमी खरं सांगायचा, मग यशोदा त्याच्यावर डाफरायची. तो म्हणायचा, कशाला गणपतीला नैवेद्य दाखवतेस? तो मला दे म्हणजे गणपतीला पोहोचेल. परंतू यशोदेला कृष्णाचं हे बोलणं रुचायचं नाही आणि समजायचं सुध्दा नाही.

नंदाने एकदा शाळीग्रामाची पूजा केली. (शाळीग्राम म्हणजे विष्णू) पूजेनंतर प्रसाद दाखवायचा म्हणून तो काहीतरी आणायला गेला. तेवढ्यात कृष्ण तेथे खेळत आला. त्याने ते शाळीग्राम पाहिलं आणि घेऊन गिळलं. नंद आल्यानंतर त्याने कृष्णाला, शाळीग्राम न दिसल्यामुळे विचारणा केली तेव्हा कृष्णाने तोंड उघडून दाखवलं. नंदाला ते बघून आश्चर्य वाटलं. कारण मी ठेवलं होतं ते एकच होतं आणि कृष्णाच्या तोंडात बरीच शाळीग्राम आहेत. नंदाला कृष्णाबद्दल बरचं काही समजून गेलं. त्याने शाळीग्राम कृष्णाच्या तोंडातून काढून ठेवलं. पण कृष्णाला मारलं नाही. कृष्ण मनात म्हणाला, आईपेक्षा माझे वडिल बरे आहेत. त्यांनी मला मारलं नाही.

जेव्हा गोप-गोपी शक्तीची पूजा करायला निघाल्या तेव्हा कृष्ण त्यांना आडवा गेला. तुम्ही शक्तीची पूजा काय करता? शक्ती वगैरे काही नाही. माझीच पूजा करा. मला कोणी लोणी द्या, दही द्या, ताक द्या! हे कृष्णाचं सागणं कोणीही ऐकले नाही. सर्व शक्ती पूजेसाठी गेले. परंतू ती पूजा गोप-गोपी करु शकले नाहीत. त्यात अनेक विघ्ने आली. कृष्ण म्हणाला, मी तुम्हांला पहिल्यापासून सांगतो आहे, माझी पूजा करा, कोणतीही विघ्ने येणार नाहीत.

एकदा ब्राह्मण वर्गाच्या मनात आले, यज्ञ करावा! परंतु यज्ञासाठी बराच खर्च

येतो म्हणून सर्व ब्राह्मण कंसाकडे गेले. येणेप्रमाणे कंसाला त्यांनी थाप मारली. (राजाला खोटं सांगून पैसे काढायचे हा धंदा त्याकाळीही चालू होता आणि आताही चालू आहे.) हा यज्ञ आम्ही कृष्णाचा नाश होण्यासाठी करणार आहोत. कंसाने लगेच आदेश दिले, भांडार उघडून या ब्राह्मणांना पाहिजे ते द्या. जे जे हवे आहे ते भरपूर घेऊन ब्राह्मण निघाले.

कृष्ण ज्या ठिकाणी आपल्या गाई-गुरांना चरायला आणायचा त्या ठिकाणी यज्ञ करायला ब्राह्मण वर्ग आला. कृष्णाने सर्व गोपांना सांगितले, ब्राह्मण वर्ग जेथे यज्ञ करतो आहे, त्या ठिकाणी गाई-गुरांना घेऊन जायचे नाही. त्यांना त्रास द्यायचा नाही. गोपाळांनी हे ऐकलं. जे ब्राह्मण यज्ञ करत होते, त्यांच्या स्त्रिया कृष्णाची भक्ती करीत असत. (बऱ्याच वेळा भोळा भाव स्त्रियांकडे जास्त प्रमाणात असतो. आणि पुरुषांकडे शंकासूर जास्त प्रमाणात असतो.) त्या ब्राह्मण स्त्रियांना कृष्णाचं बोलणं, वागणं, पटत होतं. त्या आपल्या पतींना (ब्राह्मणांना) म्हणाल्या, प्रथम कृष्णाकडे जाऊन त्याला नैवेद्य अर्पण करुया, मग तिकडे तुम्ही होम सुरु करा. ब्राह्मण आपल्या बायकांवर भडकले, कसलं कृष्णाचं काय ? तो कुठे तरी असतो, खोड्या करतो, लोकांना सतावतो, तो कसला देव ? काही त्याच्याकडे जायचं नाही. आम्हांला हे मान्य नाही. परंतु ब्राह्मण स्त्रिया हट्टाला पेटल्या आम्ही जाणारचं ! ब्राह्मण म्हणाले, कशाला उगाच भांडण आणि यज्ञात विघ्न, तुम्ही जा !

त्यातील एक ब्राह्मण विचित्र निघाला. त्याने आपल्या बायकोला कृष्णाकडे जाण्यास विरोध केला आणि खोलीत बंद करुन ठेवलं, ती म्हणाली, तुम्ही माझं शरीर या खोलीत बंद करुन ठेवलं. पण माझं मन बंद करु शकणार नाही. मी कृष्णाकडे जाणारचं ! असं म्हणून त्या ब्राह्मण स्त्रीने त्या खोलीत आपला देह ठेवला आणि सर्व ब्राह्मण स्त्रियांच्या अगोदर ती कृष्णाला नैवेद्य घेऊन आली. कृष्णाला नैवेद्य दाखवला. तिला कृष्णाने आशिर्वाद दिला, तुझं चिरंतन स्मरण होईल.

त्यानंतर बाकीच्या ब्राह्मण स्त्रिया आल्या. आपापला नैवेद्य कृष्णाला दाखवला आणि म्हणाल्या, आमचे सर्वांचे पती कृष्णा तुझ्याकडे येऊ देत. कृष्ण म्हणाला, ते आपोआपच माझ्याकडे येणार आहेत, कारण एका ब्राह्मण स्त्रीने माझ्याकडे येण्यासाठी देहत्याग केलेला आहे. तिचा हा देह जाळता येणार नाही; म्हणून त्यांना

माझ्याकडेच यावं लागणार.

सर्व ब्राह्मण स्त्रिया यज्ञ चालू होता तेथे गेल्या आणि म्हणाल्या, कृष्णाचं म्हणणं असं मी स्वत: जातीने येथे उपस्थित असताना पूर्ण अवतार असताना, माझ्याबरोबर सर्व देव-देवता असताना, आम्हांला नैवेद्य दाखविण्याऐवजी यज्ञात (अग्नीत) नैवेद्य टाकून फुकट का घालविता ? तो आम्हांला द्या. सर्व ब्राह्मणांना तो यज्ञ पूर्ण करता येईना, कारण जी ब्राह्मण स्त्री मरुन पडली होती तिचं सर्व क्रियाक्रम केल्याशिवाय यज्ञ करु शकत नाही. अशी ब्राह्मणांची पंचाईत झाली. बरं त्या बाईकडेही जाता येईना कारण ज्या झोपडीत तिला बंद करुन ठेवली होती, त्या झोपडी शेजारी आग पटत होती.

सर्व ब्राह्मण नैवेद्य घेऊन कृष्णाला शरण आले. कृष्ण म्हणाला, आता तुम्ही सर्व जा. काही विघ्न येणार नाहीत. सर्व ब्राह्मण यज्ञाकडे आले, पहातात तो यज्ञ चालू आहे आणि दुसरेच कोणीतरी यज्ञ करीत आहेत. त्या ब्राह्मणांनी त्यांना विचारणा केली, तुम्ही कोण आहात ? त्यांनी ब्राह्मणांना उत्तर दिलं, तुम्हांला यज्ञात विघ्ने आली म्हणून कृष्णाच्या भेटीला गेलात आणि येथे कोणीही नाही. त्याचवेळी कंसाने आपली माणसे तुम्ही यज्ञ करत आहात की नाही हे पाहायला पाठविली, म्हणून कृष्णाच्या सांगण्याने आम्ही सर्व देव या कार्यासाठी लागलो आणि तुमची कंसाच्या तावडीतून सुटका केली. तुम्ही सर्व शांत बसा, आम्ही हा यज्ञ पूर्ण करतो.

त्या सर्व ब्राह्मणांच्या लक्षात आलं की, कृष्णाने आम्हा सर्वांना संकटातून सोडवले आहे. त्यावेळेपासून यज्ञामधला पहिला हवी (पहिला वाटा) ब्राह्मण पत्नी जिचं नाव (जिने कृष्णाच्या भेटीसाठी, त्याला नैवेद्य दाखविण्यासाठी देह ठेवला) ऋतंबरा, तिच्या नावाने ऋतंबरा कृष्णाय स्वाहा म्हणून दिला जातो. कृष्णाने त्याकाळामध्ये एक गोष्ट पटवून दिली की तुम्ही जे काही असेल ते मला अर्पण करा मग ते, सर्व देवतांना पोहोचेल.

एकदा रुक्मीणीने कृष्णाला प्रश्न केला, 'देवा तू द्रौपदीला इतका का मानतोस ? तिच्यासाठी कधीही, केव्हाही धावत जातोस, याचं कारण काय ?' तेव्हा कृष्णानं उत्तर दिलं, 'द्रौपदी कोणतीही गोष्ट माझ्या स्मरणाशिवाय भोगत नाही.' (याचा अर्थ आपण नीट समजून घेऊ या.) द्रौपदी कोणतीही गोष्ट करताना प्रथम मला

अर्पण करते म्हणून ती मला अधिक प्रिय आहे. तेव्हा रुक्मीणीने पुन्हा कृष्णाला प्रश्‍न केला, 'हे द्रौपदीला कुणी शिकवलं ?' कृष्णाचं उत्तर असं, 'ती आपल्या मनाने हे सर्व करते. त्याला माझा पूर्ण आशिर्वाद आहे.' 'देवा तू तिला असा आशिर्वाद का दिलास ?' असा रुक्मीणीचा आणखी एक प्रश्‍न. कृष्ण म्हणाला, 'कलियुगामध्ये यज्ञ, होम यातील काहीही श्रेष्ठ नाही. नाम आणि दान या दोनच गोष्टी श्रेष्ठ आहेत. जसा माणसाचा अहंकार वाढेल तसं त्याने दान करुन तो अहंकार दाबून टाकला पाहिजे, तरच माझी भेट त्याला सूकर आहे.' कृष्णाचे सर्व भक्तांना असं आश्वासन आहे की तुमची वासनाच राहणार नाही, तुमची इच्छाच राहणार नाही. त्याला म्हणतात, देवाची ओढ, देवाची भक्ती, देवाची भेट !

तुकाराम महाराज म्हणतात, 'पतिव्रता जाण तैसी माझी भक्ती, देवा असो तुझ्या ठायी' पतिव्रतेला जसं नवऱ्यापुढे काहीही दिसत नाही. त्याप्रमाणे देवा मला तुझी पतिव्रता व्हायचं आहे. तशी ओढ मला लागू दे. इथपर्यंत आपल्याला देवाची ओढ लागली पाहिजे. यापेक्षा काहीही वासना असता कामा नये. वासनेचं बीज माणसाच्या मनामध्ये नेहमी असतं. एखाद्या माणसाने जरी ठरवलं आज उपवास आहे काहीही खायचं नाही तरी वासना ही (खायची) येतेचं. हे बीज गळून कसं जाईल ?

आपल्याला ययातीची गोष्ट माहीत असेल, ज्याने वासनेसाठी आपल्या मुलाचे (पुरुचे) आयुष्य घेतले, परंतु वासना काही शमली नाही, ती थांबली नाही, तिचा क्षय झाला नाही. शेवटी आपल्या मुलाचे आयुष्य (तारुण्य) ययातीने परत केले. मग खरा भोग मिळतो कुठे ?

सर्व चित्ती, भोगी नारायण ! भोगतो कोण ? नारायण ! आपल्याला बऱ्याचदा याचा अर्थ समजत नाही. 'तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हांशी.' देवच गरोदर रहातो. हे विक्षिप्त वाटेल, परंतु जी स्त्री गरोदर आहे, तो गरोदरपणा प्रत्यक्ष परमेश्वर घेत असतो, म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, गर्भवासी देव ते झेलतो. ज्या ठिकाणी गरोदरपणा देव झेलायला नसतो तेव्हा मोठ-मोठ्या श्रीमंत लोकांना संतान नसते, हे आपण पहात आलो आहोत.

असं म्हटलं जातं, परमेश्वर आपल्या सुदर्शनानिशी गर्भ झेलतो तो गर्भ पोसत

असतो, त्याला आपल्या सान्निध्यात ठेवत असतो. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, 'कधीतरी होती तुझी-माझी एक ज्योती.' देवा आपण दोघे एकच होतो म्हणजे देव आणि लहान मूल एकाच ठिकाणी असतात. जेव्हा ते बाळ जगात बाहेर येतं आणि क्याँ.. करु लागतं तेव्हा मी कोण? मी कोण? त्याला एक नाव चिकटतं, तो मग याचा हा, त्याचा तो, एका मोठ्या संस्थेचा चिटणीस असा प्रवास सुरु होतो आणि ज्याच्या बरोबर त्याचा संग होता ते तो विसरतो. अहंकार चढत जातो त्यात मीपणा नष्ट होतो तो त्याच्यासह (जय राम सीताराम) देहाची लाकडे स्मशानात जळून जातात तेव्हा!

आपण लहान मुलांचंच बघा, त्याला काहीही कळत नसते तरी म्हणतात, 'बाप्पा.' नमस्कार नाही केला तरी त्याला बाप्पा म्हणण्यात आनंद होत असतो. तो जसजसा मोठा होऊ लागतो तसा देवाचे नावही विसरतो, आणि नमस्कार तर नाहीच, वाटेत, रस्त्यातून जाताना एखादं मंदिर लागलं तर नमस्कार कसा करतो? एकमेकांना घाईत सलाम करतो, म्हणजे नुसता हात वर करुन टाटा करतो तसा! असं काहीतरी करतो. हातात जर पिशवी असेल तर खाली ठेवत नाही आणि हात जोडून नमस्कार करणार नाही. पिशवी खाली ठेवली आणि कोणी उचलून नेली तर? ही भीती!

अर्थात गोष्टींचं आकर्षण हे माणसाला इतकं असतं, एक बाई मारुतीला प्रदक्षिणा घालत होती. तिच्या हातात एक पिशवी होती. एका माणसाने तिला विचारलं या पिशवीत काय आहे, जी तुम्ही हातातच धरुन प्रदक्षिणा मारत आहात, तेव्हा ती बाई म्हणाली, या पिशवीत माझ्या चप्पला आहेत. बाहेर ठेवल्यावर चोरीला जातील म्हणून मी त्या पिशवीत ठेवल्या आहेत. म्हणजे चप्पला हातात धरुन ती बाई प्रदक्षिणा घालत होती. माणूस कुठपर्यंत जाऊ शकतो त्याचं हे उदाहरण.

माझ्या म्हणण्याचा रोख असा, माणूस आपल्या तऱ्हेने अहंकाराच्या आहारी जातो. आपण मूळ मुद्दा पाहू या. देवाची आणि मुलाची कधीतरी एक ज्योत होती म्हणजे देवच प्रत्येक भोग देत असतो आणि घेत असतो. या तऱ्हेने कृष्णाने गवळनींना भोग दिले, त्याने त्यांच्या वासनेचा क्षय केला. त्या शिल्लक ठेवल्या नाहीत. ज्या ठिकाणी भोग भोगण्याचा आनंद निर्माण व्हायचा त्या ठिकाणी कृष्ण

जाऊन बसायचा आणि तो आनंद घ्यायचा. आनंद देवच घेतो. जसं लोणी देव खातो म्हणजे माणसाला कळत नाही. सगळ्या दुधातला उत्तम भाग म्हणजे लोणी, आणि सगळ्या उत्तमातील उत्तम गोष्ट आपण कोणाला देतो ? देवाला देतो ! प्रसाद देवाला द्यायचा म्हणजे उत्तमातील उत्तम पदार्थ वापरुन आपण प्रसाद करतो. फक्त नारळ आपण देवाला काही वेळा खराब देतो. कशाला मोठा नारळ हवा, लहानातील लहान चालेल !

देवीला ओटी द्यायची आहे, कसला तरी अडीच रुपयाचा खण घ्यायचा आणि देवीची ओटी भरायची ही आपली वागणूक ! ही आपली इच्छा ! असं मी का म्हणालो ? समजायला सोपं आहे. आपल्याकडे एक श्रीमंत बाई येणार आहे तेव्हा तिची ओटी भरायची आहे, मग चांगल्यातला चांगला टू बाय टू चा पीस आपण विकत घेतो कारण आपली शान जाता कामा नये. परंतू तीच इच्छा आपण देवीसाठी वापरतो का ? नाही ! कारण तिच्याकडे आपली इज्जत जाणार नाही. ती कुणाला सांगायला जाणार नाही. असं हे माणसाचं गणित आहे.

परंतू सामान्यत: प्रसाद आपण चांगल्यात चांगला दाखवतो. याचा अर्थ असा, चांगल्यात चांगलं जे माझ्याकडे आहे ते देवाला देणे. म्हणून दूधातील जे चांगल्यात चांगलं, उत्तमातील उत्तम ते प्रत्यक्ष भगवानच घेत असतो. परंतू माणसाची पध्दत कशी ? चांगल्यात चांगलं देवाला दाखवायचं आणि ते आपणच खायचं. परंतू कृष्णाने काय केलं ? मी प्रत्यक्ष हजर आहे तेव्हा ते मीच खाणार. तो गणपतीला दाखविलेला नैवेद्य असो नाहीतर आणखी कोणाला. गणपती आणि मी एकच ! कृष्णाने योग्य उत्तर दिलं.

तुम्ही जे देवासाठी करता ते देवासाठीच सोडा तर तुमच्या मनाला शांती मिळेल. हे कृष्णाने व्यवहाराने जगाला दाखवून दिलं. मीच खाणार आहे ते मलाच पोचणार आहे. तुमचे जे भोग आहेत, तुम्हांला जी जी सुखं आहेत, ती प्रत्यक्ष मी घेणार आहे आणि तुमची वासनेची, भोगाची तहान शमविणार आहे. जेव्हा तुम्हांला वासनेचा कंटाळा येणार तेव्हाच तुमचं मन माझ्याकडे लागणार. म्हणून सर्व सुखाचा, वासनेचा कृष्णाने गोप-गोपींना कंटाळा आणला आणि सर्वांना आपल्या चरणी लीन करुन गोलोकाचा मार्ग त्यांना खुला करुन दिला.

कृष्णाने असं म्हटलं, जे जे काही आहे ते मला अर्पण करा. (थोडक्यात हे सर्व तुझे आहे ते तुलाच अर्पण) ते तुम्ही मला देत आहात त्यात काही मोठं कौतुक नाही. फक्त त्यातील तुमचा अहंकार मी काढून टाकीत आहे. अशा नानाविध अंगाने कृष्णाने गोप-गोपींमधील अहंकार तर काढलाच, त्याही पलीकडे त्यांच्यातील षडरिपू काढून टाकले आणि त्या सर्वांना श्रेष्ठत्वाच्या जागी नेऊन ठेवले. त्यांच्या सोबत राहून मुक्तीचा मार्ग त्यांना मोकळा केला. म्हणून गोप-गोपी श्रेष्ठ मानले जातात. जे उध्दवाने सांगितलं की, सर्वात श्रेष्ठ कोण? जे परमेश्वराच्या बरोबर नांदले, राहिले ते सर्व श्रेष्ठ होत.

एकदा रुक्मीणीने कृष्णाला विचारले, ‘देवा तू तुझ्या पुण्यांचा जास्तीत जास्त वाटा कुणाला दिलास?’ तर ‘गोप-गोपी यांना!’ असं कृष्णाचं उत्तर रुक्मीणीला आहे. मग तो पुण्याचा वाटा मला का नाही मिळाला? तेव्हा कृष्ण म्हणाला, ‘तुझा अहंकार अजून गेलेला नाही. तो शिल्लक आहे?’ कसा? मी कृष्णाची लाडकी पत्नी आहे हाच तो अहंकार. तोच शिल्लक राहिलेला आहे. तो अहंकार तुला शेवटपर्यंत पिडा देत राहणार आहे.

रुक्मीणी यानंतर बरीच दुरुस्त झाली तरीही तो अहंकार राहिला. म्हणून ती एका बाजूला, दिंडीर वनामध्ये जाऊन राहिली. अशाप्रकारे की तिच्यापासून प्रत्यक्ष परमेश्वर (विठोबा) दूर राहिला. एकमेकांकडे पाठ करुन आहेत. तुझं नी माझं जमेना, तुझ्या वाचून परि करमेना! रुक्मीणीला शिक्षा दिली, जोपर्यंत तुझा अहंकार जात नाही, तोपर्यंत तुझा-माझा मिलाप होणार नाही.

अशा तऱ्हेने आपल्या या पूर्ण अवतारामध्ये सर्वांचे अहंकार छाटत प्रत्येकाला गोलोकाचा, वैकुंठाचा मार्ग कृष्णाने मोकळा करुन दिला.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# नामस्मरण हेच श्रेष्ठ.

मीराबाईने गायन केलं, नर्तन केलं. नरसी मेहताने काय केलं ? त्याने गावोगाव कृष्ण चरित्र सांगितलं. तुकाराम महाराजांनी काय केलं ? त्यांनी सर्वत्र किर्तन केलं, ज्यात विठोबाचं गायन होतं ! जे संत पदाला पोचले, त्या सर्वांनी परमेश्वराचं गायन केलं, किर्तन केलं. या सर्वांमध्ये अगदी उच्च जागी पोचला तो नारद !

## नामस्मरण हेच श्रेष्ठ.

प्रापंचिक माणसाला गोलोक श्रेष्ठ, संन्याशाला वैकुंठ श्रेष्ठ! प्रापंचिक माणसाला कृष्णाने सांगितलं माझी भक्ती करा आणि माझ्याकडे या. ही कृष्णाची भक्ती कशाप्रकारे करायची? त्याची आराधना कशी करायची? आराधनेचे प्रकार कोणते?

कृष्णाने असं सांगितलं माझं गायन करा, माझ्या नावाने नर्तन (नृत्य) करा, माझं स्मरण करा, माझ्याबद्दल वाचन करा, ज्या मंदिरामध्ये कार्यक्रम चालले असतील तेथे सडासमार्जन करा, स्वच्छता राखा. यातील कोणतंही कराल त्याने मी तुमच्या सोबत आहे.

मीराबाईने गायन केलं, नर्तन केलं. नरसी मेहताने काय केलं? त्याने गावोगाव कृष्ण चरित्र सांगितलं. तुकाराम महाराजांनी काय केलं? त्यांनी सर्वत्र किर्तन केलं, ज्यात विठोबाचं गायन होतं! जे संत पदाला पोचले, त्या सर्वांनी परमेश्वराचं गायन केलं, किर्तन केलं. या सर्वांमध्ये अगदी उच्च जागी पोचला तो नारद!

वस्तूत: नारद हा कोण? हे आपल्याला माहीत नाही. चूकीच्या मार्गाने झालेलं मुल असल्यामुळे चांडाळ समजला गेला. नारदाला त्याकाळामधील ऋतविच गोत्रू (हे यज्ञ करणारे ब्राह्मण आहेत) त्यांनी त्याला यज्ञामध्ये अधिकार नसल्याचे सांगितले. तेव्हा नारदांने ब्रह्मदेवालाच विचारले, मी काय करावे? ब्रह्मदेवाने सांगितले, तू नारायणाचे नामस्मरण करीत जा, जगातील सर्व ब्राह्मण तुला नमस्कार करतील आणि नारद परमेश्वर नामस्मरणाच्या जोरावर इतक्या श्रेष्ठपदाला पोचला की सर्वश्रेष्ठ भगवत् भक्त म्हणजे नारद! ही उपाधी त्याला मिळाली. परमेश्वराचं सान्निध्य त्याला प्राप्त झालं. कोणालाही काही आशिर्वाद घ्यायचा असेल तर तो नारदाचा घेतला पाहिजे.

या संदर्भात एक सत्य कथा अशी, बीड जिल्ह्यामध्ये आंबेजोगाई हे पवित्र स्थान आहे. या आंबेजोगाईला मुकुंदराजाची समाधी आहे. आंबेजोगाईपासून सहा किलोमीटरवर अश्व नदी वाहते. तेथे तुटलेली दरी आहे. एका गुहेत मुकुंदराजाची समाधी आहे. (जसे ज्ञानेश्वर महाराज श्रेष्ठ मानले जातात तसे मुकुंदराज श्रेष्ठ

मानले जातात. हे ज्ञानेश्वरांच्या अगोदर होऊन गेले.) तेथे जाता येते. सामान्यतः डोंगरावरुन सहाशे पायऱ्या खाली यावं लागतं. खोल तुटलेला कडा आहे. त्याच्या वरच्या बाजूला विठ्ठल रखुमाईचं मंदिर आहे.

जे किर्तनकार असतात ते बरेच मराठवाड्यातील आहेत. हे किर्तनकार नविन किर्तनकार तयार करतात. त्याचं शिक्षण तेथे दिले जाते. दिडवर्षांचे शिक्षण असते. ते शिक्षण झाले की मुकुंदराजाच्या समाधीजवळ त्या नविन तयार झालेल्या किर्तनकाराने एकट्यानेच किर्तन करायचं असतं. किर्तन सुरु होतं रात्री दहा वाजता, सामान्यतः किर्तन संपते रात्री दोन वाजता.

असं किर्तन किती दिवस चालते ? ज्या उतरायच्या पायऱ्या आहेत त्याला कठडे आहेत. त्या कठड्यावर (अगदी वरती) कोणीतरी मनुष्य येऊन उभा राहतो. मग त्या किर्तनकाराने समजायचे, आपल्याला नारद येऊन भेटला. (बीडला नारदाचे मंदिर आहे. नारद तेथे असतो, असा बऱ्याच किर्तनकारांना अनुभव आलेला आहे.) जोपर्यंत नारद तेथे येत नाही, तोपर्यंत किर्तनकार किर्तनकारीचा धंदा करु शकत नाही.

माझा सांगण्याचा मतितार्थ असा, नारद हा केवळ नामस्मरणाने सर्वश्रेष्ठ भगवद् भक्त झाला. जसा वाल्याकोळी वाल्मिकी ऋषी झाला.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# नम्र कृष्ण अभ्यासावा.

कृष्ण हा गर्वाच्या पलिकडे असल्यामुळे तो मारुतीसमोर नम्र झाला आणि त्याने मारुतीला रामरुप दाखविले.

## नम्र कृष्ण अभ्यासावा.

भगवान कृष्णाच्या वेळेला यज्ञ केला जात असे, वरुणाची पूजा केली जात असे. त्याकाळात ब्राह्मण श्रेष्ठ मानलेले आहेत, क्षत्रिय श्रेष्ठ मानलेले आहेत. कृष्ण स्वत: (वृष्णी कुळातला) वैश्य आहे. वैश्य म्हणजे गोपालन करणारा. बायकांना बऱ्याच वेळा शुद्रत्व दिलेलं आहे. त्यांना होमाचा अधिकार नाही, त्यांना यज्ञाचा अधिकार नाही. सगळ्यांना शुद्र मानलं गेलं होतं म्हणून कृष्णाने सर्वांसाठी नविन धर्म सांगितला त्याला 'पाचरात्र धर्म' असे म्हणतात.

आपण जो करतो तो पाचरात्र धर्म! जो तुळशीमाळा गळ्यात घालतो, वारकरी संप्रदायात येतो तो पाचरात्र धर्म! आरती, पूजन हे सर्व प्रकार पाचरात्र धर्मामध्ये येतात. हा जो कृष्णाने पाचरात्र धर्म सांगितला, तो पाचरात्री परमेश्वराचे स्मरण कसं करायचं हे सांगितलं आहे. या स्मरणामध्ये उत्तर रात्री (१२ वाजल्यानंतर) प्रत्येक माणसाने 'कृष्णाय नम:' हा जप पहाटेपर्यंत करावा. पाचरात्र धर्म कृष्णाने सांगितला आणि नारदाने त्याचा जगभरात प्रसार केला. हाच पाचरात्र धर्म साईबाबांनी अलीकडील काळात सांगितला.

पाचरात्र धर्म सांगून कृष्णाने सांगितले, तुम्ही यज्ञ करु नका किंवा होमही करु नका. कोणत्याही काळामध्ये माझं स्मरण करा, मी तुम्हांला भेटेन.

हा शब्द कृष्णाने अक्षरश: पाळला. त्याची पहिली खूण काय? कृष्ण जिच्या उदरी जन्माला आला, ती देवकी! त्याकाळामध्ये मुलांच्या आई व्रत करत असत. ते व्रत असं, आईने मुलाला वाण द्यायचं. हे व्रत श्रावणात केलं जात असे किंवा नवरात्रात शुक्ल पक्षात केलं जात असे. आईने कुठे असेल तेथून मुलाला हाक मारायची, ते वाण देवा किंवा मुलाला पोहचतं असा समज आहे.

कृष्ण लहान असताना सवंगड्यांना सांगायचा, तुम्ही मला हाक मारा, मी कोठेही असलो तरी धावत येईन. त्याप्रमाणे पेंद्या वगैरे मंडळी कृष्णाला हाक मारायची की कृष्ण धावत यायचा.

देवकीने कृष्णाला तुरुंगात हाक मारली. माझा एकही मुलगा जिवंत नाही तरीही मी वाण देते आहे. देवकीच्या या हाकेला कृष्ण तिच्या मागे येऊन उभा

राहिला. देवकीला म्हणाला, तू हाक मारलीस मी प्रत्यक्ष तुझं वाण घ्यायला आलो आहे. माझे गेलेले जे भाऊ आहेत त्यांचीही वाणे माझ्याकडे दे. त्या सर्वांचे काम मी एकटाच करणार आहे.

कृष्णाने दुसरीच गोष्ट यात सांगितली. सर्वांची कामे मीच करतो. सर्वत्र मलाच समजा, मीच सगळीकडे आहे, माझ्याशिवाय कोणीही नाही. देवकीला त्याने दाखविलं, तू हाक मारलीस मी क्षणात हजर झालो. ज्याने ज्याने कृष्णाचा धावा केला, त्यांच्या सहाय्यासाठी कृष्ण धावून गेला. इतकंच नव्हे ज्याला ज्याला अहंकार झाला, त्याचा त्याचा अहंकार मोडण्यासाठीही कृष्ण धावून गेला. कशाप्रकारे तो अहंकार कृष्ण मोडायचा ?

आपण मारुतीरायांना सर्वश्रेष्ठ सेवक समजतो. एकदा मारुती द्वारकेला आला आणि त्याने विचारले, 'हे कोणाचे नगर आहे ? कृष्ण-बलराम कोण ? त्यांचा पराक्रम काय ?' त्याने तटबंदी मोडून टाकायला सुरुवात केली. सर्व यादवांना पळून लावले. बलराम आला त्यालाही मारुतीने फेकून दिले.

ही गोष्ट कृष्णाच्या कानी आली. कृष्णाने आपलं रुप बदलून श्रीरामाचं रुप घेतलं आणि मारुतीसमोर आला. तात्काळ मारुती त्याच्या चरणांवर लीन झाला. प्रभू कित्येक दिवसानंतर आज तू मला भेट दिलीस. मग कृष्णाने सांगितले या अवतारामध्ये मी कृष्ण आहे, त्या काळातील माझं काम संपलं, आता तू माझं काम करीत जा. हे कोणतं काम कृष्णाने मारुतीवर सोपवलं ? ज्यांना ज्यांना शक्तीचा अहंकार झाला, त्यांची मारुतीने जिरवली, त्यांच्या शक्तीचा मोड केला.

कृष्ण हा गर्वाच्या पलिकडे असल्यामुळे तो मारुतीसमोर नम्र झाला आणि त्याने मारुतीला रामरुप दाखविले.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# जागृत अंतर्मन कार्यक्षमतेचे भांडार

डिवचला गेलेला मनुष्य अधिक कार्यक्षमतेने कामाला लागतो. त्याचं अंतर्मन, त्याची अंर्तशक्ती जागृत होते.

# जागृत अंतर्मन कार्यक्षमतेचे भांडार

नाथपंथात अशी पध्दत आहे, एका गुरुने एकच शिष्य तयार करायचा. परंतु माझ्या गुरुंनी मला असं सांगितलं नाही. जो तुला योग्य वाटेल त्याच्या गळ्यात 'सहजयोग साधनेची' सोन्याची साखळी घाल. हे ज्ञान त्याला दे, म्हणजे मुलतः साधना शिकविणे हे माझे काम आहे. पण साधना शिकविण्यासाठी जेव्हा माणसं माझ्याकडे येणार, तेव्हाच मी साधना शिकवू शकणार! हे ज्ञान लोकांपर्यंत गेलं पाहिजे. ही मुळामध्ये आवश्यकताच का निर्माण झाली ? विसावं शतक, त्यापूर्वील शतक यातील फरक काय? विसाव्या शतकात इलेक्ट्रॉनचा वापर वाढला. घड्याळ आहे, टि.व्ही आहे, डेक आहे, ह्या सर्व इलेक्ट्रॉनचा वापर केलेल्या गोष्टी आहेत.

कोणे एके काळी जनावरांनी चालविलेल्या गाड्याच चालत होत्या. जमाना इतका बदलला की जनावरांच्या किंवा मानवीशक्ती शिवाय ही यंत्रसामुग्री चालू लागली. मग त्याच्यात मानवाने पंचमहाभूतं वापरली. तो पाऊस असो, वारा असो, अग्नी असो, आणखी काही असो. जग जलद गतीने जाऊ लागलं.

त्याकाळी मुलगी दुसऱ्या तालुक्यात द्यायची तर पंचाईत व्हायची. कारण तिला माहेरी आणायचं कसं? आणता आणता दोन दिवस लागायचे (सर्व प्रवास बैलगाडीतून केला जात असे कारण वाहनं नव्हती). आलेल्या मुलीचे सांधे इतके निकामी व्हायचे की (स्क्रूड्रायव्हरने) ते सांधे फिट करावे लागायचे! बैलगाडी त्या मुलीला खिळखिळी करुन आणायची. आता काळ इतका बदललाय की पंजाब, आसाम, मद्रास कुठेही जाता येतं, तेही सहजरित्या (अंगाचे प्रत्येक अवयव शाबूत ठेवून.)!

सर्व उपकरणं, सर्व साधनं, सर्व यंत्रसामुग्री ही वेग देणारी जन्माला आली, पण माणसाचं मन मात्र तेच राहिलं. ते मन तितक्या वेगानं त्याच्या बरोबर जाऊ शकलं नाही! आपल्या सहजरीत्या लक्षात येईल. माणसाचं मन 'जैसे थे' परिस्थितीला चिकटलेलं असतं. पटतं की नाही बघा बघू!

म्हातारी माणसं (घरातली) काय सांगणार, हे हरामखोरा ते वाढवलंस कशाला!

भादरुन ये, (काय) केस! कारण त्या मुलाच्या वडिलांनी चकोटी केलेली असते. मुलगी जर का चनीया-चोळी घालू लागली, तर तिला हे काय नेसतेस, साडी नेस. ड्रेस घातले, तर शोभते काय? पुरुषांसारखं काही तरी घालतात! आमच्या काळात नव्हतं, पण आमच्या काळातं आहे. असं का घडतं?

मी म्हटल्याप्रमाणे मानवी मन जैसे थे परिस्थितीला चिकटून राहणारे आहे. ते नियमाशी संगनमत करुन घेऊ इच्छिणारं नाही. आणि तसं जर नसतं, तर सासू-सूनेचं सहज जमलं असतं. काळ बदलला, पण ना सासू बदलल्या, ना सूना बदलल्या. याचाच अर्थ मन जमवून (Adjust) घेऊ शकत नाही. यालाच म्हणतात Generation Gap. मला कुठेतरी जर कळलं, जर मला मनाचा अभ्यास करता आला, अभ्यास करता करता मला मनाला वळवता आलं, तर मन काहीतरी अफाट कार्य करु शकते.

महाभारतात अशी एक गोष्ट सांगितली जाते, कुंती एक दिवस रडत होती. पती पांडू वारला म्हणून, आणि दिराच्या (धृतराष्ट्राच्या) आसऱ्याने जगू लागली. पाचही पुत्र प्रेम करणारे, त्यात भीम पहिला आईकडे जाणारा! (याचं कारण जेवण केलं की कुंती दोन भाग करायची एक भाग भीमासाठी आणि दुसरा भाग चार जणांसाठी.) आपलं कौतुक करणारी, कोणतीही गोष्ट जास्त देणारी आई आज का रडते? आई तुझं काय झालं? तू का रडतेस? तेव्हा कुंती म्हणाली, माझी जाऊ गांधारी आज गजगौरी व्रत करते आहे. (गजगौरी व्रत म्हणजे हत्तीवरुन साखर देणे.) ती सम्राज्ञी आहे, राणी आहे, मी सामान्य! मी काही हत्तीवरुन साखर वाटू शकत नाही. भीम म्हणाला, त्यात काय! मी तिचाच हत्ती पकडून आणतो. परंतु कुंतीने ते मान्य केलं नाही. तेव्हा अर्जुन म्हणाला, आई, आम्ही तुला इंद्राचा ऐरावत आणून देतो. भीम म्हणाला, तू बोलतोस ते ठिक आहे, पण इंद्राकडे जायचं कसं? तेव्हा अर्जूनाने बाणांची शिडी तयार केली आणि भीमाला इंद्राकडे पाठविले. भीम थेट ऐरावताकडे गेला, त्याला आपल्या सोबत चालायला सांगितले. ऐरावत भीमाला म्हणाला, प्रथम माझ्या मालकाची (इंद्राची) परवानगी घेऊन ये. भीम इंद्राकडे गेला आणि ऐरावताची मागणी केली. इंद्राने त्याला ऐरावताला घेऊन जायची परवानगी दिली. भीम पुन्हा ऐरावताकडे गेला, परंतु ऐरावतच तो, एक

शेंबडा मुलगा मला न्यायला आला आहे म्हणून भीमला एक दणका दिला. त्या दणक्याने भीम जमिनीवर पडला आणि भीमाची पाठ जमिनीला समांतर लागली. त्यामुळे भीम डिवचला गेला, माझा पराभव करणारा कोण? माझी पाठ लावणारा कोण? महाभारत असं सांगतं, भीमाची पाठ जमिनीला लागली की त्याला सहस्त्र हत्तीचं बळ यायचं! नकळत अर्थ असा, डिवचला गेलेला मनुष्य अधिक कार्यक्षमतेने कामाला लागतो. त्याचं अंतर्मन, त्याची अंर्तशक्ती जागृत होते. ही अंर्तशक्ती (भीमाची) जागृत झाली आणि भीमाने ऐरावताला उचलून गरगर फिरवले, त्यामुळे ऐरावत घाबरला. आणखी भानगड नको म्हणून मी तुझ्याबरोबर येतो असं म्हणून ऐरावत भीमाबरोबर आला.

हे उदाहरण मी इतक्यासाठी दिलं, जर माझ्या मन:शक्तीला कळलं तर मला बरीच कठीण कामं सहजरित्या करता येतील. मी शिकवतो त्या साधनेचं नांवच मुळी 'सहजयोग साधना' आहे. आपल्या सोबत, आपल्यासह जी जन्मली ती योगसाधना. आपल्या सोबत जन्माला आली, परंतु आपली तिची ओळख झाली नाही, या साधनेचा आपल्याला परिचय नाही. किर्तनकार, प्रवचनकार, पूर्वज, संतमंडळी सांगतात हे मायेचं पटल आपल्या डोळ्यांवर आलं आणि त्याने आपली तिची ओळख झाली नाही.

सोपी तर गोष्ट आहे, बदकं जन्माला येतात आणि आल्याबरोबर पाण्याकडे धावतात. त्यांना कोण सांगतं? त्यांना कोण शिकवतं? हे जे जन्मत: (सहज), त्यांच्याबरोबर जन्माला आलं, तशी ही 'सहजयोग साधना' आपल्या बरोबर जन्माला आली. परंतु ती नीट नाही पटली, नाही तीची नीट ओळख झाली. ती एकदा समजावी लागते.

कस्तुरी मृगाला कुठे कळते की कस्तुरी माझ्यात आहे; म्हणून ते इकडे तिकडे पळत असते. वासाच्या अनुरोधाने धावत असते पण समजत नाही. सारं काही आपल्यातच आहे. पण ते ना कोणी समजावलं, ना कोणी उमजावलं! ना कोणी शिकवलं!

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# सहजयोग साधनेचा आविष्कार

जेव्हा अमेरिकेचं सातवं आरमार आलं आणि बांगलादेश मुक्तीसाठी इंदिरा गांधींनी आज्ञा दिली 'आक्रमण!' तेव्हा त्यांनी कोणत्या आत्मविश्वासाच्या जोरावर सांगितलं! 'माझं सहावं इंद्रिय' मला सांगतयं मला पराभव नाही तर यश माझ्या वाट्याला आहे!

# सहजयोग साधनेचा आविष्कार.

सहजयोग साधना कोणकोण शिकले ? आपण आधुनिक उदाहरण घेऊ या, ते ही टिळकांचं ! लोकमान्य टिळकांची सभा शेगावांत झाली. त्या सभेचे अध्यक्ष होते गजानन महाराज! चरित्र आपण वाचलं असेल, गजानन विजय! या सभेनंतर काही दिवसांनी लोकमान्य टिळकांना शिक्षा झाली. त्यांना मंडालेच्या तुरुंगात पाठविण्यात आलं. तुरुंगात गजानन महाराजांचा भाकरी प्रसाद टिळकांकडे पोच झाला आणि 'गीतारहस्य' हा अलौकिक ग्रंथ, होमरुल चळवळ या नविन गोष्टी टिळकांच्या मुखातून बाहेर पडल्या.

जसं काही नवीन, वेगळं, जनतेला आकर्षित करणारं! हा एक ओझरता साधनेचा स्पर्श, टिळकांना होऊन गेला. ओरायन ग्रंथ निर्माण झाला. खगोलशास्त्र, आर्य येथे कसे आले ? आर्यांचं मुळस्थान काय ? ही सर्व कोडी टिळकांनी सहज सहज उलगडवून दाखविली.

याच्याही पुढे, अरविंद बाबू आपल्याला माहित आहेत. बॉम्ब फेकणारे, बॉम्ब बनविणारे, क्रांतीकारक ! कधीतरी त्यांना या साधनेचा स्पर्श झाला, परमेश्वराच्या शेल्याचा वारा लागला आणि अरविंद बाबू क्रांतीकारक तत्वापसून बाजूला सरकले. पाँडेचरीला आश्रम टाकून, भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी, जगामध्ये वरच्या पातळीवर असलेल्या आत्म्यांची मदत घेता येते, या कामाकडे ते वळले.

चटकन हे पटणारं नाही. परंतु सहजयोग साधनेने, आपल्यापासून वेगळ्या जगामध्ये नांदणाऱ्या आत्म्यांची मदत आपल्याला घेता येते. या जड जीवाला, जड देहाला नाही, परंतु सूक्ष्म जीवाला, सूक्ष्म देहाला त्या आत्म्यांकडून मदत घेता येते.

महात्मा गांधीनी याचं नकळत उत्तर दिलं आहे (Inner Voice) आतील आवाज. इंदिरा गांधीनी आणखी वेगळ्या तऱ्हेने सांगितले, (My Sixth Sense) 'माझं सहावं इंद्रिय!' जेव्हा अमेरिकेचं सातवं आरमार आलं आणि बांगलादेश मुक्तीसाठी इंदिरा गांधींनी आज्ञा दिली 'आक्रमण!' तेव्हा त्यांनी कोणत्या आत्मविश्वासाच्या जोरावर सांगितलं! 'माझं सहावं इंद्रिय' मला सांगतयं मला


पराभव नाही तर यश माझ्या वाट्याला आहे !

आपल्या सर्वांमध्ये सहावं इंद्रिय आहे, परंतु ते काम करत नाही. कारण आपण ते न वापरल्यामुळे गंजून बंद पडलं आहे. हे सहावं इंद्रिय सहजयोग साधनेमध्ये आहे.

प्रवचन देणे तसं मला पसंत नाही आणि आवडतही नाही. ते माझं कामं नाही. साधना शिकविणे हे माझं कामं आहे. आपल्याला या साधनेचा आविष्कार कळावा, त्याचं बाह्यांग कळावं म्हणून प्रवचनांचा (माझ्या शिष्यांचा) अट्टाहास !

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# जिजाबाईंची सत्पुत्रासाठी साधना

ज्या काळामध्ये हिंदूंची मने मेलेली होती, आम्ही राज्य करुच शकणार नाही, मुस्लिमांकडून सत्ता काबीज करुच शकणार नाही, आमच्यात कोणी राजा होऊच शकणार नाही, आम्हांला राजा होण्याचा अधिकारच नाही, ही नकारघंटा अवघ्या महाराष्ट्रात वाजत होती, त्याकाळात एक कोवळा मुलगा उभा राहिला. असं कोणतं सामर्थ्य शिवाजीत होतं ज्यामुळे तो हे अतिभव्य कार्य हातात घेऊ लागला ?

# जिजाबाईंची सत्पुत्रासाठी साधना

शिवाजी महाराज हे सर्वांचं आवडतं दैवत आहे. माझंही आहे. कारणं एवढ्या मुस्लिम साम्राज्यांमध्ये, जेव्हा भारतामध्ये हे सर्वश्रूत होतं, येथे राज्य करावे ते पातशहाने! हिंदू राजा होऊ शकत नाही! कारण कलियुगामध्ये सर्व क्षत्रिय भ्रष्ट झाले, ज्याने 'जानवे' सोडले सबब ते भ्रष्ट झाले, ही कल्पना येथे रुजली. त्या ठिकाणी एक चिमुरडा मुलगा उभा राहतो, स्वराज्य स्थापनेचे अत्यंत कठीण काम हातात घेतो, पळपुट्या मराठ्यांना एकत्र करतो. त्यांची पळपुटी लढाई तयार करतो (गनिमी कावा ज्याला म्हणतात ती पळपुटी लढाई आहे.). पळता पळता मारणे, पण आपण स्वत: न मरणे, हा गनिमी कावा!

शिवाजी महाराज आणि राजपूत यांच्या लढाईत फरक आहे. राजपूत म्हणायचे, आम्ही मरणारच! परंतु मराठे, आम्ही अजिबात मरणार नाही. का? पळता-पळता लढणार, नाहीतर भूल दाखवून पळून जाणार! तेव्हापासून आजतागायत लढण्याची पध्दत तीच आहे.

माझा सांगण्याचा रोख असा, शिवाजी महाराज श्रेष्ठ का? ज्या काळामध्ये हिंदूंची मने मेलेली होती, आम्ही राज्य करुच शकणार नाही, मुस्लिमांकडून सत्ता काबीज करुच शकणार नाही, आमच्यात कोणी राजा होऊच शकणार नाही, आम्हांला राजा होण्याचा अधिकारच नाही, ही नकारघंटा अवघ्या महाराष्ट्रात वाजत होती, त्याकाळात एक कोवळा मुलगा उभा राहिला. असं कोणतं सामर्थ्य शिवाजीत होतं ज्यामुळे तो हे अतिभव्य कार्य हातात घेऊ लागला?

इतिहास याची किंचितशी दखल घेतो. मेहेंदळेंनी शिवाजी महाराजांवर नविन पुस्तक काढलेलं आहे. पहिला खंड प्रसिध्द झाला आहे. तो वाचला असता (समजला तर) आपल्याला कळून येईल की, आपण जो शिवाजी समजतो त्यापेक्षा वेगळ काहीतरी आहे.

शिवाजी महाराज हे जिजाबाईचं सहावं अपत्य! शेंडेफळ! जिजाबाईंना जी मुलं झाली, ती सर्व मुसलमानांकडे सरदारी करावी, मुसलमानांकडे राजा हे पद घेऊन रहावं, या विचारसरणीची; परंतु जिजाबाईंना हे मान्य नव्हतं. कारण

जिजाबाई ही गुंडा महाराजांची शिष्या आहे. गुंडामहाराज हे सत्यामलनाथांच्या परंपरेतील. सत्यामलनाथ हे ज्ञानेश्वरांचे (स्वप्नात शिष्यत्व दिलं) असे शिष्य. सत्यामलनाथांची पुढील पिढी म्हणजे शिवदिन केसरी. (आपल्याला कदाचित ऐकून माहित असेल).

गुंडामहाराजांची प्रथम शिष्या जिजाबाईंची सासू दिपाबाई, नंतर जिजाबाई! जे जिजाबाईंना शिक्षण दिलं गेलं, ते नाथपंथी 'सहजयोग साधनेचं!' या शिक्षणामध्ये गर्भावर प्रयोग करणे, परिणाम करणे हा एक भाग आहे.

आमचे पूर्वज हा प्रयोग करीत असत, अगदी महाभारत काळापासून तद्दन ज्ञानेश्वरकाळापर्यंत हे चालत आलं. ज्ञानेश्वर महाराजांच्या मातोश्रीने सव्वा लाख प्रदक्षिणा सुवर्ण पिंपळाला घातलेल्या आहेत! हे आपल्याला ऐकून माहित असेल, गर्भावर प्रयोग करण्याचं हे एक साधन आहे. नामजप, नामस्मरण.

'विस्मरणातून नाम' हा शब्दप्रयोग चमत्कारिक आहे. आपण करतो ते स्मरणातून नाम. आपण समजतो की नामस्मरण करतो आहे. विठ्ठल, विठ्ठल! मग काय म्हणता राधाबाई, विठ्ठल, विठ्ठल! अरे मेल्या पडशील, विठ्ठल, विठ्ठल!

विस्मरणातला विठ्ठल वेगळा आहे. तो या कोणत्याही गोष्टीची दखल घेत नाही. या सर्व गोष्टींतून पिंड घडविणे, गर्भ घडविणे, गर्भाची पिशवी घडविणे इत्यादी गोष्टी 'सहजयोग साधने' मध्ये येतात.

जिजाबाईंनी सहजयोग साधना कशा अर्थाने केली? माझ्या उदरी येणारा पुत्र दैदिप्यमान असावा, माझी जाऊ नाशिकच्या रामकुंडामध्ये स्नान करीत असता, महाबदखान पळवून घेऊन गेला आहे, हे दुदैव नष्ट करणारा पुत्र असावा. मुसलमान पातशहाची हाजी हाजी न करता स्वयंसिध्द राजा होणारा असावा! अशा जबरदस्त इच्छा तिने बाळगल्या.

इच्छा बाळगणे, इच्छा फलद्रूप होणे याला म्हणतात संकल्पसिध्दी! ही संकल्पसिध्दी, इच्छाशक्तीचा विकास हे या सहजयोग साधनेचं अंग आहे. जिजाबाईंच्या याच इच्छाशक्तीच्या जोरावर शिवाजी महाराज जन्माला आले. इतकी बुध्दीमत्ता असणारे की वयाच्या बाराव्या वर्षी संघटना उभारणारे, स्वराज्य

स्थापनेची शपथ घेणारे, हिंदवी स्वराज्य स्थापनेची तळमळ असणारे, भूगोलाचा तज्ज्ञ असणारे, तल्लख बुध्दीमत्ता प्राप्त असणारे. हे सर्व कसं साध्य झालं ? जी नाथपंथीय साधना गुंडामहाराजांकडून आई (जिजाबाई) मार्फत आली. त्या साधनेनं मुस्लिम पातशहांबरोबर झुंजणारा, बुध्दीमत्तेचा सुयोग्य उपयोग करणारा राजा त्याकाळामध्ये जन्माला आला.

या साधनेसाठी काही तपश्चर्या करावी लागते. साधं बी. ए. होण्यासाठी आपल्याला तेरा वर्षे काढावी लागतात, तर ही विद्येचीही विद्या आहे! सत्य ज्ञान उकलून दाखविणारी, मग ही शिकायला, काही तपश्चर्या करावीच लागेलं, नाही का ?

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# सहजयोग साधना
# -एक संजीवनी-

आपण पशू, जनावरं पाहतो, (पाळीव प्राणी सोडता) त्यानांही आजार होत नसतात का? पाळीव प्राण्यांना आपण रुग्णालयात घेऊन जाऊ शकतो, परंतु जंगली प्राण्यांना औषधे कोण देते? त्यांच्यावर उपाय योजना कोण करतं?

# सहजयोग साधना - एक संजीवनी.

मानव हा पशूच आहे. परंतु त्या पशूत्वावर मात करुन त्या जागी ईशत्व आणण्याचा त्याने प्रयत्न केला. जसा पशू ज्या पंचकोनात वावरतो म्हणजे भूक, तहान, निद्रा, भीती आणि मैथून, तसा मानव सुध्दा या पाच कोनातच वावरतो. परंतु या प्रत्येक क्षेत्रात मानवाने मात केली आणि सर्व इतर पशूंवर अधिकार गाजविण्या इतपत गुण त्याने संपादन केले.

थोडसं विषयांतर करुन बोलतो, आपण सर्व धार्मिक मंडळी, अनेक जणांचे प्रवचन ऐकायला जाता. मग मी आपणास प्रश्न विचारतो, आपण का जाता ? एक उत्तम करमणूक म्हणून जाता का ? तशी करमणूक आपल्याला टी.व्ही.द्वारेही मिळू शकते !

आपणाला काही दु:खे असतात, जीवनात कुठेतरी संकटे असतात, अडचणी असतात, काही वेदना असतात, त्याला कुठेतरी उत्तरे मिळावी, काही चांगला मार्ग मिळावा म्हणून अनेक संत मंडळींच्या प्रवचनाला, त्या बोधामृताला आपण जात असतो.

माणसाचे शारीरिक आजार, शारीरिक व्याधी यासाठी डॉक्टरकडे जाता येते. पण शारीरिक व्याधी नाहीत. ऑफीसमध्ये गेल्यावर ताप देणारा ऑफिसर, घरी आल्यावर ताप देणारी बायको, असणारी मुले, शेजारी-पाजारी ! यश नसणे, अपयश असणे, मुले नापास होणे, घरात सातत्याने आजारपण येणे, मन अस्वस्थ असणे, असंतुष्टता, अशांतता असणे. हे असं का ? माणूस अस्वस्थ आहे म्हणून दारु पितो, बायका-मुलांना मारझोड करतो ! त्याची अस्वस्थता नष्ट होत नाही. त्याला सुरक्षितता नाही.

थोडासा आणखी विषय बदलून सांगतो, जे आपण पशू, जनावरं पाहतो, (पाळीव प्राणी सोडता) त्यानांही आजार होत नसतात का ? पाळीव प्राण्यांना आपण रुग्णालयात घेऊन जाऊ शकतो, परंतु जंगली प्राण्यांना औषधे कोण देते ? त्यांच्यावर उपाय योजना कोण करतं ? त्या काळात औषधे, रुग्णालये नव्हती तेव्हा माणसे आजारी पडत नव्हती काय ? पडत होती ! मग औषधे नसताना ती


माणसे कशी बरी होत होती ?

आपण गुरुचरित्र जर वाचलंच असेल तर आपल्याला एक स्मरण देऊ इच्छितो, गुरुचरित्रामध्ये श्रीनृसिंह सरस्वती (दत्त महाराज) हे आरोग्य वैजनाथ या ठिकाणी गेले. हे स्थळ आंबेजोगाई आणि परळी वैजनाथ यांच्यामध्ये आहे. या ठिकाणी जाऊन त्यांनी आपला कसला तरी आजार बरा केला.

दुसरं उदाहरण घेऊ! साईसत्चरित्रात साईबाबांना दम्याचा आजार होता. त्यांनी दम्याचा आजार कसा नाहिसा केला ? एके दिवशी साईबाबांनी आपले प्राण टाळूकडे आणले तत्पूर्वी आपल्या सहकाऱ्यांना सांगितलं, मी मरतो आहे; परंतु मला जाळायलाही देवू नका किंवा पूरायलाही देवू नका. माझ्या शरीराचे ७२ तास रक्षण करा. सर्व लोकांचा समज झाला साईबाबा गेले. ७२ तासांनी पुन्हा त्यांचे अंग गरम होवू लागले. ते जिवंत झाले. त्यांचा दमा पूर्ण गेला.

त्यानंतर साईबाबा जे बदलले ते आपण जे आता साईबाबा म्हणतो त्या स्थितीला ते आले. त्यांच्या ठिकाणी कोणत्यातरी उत्तम आत्म्याचं कलम झालं. हे बरचं असंभवनीय वाटेल, परंतु काहीही असंभव नाही.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# सुक्ष्म देह धारणा.

साईबाबांनी जडदेहात असलेला रोग (दमा) हा, जडदेह टाकला आणि जो पुन्हा देह घेतला तो दम्याशिवाय. आद्य शंकराचार्यांनी स्वतःच्या सूक्ष्मदेहाला अनुभव दिला, शृंगार, प्रेम, लैंगिक शिक्षण या सगळ्यांचा! आणि त्या सूक्ष्मदेहाला घेऊन ते पुन्हा आपल्या जडदेहात आले.

# सुक्ष्म देह धारणा.

आपणास आद्य शंकराचार्यांची गोष्ट माहित असेल. आद्य शंकराचार्य आणि मंडणमिश्र यांच्यात अद्वैतावर वाद झाला. त्या वादाची पंच, मंडण मिश्रांची पत्नी शारदंबा ही आहे. हा वाद उज्जैनला क्षीप्रा नदीच्या काठी महाकालेश्वरासमोर झाला. तिने दोघांच्याही गळ्यात पुष्पमाला घातल्या. ज्याच्या गळ्यातील पुष्पमाला कोमजेल, तो वादात हरला असं त्या काळी ठरलं.

मंडण मिश्रांच्या गळ्यातील पुष्पमाला कोमेजत आली तेव्हा शारदंबा, आद्य शंकराचार्यांना म्हणाली, मला प्रश्न विचारण्याचे अधिकार आहेत का? शंकराचार्यांनी तिला प्रश्न विचारण्यास परवानगी दिली. तिचा प्रश्न असा होता, स्त्री-पुरुष रात्री एकत्र येतात, तेव्हा स्त्रीची अवस्था काय असते आणि पुरुषाची अवस्था काय असते ?

शंकराचार्य ब्रह्मचारी, त्यात ते संन्याशी! (या प्रश्नात बरीच गुपीतं लपली आहेत, आपण ते नीट समजून घेतलं पाहिजे.) त्यांना ज्ञान आहे परंतु अनुभव नाही. त्यांनी उत्तर दिलं असतं तर ते ब्रह्मचारी नाहीत हे सिध्द झालं असतं, आणि उत्तर देत नाहीत, सबब त्यांना ज्ञान नाही हेही सिध्द झालं असतं.

अशी द्विधा अवस्था शंकराचार्यांची झाली. म्हणून एका महिन्याचा कालावधी त्यांनी शारदंबाकडून घेतला.

शंकराचार्य आपल्या शिष्यांकडे आले आणि उज्जैनाजवळ असलेल्या एका गुहेत आपला देह (जडदेह) ठेवला. तत्पूर्वी आपल्या शिष्यांना त्यांनी आपल्या जडदेहाचं एक महिना जतन करण्यास सांगितलं. मी जडदेहाचा त्याग करीत आहे, तोपर्यंत हा देह जाळू नका.

शंकराचार्यांनी, ज्याला आपण जीवात्मा म्हणतो, ज्याला आपण चैतन्य शक्ती म्हणतो, ज्याला पारमार्थिक क्षेत्रात जीवब्रह्म म्हणतो तो त्यांनी आपल्या शरीरातून बाहेर काढला आणि त्या परिसरामध्ये एक राजा मेला होता त्याच्या शरीरामध्ये या जीवात्म्याने प्रवेश केला.

राजा जीवंत झाला. सर्व लोक स्तिमीत झाले. कारण जाळण्याची तयारी झाली

असताना राजा उठून बसला. (आजही अशी बरीच उदाहरणे घडली आहेत.) राजा उठून बसला आणि कोणे एके काळी बावळटासारखा बोलणारा राजा, आध्यात्म माहित नसणारा राजा, काहीही ज्ञान नसणारा राजा, उच्च दर्जाचं बोलू लागला. चांगलं बोलू लागला. लोकांना आवडू लागला. राणीलाही आवडू लागला. राणीच्या लक्षात आलं, हा कोणी दुसरा आत्मा माझ्या मूळ पतीच्या देहामध्ये आलेला आहे. तेव्हा या आत्म्याचा देह कुठेतरी असणार!

राणीने आपल्या सर्व गुप्तहेरांना सूचना दिल्या, आसपासचा सर्व परिसर पिंजून काढा, कुठेतरी देह पडलेला असणार, मला ताबडतोब येऊन सांगा आणि तो देह जाळून टाका. गुप्तहेरांनी शंकराचार्यांचा देह शोधून काढला आणि तो जाळण्याची तयारी केली.

तेव्हा शंकराचार्यांचा एक शिष्य पद्मपाद (सुरेश्वराचार्य) याने राजाकडे येऊन हाक मारली, जशी गोरक्षनाथांनी हाक मारली ''चलो माच्छिंदर, गोरख आया'' शंकराचार्य (राजाच्या देहातील आत्मा) त्या हाकेने सावध झाले. मी मूळ शंकराचार्य आहे आणि या राजाच्या देहामध्ये आहे; तेव्हा त्यांनी पुन्हा देहत्याग केला, आपल्या मूळ देहामध्ये आले, स्वतःच्या देहामध्ये प्रविष्ठ झाले.

त्यानंतर त्यांनी शारदंबेच्या प्रश्नांची उत्तरे दिली. मंडण मिश्रांचा पराभव झाला. पतीचा पराभव झाल्यानंतर शारदंबा जेव्हा देहत्याग करायला निघाल्या, तेव्हा शंकराचार्यांनी तिला सांगितलं, आई तुम्ही मला हव्या आहात. तुम्ही साक्षात सरस्वती देवीचा अवतार आहात. तुमचा आशिर्वाद मला हवा आहे.

तेव्हा शारदंबाने शंकराचार्यांना सांगितले, मी ''श्री यंत्रा''मध्ये आहे. माझी स्थापना शारदापिठामध्ये करा. शंकराचार्यांनी तिची स्थापना मूळ जे शृंगेरी, शारदापीठ आहे, त्या ठिकाणी 'श्री यंत्र' म्हणून केली.

या कथेद्वारे मुद्दा माझा असा, आद्य शंकराचार्यांनी देहत्याग केला, जडदेह टाकला, सूक्ष्मदेह धारण केला, सूक्ष्मदेहाने प्रवेश केला.

मुद्दा मी इथून सुरु केला, जनावरे आपले रोग कसे बरे करतात? उत्तर - आद्य शंकराचार्यांनी स्वतःच्या सूक्ष्मदेहाला अनुभव दिला, शृंगार, प्रेम, लैंगिक शिक्षण

या सगळ्यांचा ! आणि त्या सूक्ष्मदेहाला घेऊन ते पुन्हा आपल्या जडदेहात आले.

आपल्याला बऱ्याच वेळा हे कोडं वाटण्याचा संभव आहे. आपल्यापैकी काही जणांना असे अनुभव असतील की एखाद्या माणसाबरोबर पटकन जमून जातं आणि एखाद्याने आपल्यासाठी कितीही केलं तरी आपण त्याला शिव्या देत असतो. असं आपण का म्हणतो ? बऱ्याच अंशी कारण, आपला जो सूक्ष्म देह आहे, त्याच्यावर कुणीतरी पूर्वी केलेले संस्कार आहेत. त्या संस्कारातून आपल्याला हे कळत नसतं आणि नकळत हे आपल्या हातून घडतं. आपण जर सूक्ष्मदेह हाताळायला शिकलो तर आपले रोग आपण स्वतःच नष्ट करु शकू ! या विषयामध्ये सहजयोग साधना बरंच काही देऊन जाते.

ही सहजयोग साधना शिकविण्यासाठी, करण्यासाठी मी काही जागा निर्माण केल्यात. 'गाणगापूरात' आमचा उपासना मठ आहे. पाचशे माणसांची सहज सोय होईल असा मोठा मठ !. परंतु आमचा एक नियम आहे तो म्हणजे शिष्यत्वाशिवाय त्या मठामध्ये कोणाला राहता येत नाही. त्याला काही कारणं आहेत.

आमच्या मठामध्ये श्रीनृसिंहसरस्वती रात्री ३ वाजता येतात. असं संपूर्ण गाणगापूरात मान्य आहे. तसा अनुभव तेथे येणाऱ्या बऱ्याच भाविकांनाही आहे. दत्तमहाराज त्या उपासना मठात येतात, याचं कारण आमची मुले तेथे रोज सातत्याने रुद्रमंत्र, पारायण, आरती, नामघोष, भजन करतात. मठामध्ये उपासना करण्यासाठी, तपश्चर्या करण्यासाठी काही जागा निर्माण केली आहे. अनुष्ठानासाठी खोली बांधली आहे. आपल्याला कदाचित माहित नसेल किंवा असेल, अनुष्ठान नावाचा (देवभक्तीचा) प्रकार आहे. तो केला असता काही वेगळ्या प्रकारचे अनुभव येतात.

हे सर्व प्रकार सहजयोग साधनेचा पाया आहे. पशू आपले रोग कसे बरे करतात ? स्वतःच बरे करतात. आपली सर्व शक्ती एकत्र करुन त्या रोगावर केंद्रीत करुन तो रोग बरा करतात. हे शिक्षण मी देतो. या साधनेमध्ये आपले रोग आपण बरे करणे, आपली शक्ती त्या रोगाकडे केंद्रित करणे, हा भाग येतो. पशू हा भाग करतात आणि रोगांवर मात करतात.

मानवाने इतकं संशोधन केलं की तो याच्यापासून दूर गेला. आपले स्वतःचे

आजार तो स्वतः बरे करु शकत नाही. परस्परावलंबी झाला. आपला याच्यावर पटकन विश्वास बसत नाही. आजारांची जी जी कारणं आहेत, ज्याला आपण चिवट आजार (Cronic Deseases) म्हणतो, हे काही पध्दतीने आपल्याला बरे करता येतात. सहजयोग साधनेनं सर्व काही शक्य आहे. आपल्याला आपलं जीवन (Span of Life), जीवनकक्षा वाढविता येते. मुळामध्ये आपल्याला देवानं बरचं काही दिलेलं आहे. परंतु त्याचा वापर कसा करावा याचं ज्ञान नाही.

सोयरोबा असं म्हणून गेले, ''उघड तुझे दशम द्वार, जे साऱ्या विश्वाचे उध्दार.'' लक्षात येते तर पहा, वस्तूतः हे आपल्याला माहीत आहे. पटकन लक्षात येत नाही. योगशास्त्रामध्ये 'मणीपूर!' साध्या मराठी भाषेत 'बेंबी' उर्फ नाभी! हे ते दशम द्वार! कोणे एके काळी आपण आईच्या गर्भात असतो, बेंबी (नाळ) याने आपण जोडलेले असतो. आजार वैगरे काही येत नाहीत. सुखी समाधानी असतो, चांगल्या प्रकारे असतो, स्वस्थ असतो आणि जेव्हा बोंबलत बाहेर या जगात येतो, क्वॉ, क्वॉ करीत. संस्कृतमध्ये कोहं, कोहं! मी कोण आहे ? संपूर्ण आयुष्यभर शोधत राहतो. मी कोण आहे ? उत्तर मिळत नाही. मी कोण आहे याचं. नावं दिलं आहे तो स्टॅम्प आहे. अनिल म्हणा, सुनील म्हणा, तो एक स्टॅम्प बसलेला आहे. हे दशम द्वार आपण काहीवेळा उघडतो. केव्हा ?

आपल्या पोटात दुखू लागलं की, आपली आई म्हणा, आजी म्हणा आपल्या बेंबी मध्ये तेल घालून व्यवस्थित रगडत असत. याचा अर्थ त्यात काही तथ्यांश आहे. त्या दशमद्वारामध्ये काही अर्थ लपलेला आहे म्हणून योग्यांनी असं सांगितलं, तू असा काही जप कर, जो मणीपूर जप असेल! हे दशम द्वार तू उघड आणि त्यात शक्तीचे असे लोट सोड की ज्याने तू आपले आजार बरे करु शकशील.


हे संभवनीय आहे. परंतु ते उघडायचं कसं? त्याचं काही शास्त्र आहे. ते आपल्याला कळलं पाहिजे. त्याचं शिक्षण सहजयोग साधनेत आहे आणि ते मी शिकवतो.


या शिक्षणासाठी मुंबईत, श्रीक्षेत्र गाणगापूर येथे मी काही जागा निर्माण केलेल्या आहेत. परंतु शिकणार कोण? कारण आपल्याकडे तेवढा वेळ नाही. सदानकदा माणसाच्या मागे धावपळ लागलेली असते. या धावपळीत तो जे काही

करत असतो, त्याने खरं सुख त्याला लाभतंच असं नाही आणि जर ते सुख त्याला लाभत असेल तर तो अशांत, अस्वस्थ का ? नेहमी तणावाखाली तो का वावरतो ? सतत संकटामध्ये का सापडतो ? इतकं होऊनही त्याला सुलभ मार्ग सापडत नाही आणि जेव्हा योग्य मार्ग दिसू लागतो तेव्हा वेळ निघून गेलेली असते. (अर्थात तो म्हातारपणाकडे गेलेला असतो.) त्याला देवाची आठवण आलेली असते, पण अशा वेळेला देव तरी काय करणार ? बिचारा स्वस्थ बसून राहतो आणि म्हणतो जेव्हा वेळ होती तेव्हा एकदाही माझं स्मरण केलं नाहीस, आता मी काय करणार ! भोग आपल्या कर्माची फळे ! जयराम, श्रीराम !!

हे पुष्प संपवताना मला सांगावसं वाटतं, योग्यवेळी, योग्य गोष्ट केली असता पुढे पश्चाताप करण्याची वेळ येत नाही. माझ्या सद्‌गुरुंकडून मला जे प्राप्त झाले ते मी सर्व सामान्यांना देण्याचा प्रयत्न करीत आहे. जे येतील त्यांना त्याचा लाभ होईल. जीवन शांत, स्वस्थ, सुखमय होईल, जसे आनंदाचे डोही आनंद तरंग ! आनंदची अंग आनंदाचे !!

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





सद्गुरु श्री भाऊ महाराज

# साधना उपासना यासाठी पाया भरणी

मानवी जीवनांत व्यक्तिमत्वाला महत्व आहे. मानवी जीवन क्रियमाणांतून साकारते. मानवाच्या कारण देहात जन्मोजन्मीचे सूक्ष्म संस्कार कोरलेले असतात. अनुकूल संधी प्राप्त होताच संस्काराचे प्रकटीकरण होते. प्रकटीकरणांतून व्यक्तिमत्व साकारते.

# साधना उपासना यासाठी पाया भरणी

जन्मोजन्मी आपल्यावर उमटलेले संस्कार व इहजन्मी प्राप्त देहांत आई-वडिलांपासून संक्रमित सहज प्रवृत्ती म्हणजे मानवी जीवन होय. आत्मोन्नतीसाठी साधनेची आवश्यकता असते. प्राप्त परिस्थितीत एकरुप होण्यासाठी धर्मानुसार उपासनेची गरज आहे. उपासनेमुळे कर्मप्रवणता येते. जन्मोजन्मीचे संस्कार आत्म्याला साधनेकडे खेचतात. गुढविद्या - गुढ रहस्य - अनाकलनीय अनुत्तरीत प्रश्न त्याला खुणावू लागतात. साधना धर्मातीत आहे.

मानवी जीवनांत व्यक्तिमत्वाला महत्व आहे. मानवी जीवन क्रियमाणांतून साकारते. मानवाच्या कारण देहात जन्मोजन्मीचे सूक्ष्म संस्कार कोरलेले असतात. अनुकूल संधी प्राप्त होताच संस्काराचे प्रकटीकरण होते. प्रकटीकरणांतून व्यक्तिमत्व साकारते. व्यक्तिमत्व विकासात क्रियमाणाचे महत्व पटले तर क्रियमाणयुक्त संस्कार बदलता येतात. यासाठी सत्संग, सद्ग्रंथाचे वाचन इत्यादी गोष्टी आवश्यक आहेत.

सद्ग्रंथाचे वाचन हा हेतू मनात ठेवून शिष्य परिवाराकडून संत्चरित्र पारायण, मनन इत्यादी गोष्टी आयोजित केल्या जातात. उपासनेतील आराधना, स्पंदन लहरीसाठी गेयता, ताल बध्दता इत्यादी क्रियांतून आईवडिलांकडून संक्रमित सहजप्रवृत्ती बदलता येते. या बदलासाठी सहजयोग साधना उपयुक्त ठरते. तुम्ही जन्माला येताना सोबत जन्म घेते म्हणून सहज; योग संबोधण्याचे कारण, संस्कारित पुढे चढविलेल्या आत्म्यासोबत म्हणून योग! आत्मोन्नतीसाठी, आत्म्यासोबत जन्मलेल्या सहजयोग साधनेचा वापर केला पाहिजे.

मानवी भौतिक शरीर व त्यातून आकार घेणारे भौतिक जीवन याला सहजप्रवृत्तींचा आधार आहे. भौतिक शरीर पंच महाभूतांचे आहे. या भौतिक शरीराशी संलग्न पंचकोषांचे शरीर आहे. पंचकोषात्मक शरीरावर आघात, बदल आवश्यक आहेत. हे आघात काही टप्प्यांपर्यंत उपासनेच्या मार्गाने तद्नंतर आराधनेच्या, मानसपूजा मार्गाने करावे लागतात. पंचकोषांतर्गत सूक्ष्म शरीर बदलण्याची प्रक्रिया कारणदेहांत बदल घडवते. इथे साधनेचा प्रांत सुरु होतो.

साधनेच्या प्रांतात प्रवेश केल्यानंतर सुख-दु:खांचे भास, जन्मभर जाळणारी चिंता या गोष्टी उरत नाहीत. आत्मोन्नतीमधील अडथळ्यांची ढिगारे नसल्यामुळे आत्मा मुळप्रवृत्तीनुसार विकासाकडे झेपावतो. आत्म्याचा अंर्तविकास हा व्यक्तिमत्वाचा इहजन्मी, पुढील जन्मी परमोच्च विकास होय.


पुन्हां केव्हांतरी साधनेच्या अंगणांत प्रवचनाद्वारे भेटूं

- भाऊ

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# भाग दुसरा



# माणूस अस्वस्थ असणे

भूक, तहान, भय, निद्रा, मैथून या पंचकोषातून जेव्हा मानव पशूपेक्षा वेगळा राहणार, तेव्हा तो स्वस्थ राहणार.

# माणूस अस्वस्थ असणे

सहजयोग साधनेवरील पहिलं पुष्प आपण वाचलं असेल; त्यातील ''सुक्ष्मदेह धारणा'' या शिर्षकाखाली मी साईबाबाचं, आद्य शंकराचार्यांचं उदाहरण दिलं होतं. त्यात सोयरोबा काय म्हणतात? ''उघड तुझे दशम द्वार!'' योगशास्त्राप्रमाणे मणीपूरचक्र ज्याला आपण नाभी उर्फ बेंबी म्हणतो, असं म्हटलं होतं. हे द्वार उघडायचं कसं? आपण सुताराकडे गेलो, त्याला सांगितलं, माझं हे द्वार उघड, तर तो ड्रील करील! ड्रीलींग करुन तो भोक पाडेल हो! तसं चालायचं नाही. दरवाजा उघडण्याचं काही शास्त्र आहे; हे कळलं पाहिजे. स्वरयंत्र, कंठमणी, कृष्णमणी! लहान मुलाचा जन्माला आल्यावर कधी-कधी कंठ चालू नसतो; मग नर्स असं कधी करत नाही, मुलाचा आवाज येत नाही, चला त्याच्या नरड्यात चमचा घालू या! मुलाच्या तंगड्या धरुन त्याला उलटा करतात आणि त्याच्या ढुंगणावर चापट मारतात. चापट बसताच ते मूल क्याँ ऽऽ करु लागतं. टेक्निक वेगळं आहे.

मुद्दा माझा असा, ज्या तऱ्हेने पशू आपला आजार स्वतःच बरा करण्यासाठी आपल्या सगळ्या नाड्या, आपली सर्व इंद्रिये कक्षेत ठेवतात, ते सुध्दा मानवाला शक्य झालं पाहिजे, याचं कारण पूर्वीपेक्षा आजार वाढले, अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. थोडक्यात, आजाराचं स्वरुप, ताणतणावाचं स्वरुप, इतकं वाढलं की, आजकालच्या भयंकर आजारांवर उत्तरं मिळेनात, औषधे मिळेनात, नवीन औषधे आली आहेत त्याचेही काही दिवसांनी दुष्परिणाम होत आहेत. त्यासाठी आपणच आजारांवर उत्तर शोधून काढलं पाहिजे. जादू तर कुठेही नाही.

आजकाल बऱ्याच अंशी थोतांड आहेत. अमक्याला अमुक केलं की अमूक प्रश्न सुटतो. असे प्रश्न जर सुटले असते तर लोकं याच कामाच्या मागे लागली असती. आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपणच काहीतरी केलं पाहिजे; आपणच आपली तब्येत चांगली राखली पाहिजे. आपलं कुटुंब चांगलं ठेवलं पाहिजे, आपला समाज चांगला ठेवला पाहिजे, आपलं राष्ट्र चांगलं ठेवलं पाहिजे; अधिक आपल्या यशामध्ये आपला आनंद आपल्याला लुटता आला पाहिजे. मेल्यासारखं जीवन जगण्यात काय हौशीलपणा आहे? त्याकरिता पहिल्या पुष्पात मी आपणांस शिवाजी महाराजांची कथा सांगितली. जिजाबाईंच्या जीवनाचा संक्षिप्त भाग


सांगितला. जिजाबाईनं गर्भात मुल कसं वाढविलं, त्याच्यावर काय आणि कोणते परिणाम कशाद्वारे केले ? गर्भातच शिवाजी महाराजांना उत्तम शिक्षण कसं दिलं ? गर्भात देता येतं का ? त्याचं उत्तर आपण पाहू !

मी आपणांस एक प्रश्न विचारतो, बऱ्याच वेळा आपण गुडघे छातीकडे घेऊन झोपतो की नाही ? जरा बारीक निरिक्षण करा. गुडघे छातीकडे घेऊन कधी झोपतो ? जेव्हा आपण अस्वस्थ असता, जेव्हा आपणाला झोप येत नसते, जेव्हा निद्रादेवी रुसलेली असते तेव्हा आपण गुडघे छातीकडे घेऊन झोपतो. असं का ? काही वेळा इतकी बेचैनी असते, हा प्रश्न कसा सुटेल ? उद्या माझं काय होणार आहे ? हे जे काही असते, त्या काळामध्ये आपल्याला झोप येत नाही. मग आपण या कुशीवरुन त्या कुशीवर असं आपलं वारंवार चाललेलं असतं.

या कुशीवरुन त्या कुशीवर फिरणे म्हणजे हटयोग शास्त्राप्रमाणे... माणसाचा श्वास हा दोन नाकपुड्यांपैकी एका नाकपुडीत चालू असतो. त्याला चंद्र नाडी, सूर्य नाडी असं म्हणतात. ज्यावेळी आपण उजव्या कुशीवर असतो त्यावेळी आपलं उजवं फुप्फूस काम करीत नाही, सबब उजवी नाकपुडी काम करीत नाही. तर डावी नाकपुडी काम करीत असते. डाव्या कुशीवर असतो तेव्हा उजवी नाकपुडी काम करीत असते. आपण का चूळबुळ करीत असतो. ( या कुशीवरुन त्या कुशीवर) डावं फुफ्फूस हे थंड आहे, तर उजवं फुफ्फूस गरम आहे. उष्णता देणारं उजवं फुफ्फूस, आपल्या शरीराला थंडावा मिळाला तर झोप येईल किंवा गरमपणा मिळाला तर झोप येईल म्हणून या कुशीवरुन त्या कुशीवर असा उद्योग चाललेला असतो.

हे आपोआपच होत असते आणि काही वेळाने आपण गुडघे छातीकडे घेऊन झोपतो. गर्भामध्ये मनुष्य असाच असतो, म्हणून तो स्वस्थ असतो आणि जेव्हा अस्वस्थ असतो तेव्हा गर्भाची आठवण येते म्हणून तो छातीकडे पाय घेतो आणि स्वस्थता मिळेल अशी अपेक्षा करतो. स्वस्थता मिळतेच असं नाही. याचं कारण पंच कोषातून (भूक, तहान, भय...इत्यादी) तो बाहेर आलेला नाही. भूक, तहान, भय, निद्रा, मैथून या पंचकोषातून जेव्हा मानव पशूपेक्षा वेगळा राहणार, तेव्हा तो स्वस्थ राहणार. या पंचकोषातून बाहेर कसं यायचं या विषयाकडे आपण हळू हळू येऊ या..

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# भुक-तहानेवर नियंत्रण आवश्यक

उपवासाचं तथ्य भूकेवर नियंत्रण आणण्यासाठी! शरीराला एक विश्रांती देणे, वाटेल ते न खाणे. आपल्याला आवश्यक तेवढेच खाणे आणि अती खाल्यामुळे होणारे रोग वर्ज्य करणे.

# भुक-तहानेवर नियंत्रण आवश्यक

आपण एक असा विचार करा किंवा मी आपणांस इतिहासाचा दाखला देतो, आपल्या रामायण-महाभारतामध्ये नानाविध प्रकारचे खाद्यपदार्थ आढळतात, त्यात खीर आहे, उडदाचे वडे आहेत, माशान्न, जव-गहू आहेत, बाकीचे सारे दुधाचे प्रकार आहेत. पण त्यात डोसा, मसाला डोसा, उत्तपा हे प्रकार नाहीत. बघा समजतं काय ते? अगदी अलीकडील शिवाजी महाराजांचा जीवनक्रम, तो विचारात घेऊया! राज्याभिषेक झाला रायगडावर! इंग्रजांनी त्याचं वर्णन केलेलं आहे, राज्याभिषेकासाठी जमलेल्या सर्व लोकांना मिष्ठान्नं दिलं गेलं! हे मिष्ठान्न कोणतं? खिचडी! आपण तर आजकाल खिचडी खातही नसाल! तूप घातलेली खिचडी! याचा अर्थ त्यांना बाकीची पक्वान्न माहिती नव्हती! भूक या निमित्ताने, जीभेच्या चोचलेपणामुळे माणसाने अन्नपदार्थांचे किती प्रकार जन्माला घातले! डोशाचे अनेक प्रकार, लोणच्याचे अनेक प्रकार, पंजाबी डिशेस, जीलेबीचे प्रकार, आसामी प्रकार, मद्रासी प्रकार, चायनीज प्रकार, किती प्रकार?

जेथे मी जन्मालो त्या कोकणामध्ये एक छोटसं खोपटेवजा हॉटेल आमच्या शाळेकडे (गावच्या) असायचं. तिथे आम्ही खायला काय जायचो? खडखडे लाडू! जे लाडू खाताना दात तुटला पाहिजे. परंतु लाडू तुटला नाही पाहिजे! कडक असे लाडू! आमच्याकडून कुणी मालवणला (बाजारात) गेलं तर भजी आणायचे! ती कधीची (केव्हा केलेली)! लोकं मालवणला जायचे सकाळी, भजी केलेली असायची दुपारची, आम्हांला ती मिळायची रात्री; प्रत्येकाला एक भजं! दोन मिळाली तर आनंद गगनात मावेना! दोन भजी खाल्ली. ही त्याकाळची परिस्थिती.

मुंबईमध्ये जास्त हॉटेल नव्हती. होती ती सर्व इराण्यांची. इराण्याच्या हॉटेलमधला चहा आणि ब्रून पाव-मस्का लावलेला. आता इतकी हजारो हॉटेल्स मुंबईत निघालेली आहेत की आपण हॉटेलमध्ये काय खातो हा विषय फारच महत्वाचा; परंतु मी आपणाला सांगत नाही. मी हॉटेलमध्ये काही खायचं नाही या मताचा! आपल्याला माझं म्हणणं पटणार नाही. पाश्चात्य लोक आपल्या लोकांच्या खाण्याबद्दल असं म्हणतात, भारतीय लोकं फक्त मसालेच खातात. त्याचं म्हणणं

खरं आहे. पटतं का बघा! वस्तू थोडी असते आणि मसालाच जास्त असतो. असो, या खाण्याच्या नाना प्रकारावर आपण आपलं पोट बिघडवून घेतो.

मी दत्त भक्त आहे. दत्त महाराजांना माधुकरी प्रिय आहे. मी कृष्ण भक्तही आहे. कृष्णाला काला प्रिय आहे. काला म्हणजे सर्व सामुग्री (खाद्य) एकत्र करणे आणि सर्वांनी एकत्रित खाणे. कोणे एके काळी आम्ही कोकणात असताना जंगलात जायचो (काजू गोळा करायला, आंबे गोळा करायला) आणि चटणी-भाकर, भाजी-भाकर एकत्र करुन सर्वांनी मिळून खायचो. पावसाळ्यात सड्यावर नाचणी पेरायला जायचो आणि खोपीत पाऊस पडू नये म्हणून पाट बाजूला करायचो आणि ओला भात, पिटलं म्हणजे कुळदाची पिटी आणि सुकलेला बांगडा (भाजेला) तो जीभेला लावायला (चव प्रित्यर्थ) नाहीतर कुळदाची आमटी आणि भात. हे सर्व पदार्थ चांगले म्हणून आम्ही खात होतो.

मानवाने भुकेसाठी, चवीसाठी खाद्यपदार्थांचे नाना प्रकार निर्माण केले, आपलं शरीर बिघडवून घेतलं. भूकेवर नियंत्रण कसं ठेवावं, हे आपल्या पूर्वजांनी सांगितलेलं आहे. मुस्लीम धर्मात रोजाचा धर्म सांगितला आहे. आपले उपवास आणि मुस्लीम लोकांचे उपवास यात फरक आहे. आपले उपवास म्हणजे रोज जेवतो, ते न जेवता ते न खाता, दुसरे पदार्थ (उपवासाचे) भरपूर खाणे म्हणजे उपवास!

हे उपवासाचं तथ्य भूकेवर नियंत्रण आणण्यासाठी! शरीराला एक विश्रांती देणे, वाटेल ते न खाणे. आपल्याला आवश्यक तेवढेच खाणे आणि अती खाल्यामुळे होणारे रोग वर्ज्य करणे. अती खाणे म्हणजे माणूस किती खातो त्याची कथा अशी; सर्व भटजी एका लग्नाला जमले. मोतीचूराचं जेवणं. भरपूर लाडू खाल्ले. एका भटजीच्या पोटात दु:खू लागले. तेव्हा तो डॉक्टराकडे गेला आणि म्हणाला, डॉक्टर मला इन्जेक्शन द्या!

डॉक्टर : अरे कशाला ?

भटजी : माझ्या पोटात दुखतं आहे.

डॉक्टर : कशामुळे ?

भटजी : आज जेवणात मोतीचूराचे लाडू होते; भरपूर खाल्ले त्यामुळे पोटदुखी झाली.

डॉक्टर : ही गोळी घ्या, बरं वाटेल!

भटजी : नाही मला इंजेक्शन द्या.


डॉक्टर : अरे गोळी का नको ?

भटजी : काहीतरी काय डॉक्टर, गोळी पोटात जाण्यासाठी जागा असती तर आणखी एक मोतीचूराचा लाडू नाही का खाल्ला असता!

खाणं.. खाणं... किती खावं याला काही सुमार नाही. भुकेवर पशूनं नियंत्रण आणलं नाही म्हणूनच तो पशूच राहिला. मानवाने ते आणलं म्हणून तो मनुष्य होत गेला. उकडलेलं, शिजलेलं, चांगलं भाजलेलं तो खाऊ लागला. आपल्या खाण्यावर त्याने मर्यादा ठेवल्या, म्हणून पशुपासून तो अलग झाला. माणसानं आपल्या तहानेवर नियंत्रण आणलं. पशू बघा कुठलंही पाणी पितो पण ते पचवतो. मानवाने पाण्याचे प्रकार केले. पाणी म्हणजे माझ्यामते पाणी आहे. सर्व कोल्ड्रिंक्स इत्यादी प्रकार हे फालतू आहेत. तापवलेलं, क्लोरीन टाकलेलं पाणी घ्या, पाणी हे पाणीच आहे. आपल्याला माहीत असेल जास्तीत जास्त आजार हे अन्न, पाणी आणि हवा यामुळेच होतात. पाण्यातून कितीतरी आजार होतात. पाण्यातून आजार होतात यापेक्षा माझं म्हणणं असं आहे की ते या पेयातून जास्त होतात. ज्या पेयाला मागणी (Demand) जास्त त्याचं बनावट (Duplication) जास्त; आणि आजाराचं प्रमाण जास्त. याचा अर्थ विकत घेतलेला आजार असा आहे, तेव्हा आपण त्या पेयांकडे न जाणं बरं! पाणी द बेस्ट!

शितकारी प्राणायाम असा आहे की ज्याने तुमची भूक आणि तहान शमते. आपल्याला जर का तो करता आला तर शरीरातल्या काही चरबीचे पाण्यात रुपांतर करता येतं. मुद्दा माझा असा, भूक आणि तहान याच्यावर माणसानं नियंत्रण आणलं.

।। श्रीगुरुदेव दत्त ।।



# मैथून - संभोग एक उत्तम शास्त्र

उत्तम संतती प्राप्त होण्यासाठी योग्य, उत्तम संभोग आवश्यक आहे. पती-पत्नी संबंध योग्यरित्या आवश्यक आहे. आपल्या पूर्वजांनी ते व्यवस्थितरित्या ठेवले.

# मैथून - संभोग एक उत्तम शास्त्र

तिसरं नियंत्रण मानवानं आणलं ते मैथुनावर! त्यावर कथा अशी आहे की ती आपणांस त्याची थोडीच माहित आहे. रामायण सर्वांनीच वाचलेलं आहे. पण रामायणामध्ये दशरथाबद्दल लक्ष्मणच वाईट बोलतो आहे; आपला बाप कामुक आहे. कामाचा बळी आहे. मैथून! पांडुराजाची कथाही माहीत असेल. आपण बारकाईनं पाहिलंत तर समजेल की त्या काळात उघड्यावर संभोग घ्यायची पध्दत होती. एकांताची वाट पहात नसत.

तो काळच तसा आहे. काळ बदलत गेला आणि पशू व मानव यांच्यात फरक झाला. आजही पशू याचा विचार करीत नाहीत. परंतु मानवाने तो विचार केला. त्याने मैथूनावर नियंत्रण आणलं. किती आणि कशा स्वरुपाचं नियंत्रण? एकादशी, पौर्णिमा, अमावास्या, उपवासाचा दिवस, व्रताचा दिवस, सणाचा दिवस. ही सर्व बंधनं माणसानं स्वतःवर लादून घेतली आणि मैथूनावर नियंत्रण आणलं.

कोणे एके काळी मानवाकडे हे नियंत्रण नव्हतं. मुळात लग्न पध्दतीच नव्हती. कोणीही कोणाकडे जात होते. परंतु उद्दालक ऋषींच्या मुलाने, अष्टवक्राने लग्नपध्दती आणली. ह्या सर्व प्रकारातून मानवाने मनुष्य होण्यासाठी, मनामध्ये ईशत्व निर्माण होण्यासाठी मैथूनावर नियंत्रण आणलं. नियंत्रणातूनच तो यशस्वी होत गेला. परंतु आपल्या पूर्वजांची नियंत्रण पध्दती वेगळी होती. पत्नीला पतीपासून सुख मिळालं पाहिजे. तसचं सुख पतीलाही पत्नीकडून मिळालं पाहिजे यासाठी वात्सायनानं कामसूत्रं लिहिली. कृष्णानं शृंगारलीला सांगितल्या.

ज्या काळामध्ये पुस्तके नाहीत, कुणी सांगणारा नाही, फोटो (फोटोग्राफी) नाही, टी.व्ही. नाहीत, त्याकाळामध्ये हे सर्व देवळावरच्या चित्रातूनच मांडलं गेलं. आपण ते (संभोगावर नियंत्रण कसं आणावं) विसरलो. मनुष्यत्व गमावून बसलो आणि एड्स या रोगाकडे प्रवास करु लागलो, त्या रोगाचे शिकार होऊ लागलो.

मानवानं सर्व पशूंवर प्रभूत्व गाजवून या पृथ्वीची मालकी स्वतःकडे घेतली. एवढचं नाही तर पशूंकडून कामं करुन घेतली आणि मानव हा मनुष्यत्वाकडे गेला. प्रगतीपथावर निघाला. या प्रगतीपथात बऱ्याच गोष्टी लपलेल्या आहेत. प्रगतीपथाकडे जात असतानाच त्याने आपल्या मनाला शांतता लाभावी याचाही प्रयत्न केला. सुरक्षितता लाभावी याचा प्रयत्न केला. आपलं जीवनं सुरक्षित

असावं यासाठी त्याने गावाभोवती तटबंदी उभारली. घर-बायका-मुलं सुरक्षित रहावीत यासाठी प्रयत्न केला. दृष्ट लोकांनी आपल्यावर आक्रमण करु नये यासाठी सैन्य उबारलं. जीवन चांगल निरोगी, सुरक्षित ठेवण्यासाठी वैद्य, हकिम यांची तरतूद केली. ऐनवेळी दुष्काळ पडला तरी खायला काहीतरी मिळावं यासाठी साठवणूक पध्दती निर्माण केली. त्यासाठी त्याने मडकं जन्माला घातलं. जमिनीमध्ये धान्य गाडून ठेवण्याची पध्दत सुरु केली. दुसऱ्याला कर्ज देऊन त्यावर डब्बल-टिब्बल मिळेल ही व्याजपध्दती सुरु केली. ही सारी सुरक्षिततेची साधनं आहेत.

मानवाने आपली प्रगती करीत असताना मैथून म्हणजे संभोग यावर कटाक्षाने लक्ष दिलं. उत्तम संतती प्राप्त होण्यासाठी योग्य, उत्तम संभोग आवश्यक आहे. पती-पत्नी संबंध योग्यरित्या आवश्यक आहे. आपल्या पूर्वजांनी ते व्यवस्थितरित्या ठेवले. आपल्याला गमतीची गोष्ट सांगतो, जे वाईट आजार आहेत, जे गुप्तरोग आहेत त्यामध्ये गर्मी, परमा, गणेरूया किंवा रेड प्लेग यांचा समावेश होतो. त्यांना Veneral Diseases किंवा V. D. म्हणतात.

हे मी तुम्हांला का सांगू इच्छितो की सामान्यतः शिवाजी महाराजांच्या कालखंडापर्यंत हे रोग नव्हते. हे रोग मुस्लीम सत्ताधाऱ्यांकडून भारतात आले. अहमदशहा अब्दालीला गर्मी, परमा होता असं इतिहासच सांगतो. त्याही पलीडे जाऊन म्हणायचं झालं तर सदाशिवराव भाऊला सुध्दा गर्मी, परमा होता. म्हणजे त्याकाळामध्ये हे रोग आले आणि रुजू झाले. जे संभोगातून निर्माण होतात. परंतू आपल्या पूर्वजांनी यासाठी काही नियम घातले. मैथून किंवा संभोग कसा करावा. त्यासाठी काही बैठक निर्माण केल्या. काही व्यवस्था केली होती.

कोकणामध्ये ज्यांना भाविनी किंवा देवदासी म्हणतात, पूर्वीच्या कालखंडामध्ये त्यांना गणिका म्हणत. ही त्यांनी समाजव्यवस्था निर्माण केली. ज्याने माणसाची लैंगिक भूक शमावी, निवावी आणि आता आपण पाश्चात्य देशाचं अनुकरण करता करता, रेड प्लेग, एड्सचे रोगी होऊ लागलो. पाश्चात्य देश जे औद्योगिकरणाकडे गेले त्यातून या रोगांची निर्मिती झाली. मग आमच्या पूर्वजांनी मुळात केलं तरी काय? त्यांच्या काळात पती-पत्नी मध्ये सुख नव्हतं? चिडचिडेपणा नव्हता काय? असेलही परंतु काही नियमांनी, अटींनी ते त्यांनी दूर फेकून दिले.



# मानव 'मॅनिआ' चा रुग्ण झाला.

शिवाजी महाराजांना सुध्दा मॅनिआ झाला होता. शिवाजी महाराज जेव्हा दक्षिण भारताच्या स्वारीवर गेले आणि गोवळ कोंड्याच्या कुतूबशाही जवळून श्रीशैल्य (जे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक) जवळ भ्रमरांबा देवीचं स्थळ आहे तेथे आले. ती देवी भ्रमिष्ट करते. त्या ठिकाणी शिवाजी महाराज गेले असता, मी माझा शिरच्छेद करतो म्हणून तलवार उपसली, ती मक्कना पंडितांनी काढून घेतली.

# मानव 'मॅनिआ' चा रुग्ण झाला.

मागील प्रकरणात मी मैथूनावर नियंत्रण माणसाने मिळविले हे प्रकरण सांगितले. परंतु आजच्या काळात एड्सपेक्षा भयानक रोग आला आहे तो म्हणजे मॅनिआ. हा नीट जरा समजून घेऊया.

अमेरिका जस-जशी श्रीमंत होत गेली तस तसे मॅनिआ रोगाचे पेशंट (रुग्ण) वाढत गेले. भारत जसा श्रीमंतीकडे चालला तसे मॅनिआ रोगाचे पेशंट वाढत गेले. मॅनिआ म्हणजे आपल्याला चमत्कारिक वाटेल.

इतिहासातच डोकावयाचं झाल्यास शिवाजी महाराजांना सुध्दा मॅनिआ झाला होता. शिवाजी महाराज जेव्हा दक्षिण भारताच्या स्वारीवर गेले आणि गोवळ कोंड्याच्या कुतूबशाही जवळून श्रीशैल्य (जे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक) जवळ भ्रमरांबा देवीचं स्थळ आहे तेथे आले. ती देवी भ्रमिष्ट करते. त्या ठिकाणी शिवाजी महाराज गेले असता, मी माझा शिरच्छेद करतो म्हणून तलवार उपसली, ती मक्कना पंडितांनी काढून घेतली.

यालाच आजच्या भाषेत म्हणतात Sucide on Mania. आत्महत्येकडे जाणारा रोग. हा मॅनिआ म्हणजे आहे काय ? आजच्या काळात आपणं असं म्हणू ९० टक्के माणसं वेडी आहेत.

आपल्याला हे ऐकून राग येईल कारण आपलीही गणती भाऊ वेड्यात करताहेत, आणि आपण पटकन चिडाल ! हा चटकन येणारा राग, चिडचिडेपणा, ही या मॅनिआ रोगाची सुरुवात आहे.

बघा, आपण एखाद्याला म्हणतो, चल रे चहा घेऊ. तो लगेच नकार देतो; मला चहा आवडत नाही. अरे पण का ? मला नाही आवडत ! बरीच माणसं अशी आहेत मला हे आवडत नाही. मला ते नको, मी ते करत नाही ! कारण काय ? काही नाही ! याला आपण म्हणतो थोडा स्क्रू ढिला आहे. प्रत्येक माणसाचा तो असतोच आणि तो असावा !

काही वेळा दोन बायकांच्या भांडणात तो (स्क्रू ढिला) दिसतो. आपल्याला एक

गोष्ट सांगतो, दोन बायका नळावर भांडत असतात, एक दुसरीला म्हणते, ''जास्त हुशारी करु नकोस, माझा नवरा तुझ्या नवऱ्यापेक्षा जास्त शिकलेला आहे, तुझा नवरा मॅट्रीक असेल पण माझा नवरा नॉन मॅट्रीक आहे. त्याच्यापेक्षा माझ्या नवऱ्याची लांब डिग्री आहे.'' हा जो Crackness आहे, आपला मोठेपणा सांगण्याचा जो हेका आहे, ते मॅनिआ रोगाचे चिन्ह आहे.

बरेच जण काही वेळा सांगतात, आपल्याला हे पटत नाही. आपल्याला हे आवडत नाही. आपलं एक वेगळं तत्व आहे!

यावरुन एक गंमत आपल्याला सांगतो, दोघे मित्र एकदा हॉटेलमध्ये जातात, काय खायचं, तर मसाला डोसा मागवतात. त्यापैकी एक जण काय करतो, तो मसाला डोसा उघडतो आणि आतली भाजी खातो. दुसरा मित्र हे पाहून थक्क होतो आणि त्याला विचारतो, काय रे तू फक्त आतली भाजी खाल्लीस. तेव्हा हे महाशय सांगतात, आपलं एक तत्व आहे, माझा एक मित्र आहे तो मला जे सांगतो ते मी ऐकतो. तो म्हणतो बाहेरचं काही खाऊ नकोस. आजारी पडशील! म्हणून मी बाहेरचं न खाता आतलं खातो.

तेव्हा गैरसमज कसे असतात, तत्त्वं कशी असतात जी मॅनिआकडे घेऊन जातात, त्याचे विश्लेषण करतो आहे.

हा मॅनिआ रोग होतो कशापासून? आपल्या पूर्वजांनी त्याच्यावर काय उपाय सांगितले आहेत? १०टक्के माणसं या मॅनिआ रोगाच्या तडाख्यात सापडत नाहीत. संत-महंत या मॅनिआच्या तडाख्यात येत नाहीत. काही वेळा आपल्याला असं वाटतं, त्याचा मुडदा पाडला पाहिजे, त्याला ठार मारलं पाहिजे. असे आपल्या मनात विचार येतात, ते सत्य आहे. काही वेळेला वाटतं एखाद्यानं आपलं काही वावगं केलं तर जाऊन त्याचे दात तोडावे. परंतु आपण ते करायला जात नाही. कारण तोच आपले दात तोडील. ही मॅनिआची सुरुवात असते. ही सुरुवात पुढे पुढे वाढत जाते त्याला महापातक म्हटलेलं आहे, त्याच्यावर दुरुस्ती नाही!

दुर्योधनाला मॅनिआ झालेला आहे. त्याला सर्व जगच वाईट दिसतं होतं. काही जणांना सवय असते ती दुसऱ्याच्या नेहमी चुका काढणे. मॅनिआ हा सर्व दूर

पसरलेला रोग आहे. थोडक्यात वासनेचा एक प्रकार आहे. या वासनेमुळेच मेल्यानंतरही माणसाला सुख मिळत नाही.

आपल्या कोकणामध्ये एक पध्दत आहे. अविवाहित मरण पावला तर त्याच्या नावाने वेगळा पिंड काढतात. कोकणी भाषेत त्याला निम्मा म्हणतात. म्हणजे ज्याने आपलं ब्रह्मचर्य घालविलं नाही तो निम्मा (अर्धा).

वासना शिल्लक राहिल्यामुळे तो पुढे आपल्या लोकांना छळतो. त्याला कोकणी भाषेत निर्वशी म्हणतात.

बऱ्याच वेळा मी कोडं घालतो, वरळीहून लालबागला यायला बस निघाली, त्यात ४८ माणसे (बाया-पुरुष) होती. लोअर परेलला निम्मी उतरली तर बसमध्ये किती माणसे उरली ? आपण याचं उत्तर द्याल २४ माणसं राहिली ? उत्तर आपलं चुकलं ! माझं उत्तर आहे ४७ माणसं बसमध्ये राहिली ! कारण निम्मी नावाची बाई फक्त लोअर परेलला उतरली.

हा निम्मा ज्याच्या वासना शिल्लक राहिलेल्या आहेत, असा जो मरतो तो पुढे त्रास देतो, सहजा सहजी ऐकत नाही. हा भाग पुढे घडत जातो. हा मॅनिआचा प्रकार आहे.

बायकांना जेव्हा हा मॅनिआ रोग होतो त्याचा दुष्परिणाम हिस्टेरियाकडे जातो. हिस्टेरिया याचा अप्रत्यक्षरित्या अर्थ प्रेमरोग असा आहे.

हिस्टेरियाचा पुढला प्रकार फेफरे येणे, उन्माद वायू (अर्धांग वायू) हा आहे. आपल्याला हे पटकन पटणारे नाही. परंतु हे सर्व प्रकार मॅनिआचे आहेत आणि मॅनिआ झाला याचे कारण संभोगाची इच्छा पूर्ण झालेली नाही, जे लैंगिक सुख माणसाला पाहिजे, ते त्याला पूर्ण मिळालेले नाही. हे त्याचं मुख्य कारण आहे. हा मानवावरच परिणाम होतो असं नाही तर पशूंवर सुध्दा परिणाम होतो.

आपल्याला माहित असेल किंवा नाही. सर्प आणि नागिन हे युगुल जेव्हा एकत्र येतात आणि जर आपण त्यांच्यामध्ये गेलो तर दोघंही आपल्याला डसून ठार मारतील! आपल्याला याचा अनुभव नसेल परंतु मी ग्रामीण भागातच लहानाचा मोठा झालो आणि मी हे प्रत्यक्ष पाहिलेलं आहे की, जनावरांना सुध्दा संभोग किंवा

मैथून हवा असतो. तो जर त्यांना मिळाला नाही तर ते चिडतात.

मध्ये डिस्कवरी चॅनेवल हत्तींच्या मैथूनाबद्दल भाग दाखविला गेला. त्यात हत्तीला जर मैथूनासाठी मादी मिळाली नाही तर तो किती विध्वंस करु शकतो याचं पूर्ण चित्रण डिस्कवरी चॅनेलवर दाखविलं गेलं.

थोडक्यात त्याचा भाग असा, संभोग किंवा मैथून यातून योग्य प्रकारे सुख घेतलं असता गर्मी, मॅनिआ आणि त्यापुढेही एड्स यासारखे भयंकर रोग होत नाहीत. जीवन सुखी, सुंदर बनते. जड देहामधील जीवन आणि मृत्यूनंतरचं जीवन, दोन्ही जीवन चांगली राहतात.

हे त्या काळातील लोकांना चांगलं माहित होतं. उदाहरणचं द्यायचं झालं तर रामायणातीलचं पाहू, प्रभू रामचंद्र वालीला मारतात! हे जेव्हा त्याच्या पत्नीला (ताराला) कळतं तेव्हा ती अत्यंत शोक करते. त्या शोकात तिचे उद्‌गार असे आहेत, नाथ तुम्ही मला जे सुख दिलंत असं कोणीही देऊ शकला नसता!

या उत्तरातच जीवनातील सुखाचा आणि महत्वाचा भाग आहे, आपण काय ते समजा

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# मैथूनावर नियंत्रण गरजेचे आहे.

संभोगसमयी श्वास वाढतो. मनाची गती वाढते. श्वासावर व मनावर नियंत्रण आवश्यक आहे. नियंत्रणामुळे शिघ्रपतन होत नाही. हे शास्त्र आहे. शास्त्रांत योगसाधना आहे.

# मैथूनावर नियंत्रण गरजेचे आहे.

मैथूनावर नियंत्रण आहे, ते नियंत्रण कसे? नियंत्रणा मध्ये संतती चांगली करण्याचं लक्षण आहे. जे संततीमध्ये अंतर ठेवतात त्यांना सुदृढ, हुशार संतती प्राप्त होते. नाथपंथीय साधना संतती विषयी आणि मैथुना विषयी काही वेगळं सांगते.

असं मानलं जातं की स्त्रियांमध्ये कोणी आदर्श मानलं गेलं तर ती 'उर्मिला'. लक्ष्मणाची पत्नी. १४ वर्षे पतीशिवाय राहिली आणि लक्ष्मण १४ वर्षे पत्नीशिवाय राहिला. या गोष्टीचा नाथसंप्रदायाशी संबंध आहे.

गर्भाशयात बीजांड निर्माण होते. शुक्राणूशी मिलन होते. संभोगसमयी श्वास वाढतो. मनाची गती वाढते. श्वासावर व मनावर नियंत्रण आवश्यक आहे. नियंत्रणामुळे शिघ्रपतन होत नाही. हे शास्त्र आहे. शास्त्रांत योगसाधना आहे. परंतु उहापोह नको.

नाथपंथीय साधना, मंत्र, स्तोत्र आपल्याला काय शिकवितात? याचं प्रत्यक्ष ज्ञान आपल्या पूर्वजांनी, ऋषी-मुनींनी साकार केलं. परंतु आपण ते नष्ट केलं. ते माहित करुन घेतलं नाही किंवा त्याच्याकडे गेलोही नाही. याचाच फायदा समाजातील एका वर्गाने, वर्णाने घेतला आणि तो सुसंस्कृत राहिला, सुशिक्षित राहिला.

श्रीगुरुचरित्रामध्ये असं म्हटलेलं आहे, 'मंत्राधिनं दैवतं, ब्राह्मणाधिनं मंत्रं, मंत्र जगत्कारणं, सं ब्राह्मणं मम देवः ।।' या एका वर्णाने मंत्रावर आपलं प्रभूत्व ठेवून आपल्या बुध्दीचा विकास करुन घेतला. त्यांनी वाईट केलं असं माझं म्हणणं नाही. इतर समाजाने ते करावं असं माझं म्हणणं आहे. इतर समाजाला या वर्णाने वंचित ठेवलं. याला काही कारणंही असतील.

आपल्याला इतिहास ऐकून माहीत असेल की शिवाजी महाराजांना राजा होण्याचा अधिकार नाही असा निवाडा वाई आणि पैठणच्या ब्राह्मण वर्गाने दिला. कारण क्षत्रिय कलीयुगामध्ये शुद्र झालेले आहेत, त्यांना यज्ञोपविताचा अधिकार नाही.

परंतु शिवाजी महाराज अत्यंत तैल बुध्दीचे होते. त्यांनी तोडगा काढला, तुम नही तो और सही! त्यांनी काशीच्या गागा भट्टाशी; ज्यांचा संपूर्ण देशांत ब्राह्मणवर्गामध्ये दबदबा होता; त्यांच्याशी बोलणी केली आणि त्यांच्यासमोर निवाडा ठेवला. गागाभट्टांनी यावर पुस्तके लिहिली आहेत! गागाभट्टांनी निवाडा दिला, त्या काळातही क्षत्रिय शुध्द नसले तरी त्यांना शुध्द करुन घेऊन राज्याभिषेक करु शकतो.

समजा जर त्या काळात शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला नसता तर त्याचा अप्रत्यक्षरित्या असा निकाल लागला असता, हिंदूना राज्य करण्याचा अधिकारच नाही!

तेव्हा आपणही स्तोत्र, मंत्र आत्मसात केले पाहिजेत. मी याचं प्रत्यक्ष शिक्षण देतो. अथर्वशीर्ष, गुरुगीता, रुद्र, गायत्री मंत्र इत्यादी, इत्यादी! या मंत्रांमध्ये काही शक्ती लपलेली आहे. हे माझे उद्‌गार नाहीत। पुण्यामध्ये शुक्ला नावाचे शास्त्रज्ञ आहेत आणि माझे स्नेही आहेत. त्यांनी एक यंत्र निर्मण केलेलं आहे. त्याच्यावर लहरी (Frequency), स्वरामधली कंपनशक्ती मोजता येते. ही कंपन शक्ती गायत्री मंत्रामध्ये जवळ जवळ पावणे दोन लाख आहे हे त्यांनी शोधून काढलेलं आहे.

पाश्चात्यांनी हे मान्य केलेलं आहे. आपल्या शास्त्रामध्ये काहीतरी अर्थ होता. तो सर्वच शास्त्रामध्ये आहे असं माझं म्हणणं नाही. जे खराब असेल ते फेकून देऊया आणि चांगलं असेल ते स्वीकारुया! आपलं म्हणून घेऊ या!

आज योगशास्त्राचा जगभर प्रचार झाला. हिटलरला कोणीही कितीही वाईट म्हणावं, पण हिटलरने आर्य धर्मातील काही शास्त्रांचं संशोधन करुन (Meta Physics) किंवा आध्यात्मिक शास्त्रावरचं आसन (University) जर्मनीमध्ये उभारले. याबद्दल हिटलरला द्यावं तेवढे श्रेय थोडचं आहे. त्याच्याकडून हे शास्त्र जगभर गेलं. आजही अमेरिका, रशिया, इंग्लंडमध्ये गुप्तहेर खात्याला योगशास्त्राचं (Inner Voice) शिक्षण दिलं जातं. पेशी संचलनांचं शिक्षण दिलं जातं.

आम्हांला हे माहित नाही किंवा माहित करुन घेण्याचा फंदात पडलो नाही. आम्हांला फुरसतच नसते. देवळात जायचंच तर घाईघाईने, एक सॅल्युट ठोकायचा ! बस्स ..... झालं काम !

देवाला नमस्कार कसा करायचा? शंकराला नमस्कार कसा करायचा? नंदीचा अर्थ काय? शंकराचं दर्शन कसं घ्यायचं? सोमसूत्री प्रदक्षिणा कशी करावी याचं अजिबात ज्ञान नाही आणि तरीही हिंदू म्हणून बोंब मारतो ! ज्ञान प्राप्त करुन घेण्याची अक्कलही नाही. ज्ञान प्राप्त करुन घ्यावं, काही समजून घ्यावं ! तेही नाही. माणसाने आपली प्रगती केली ती म्हणजे, समजून घेणे, त्यासाठी ज्ञान जेथे मिळते तेथे थोडा वेळ खर्च केला. भाषा शास्त्रातून तो शिकला आणि प्रगती करुन घेतली. भाषा शास्त्र नसतं तर इतकं ज्ञान, जे शब्दात बांधलं आहे ते बांधलं गेलचं नसतं.

सर्व जगाचं ज्ञान मानवाने बांधलेलं आहे. यालाच आपण (Vocabulary Sense) असं म्हणतो. आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की प्रत्येक माणसामध्ये मॅनिआ हा असतोच. आपण त्याला प्रोत्साहन न देता त्याच्यावर नियंत्रण ठेवलं पाहिजे म्हणून मी मैथून हा विषय घेतला. मैथून हे शास्त्र मानवाने किती उत्तम बांधलं, काही जणांनी आपल्या गुरुंकडून त्याचं उत्तम ज्ञान संपादून घेतलं.

गुंडा महाराजांकडून शिक्षण घेऊन जिजाबाईंनी शिवाजी महाराजांसारखा अत्युत्कृष्ट पुत्र जन्माला घातला. शिवाजी महाराजांना ते ज्ञान प्राप्त झालं म्हणून संभाजी महाराजांसारखा पुत्र जन्माला आला. परंतु संभाजी महाराजांना ते ज्ञान नव्हतं म्हणून शाहू महाराज तसे झाले नाहीत. हे एकदा इतिहासाकडे बघू लागलो की ते समजू लागते.

संतती कशी असावी हे भारतीयांनी प्रथम शोधून काढले ! त्याचं शास्त्र शोधून काढलं ! त्याचं प्रतिक शोधून काढलं ! त्याचे दिवस शोधून काढले !



# विठ्ठलपंत-रुक्मिणीबाईची साधना, उपासना

प्रदक्षिणा, नामस्मरण, मणीपूरचक्र जागृती या सर्वांतून रुक्मिणीबाई भावी संतती निर्माण करण्यासाठी तयार झाली. विठ्ठलपंत संन्याशी रुपामध्ये तयार झाले.

# विठ्ठलपंत-रुक्मिणीबाईची साधना, उपासना

आजच्या काळातील डॉक्टर काय सांगतात? आपण ज्या ठिकाणी झोपतो त्या ठिकाणी उत्तम चित्रं असावीत! आपले पूर्वजही हे सांगत असत. कोणत्याही काळामध्ये संतती चांगली व्हावी हे शास्त्र भारतीयांनी जोपासलं, त्यासाठी त्यांनी उत्तम संन्याशी, संत यांची मदत घेतली. आपल्याला माहीत असेल, ज्ञानेश्वर हे ज्ञानाचे ईश्वर मानले जातात. आपल्याला त्यांच्या आईवडिलांचे चरित्र थोडंफार माहीत असेल; परंतु चरित्राची खोली आपणाला माहीत नसावी असं मला वाटतं.

आपल्यापैकी बऱ्याच जणांचा असा समज आहे की विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई या दोघांनी आत्महत्या केली. पण हे खरं नाही. त्यांनी मुलांना सोडलं आणि प्रयाग (उत्तरकाशी) या ठिकाणी दोघं गेली. या ठिकाणी तुळशी वृंदावन आहे. हे इतिहास संशोधकांनी सिध्द केले आहे. त्या ठिकाणी त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी आपल्या मुलांचा त्याग का केला? आपली मुलं स्वतःच्या हिकमतीवर, हुषारीवर, समाजासमोर खंबीरपणे उभी राहिली पाहिजेत यासाठी त्यांनी आपल्या मुलांना त्यागलं! परंतु मुले जन्मालाच कशी घातली? थोडक्यात पाहू या!

विठ्ठलपंतांनी आपल्या पत्नीचा (रुक्मिणीबाईचा) त्याग करुन संन्यास पत्कारला. कबीरांजवळ असणारे रामानुज यांचेकडे विठ्ठलपंत गेले असं म्हटलं जातं, पुरावा तसा नाही आहे. निंबकाचार्य नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले. अद्वैत शास्त्राचे तत्वज्ञ म्हणून ते ख्यातनाम होते; त्यांचेकडे विठ्ठलपंत गेले. त्यांनी विठ्ठलपंताची चौकशी करता करता शोधून काढलं की हा गृहस्थाश्रमी संन्याशी आहे. तेव्हा संन्याशी म्हणून विठ्ठलपंतांकडून त्यांनी जे काही करवून घेतले किंवा शिक्षण दिलं त्याला १४ वेढ्याचं शास्त्र असं म्हणतात.

१४ वेढे म्हणजे आपल्या कमरेच्या किंवा नाभीच्या खाली म्हणजे कंबर (स्वाधीष्ठान चक्र) आणि नाभी (मणिपूर चक्र) यामध्ये ज्या १४ नाड्या आहेत त्यावर १४ बिंदू आहेत. हे १४ बिंदू नाथसंप्रदायी आपल्या शेल्याने, पट्ट्याने दाबून धरतो आणि या १४ बिंदूतून संभोगाकडे जाणारी शक्ती वळवून ती बुध्दीमत्तेकडे नेतो, हिटलरने लग्न न करता ही शक्ती बुध्दीमत्तेकडे वळवली.

सर्व शास्त्र मी आपणाला सांगत नाही. संभोगावर नियंत्रण करायचं आणि ही शक्ती मेंदूकडे न्यायची. यालाच आचार्य रजनीशांनी म्हटलं संभोगाकडून समाधीकडे. हा विषय पटकन कळणारा नाही परंतू आपल्या संदर्भासाठी हा विषय दिलेला आहे.

जे पट्टे बांधण्याचं शास्त्र लक्ष्मणाने अवलंबिलं, जे शिवाजी महाराजांनी अवलंबिलं, ते शास्त्र विठ्ठलपंतांनी अवलंबिलं. आपल्या १४ बिंदूंवर घट्ट पट्टा बांधून ती सर्वशक्ती Pitutary Gland जी आपल्या मेंदूच्या मध्यभागी असते, जी आपल्या वीर्यस्खलनादी अनेक गोष्टींवर नियंत्रण ठेवते तिच्याकडे वळवली. त्यांच्या गुरुंच्या (निंबकाचार्य) लक्षात आलं, आपला चेला चांगल्या तऱ्हेने प्रगल्भ झालेला आहे, याची जी संतती होईल ती चांगली होईल. ही ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी केलेली एक तपश्चर्या. आता दुसरा भाग पाहू, रुक्मिनीबाईंचा!...

आपणा सर्वांना चांगलं परिचयाचं आहे ते म्हणजे रुक्मिणीबाईंनी सुवर्ण पिंपळाला सव्वा लाख घातलेल्या प्रदक्षिणा! प्रदक्षिणेचं एक तंत्र होतं. गरोदर बाई असते किंवा डोक्यावर पाण्याने भरलेली घागर घेऊन बाई चालते त्याप्रमाणे प्रदक्षिणा घालायची असते. तशी पध्दत आहे.

प्रदक्षिणा घालताना मध्यमा वाणीमध्ये नामस्मरण करायचं असतं. मध्यमा वाणीतून ते नामस्मरण पश्चंती वाणी म्हणजे नाभीकडे येते. या नाभीचा गर्भाशयाशी संबंध असल्याने नाभी जेव्हा भगवंताच्या नामस्मरणाने प्रफुल्लीत होते तेव्हा आपोआपच गर्भाशय किंवा बीजनलीका, बिजांड प्रफुल्लीत होते. गर्भकोश चांगला निर्माण होतो, संतती चांगली निर्माण होते.

सीता कैक वर्षे रावणाच्या कैदेत राहिल्याने तपश्चर्येने चांगलं बीज पोषण करायला समर्थ झाली आणि कुश-लवांना जन्म देऊ शकली. त्यातलाच प्रकार रुक्मिणीबाईंच्या बाबतीत घडला. पती जवळ नाही, संभोग नाही, मैथून नाही. परमेश्वर भक्ती सातत्याने! प्रदक्षिणा, नामस्मरण, मणीपूरचक्र जागृती या सर्वांतून रुक्मिणीबाई भावी संतती निर्माण करण्यासाठी तयार झाली. विठ्ठलपंत संन्याशी रुपामध्ये तयार झाले.

निंबकाचार्यांनी संन्याशातून गृहस्थाश्रमाकडे जाण्याची परवानगी

विठ्ठलपंतांना दिल्यानंतर विठ्ठलपंत आपल्या घरी संसारात परतले. त्यानंतर या दोघांना जगाला ललांभूत करणारी चार बालके प्राप्त झाली. दोघांच्या तपश्चर्येने अतिशय बुध्दीवान पिढी निर्माण झाली. माझा मुद्दा लक्षात ठेवा, पती-पत्नीची तपश्चर्या असेल तर बुध्दीवान, चांगली संतती निर्माण होते.

मैथून किंवा संभोगावर विठ्ठलपंतांनी जसं नियंत्रण ठेवलं तसचं रुक्मिणीबाईंनीही ठेवलं. कित्येक वर्षे संभोगापासून दूर राहिले; आणि परिणामी उत्तम चार बालके जन्माला घातली. निवृत्तीनाथांनी नाथपंथाचा प्रचार या महाराष्ट्रात केला. त्यांचे शिष्य ज्ञानदेव यांनी अतिशय लहान वयामध्ये गीतेवर भाष्य लिहिलं ती म्हणजे ज्ञानेश्वरी! जी वाचून आजही एम. ए. झालेले चक्रावून जातात. ही बुध्दीमत्ता ज्ञानेश्वरांकडे आली कुठून! हे सामर्थ्य आलं कुठून! ही बुध्दीची कक्षा त्यांची वाढली कशी! जी गीता प्रत्यक्ष श्रीकृष्णाने आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षी सांगितली त्या गीतेवर अवघ्या १६ व्या वर्षी ज्ञानेश्वर भाष्य करतात, ही विद्वता ज्ञानेश्वरांकडे आली कुठून?

या सर्व प्रश्नाचे उत्तर नाथपंथी साधनेमध्ये आहे. माझ्यासारखा प्राथमिक शाळा मास्तराचा मुलगा (IRAS, IAS) झालाच कसा? याचं उत्तर नाथपंथी साधनेमध्ये आहे. आपल्याला ते पटकन समजेल. एवढीशी चिमुरडी जी मुक्ता तिने नामदेवाला कडक शब्दात सुनवलं, अरे देवाचा लाभला शेजार तरी नाही गेला अहंकार। चांगदेव जो १४०० वर्षे जगला त्यालाही तिने फटकारलं, अरे चांग्या १४०० वर्षे जगला पण कोरा राहिलास। असे शब्द, ते ज्ञान तिच्याकडे आलं कुठून?

अशी गोष्ट सांगतात, मुक्ता तारुण्याकडे झेपावत चाललेली. एकदा ती अंगावर कपडा न ठेवता आंघोळ करत होती आणि चांगदेव तिला भेटायला आले. तिला आंघोळ करताना पाहून ते परत निघाले, हे मुक्ताने पाहिले आणि त्यांना विचारते, तुम्ही परत का चाललात? तू आंघोळ करत होतीस म्हणून! माझ्या आंघोळीशी त्याचा काय संबंध? तू माझ्याबरोबर का नाही बोललांस? आणि तुला अवघडल्यासारखं का वाटलं? यात तिने चांगदेवाला चांगलचं झाडलेलं आहे. संत पदाला पोहोचलेल्याची नजर स्वच्छ असायला हवी.

साईबाबा म्हणतात, सौंदर्य बघण्यासाठी आहे, पण डोळ्यात विकार निर्माण करण्यासाठी नाही. हे साधं सोपं शास्त्र मुक्ताईने चांगदेवाला शिकवलं. ही ज्ञानवृध्दी, ही ज्ञानसंपदा, त्या चिमुरीकडे आलीच कशी ? ही किमया विठ्ठलपंत-रुक्मिणीबाई या दोघांनी संतती बनविण्यासाठी घातली आणि मुलांचा त्याग केल्यानंतरही घातली.

माझा मुद्दा असा की, आई-वडील आपल्या तपश्चर्येने चांगली संतती निर्माण करु शकतात. ते आपल्या हातात आहे. संतती विद्वान करणं आपल्या हातात आहे. संतती बरी नसेल, ती चांगली वागत नसेल तर ती बरी करणंही आपल्या हातात आहे.

या नाथपंथी साधनेचं मी शिक्षण देतो हे अभिमानाने सांगतो आहे.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# विश्रांती (झोप) एक उत्तम शास्त्र

जी माणस कमी झोपतात ती अधिक हुषार, प्रगल्भ बुध्दिची, अधिक विद्वान असतात.

# विश्रांती (झोप) एक उत्तम शास्त्र

आपण असं म्हणतो झोपेने मला विश्रांती मिळाली. मी एक आपल्याला उदाहरण देतो. शरीर हे कसं थकलेलं असतं! आपल्यापैकी बरीच मंडळी एस.टी. ने गावी जातात. गावी गेल्यावर असं म्हणतात, आंघोळ करुया, शरीर आंबलेलं आहे! एस.टीत नुसतं बसून असता. तरीही म्हणता शरीर आंबलं! याचा अर्थ आपलं मन थकलं. सबब शरीर थकलं! शरीराने काही केलेलं नाही. याच्या उलट मी तुम्हाला आणखी एक उदाहरण देतो. आपण ट्रीपला जातो. तेथे इतके कुदतो, खेळतो, संध्याकाळी घरी येतो, आंघोळ करतो आणि म्हणतो काय फ्रेश वाटलं! हे कसं ?

याचा अर्थ थकवा आणि झोप याचा परस्पर संबंध काहीही नाही. आपण जी निद्रा घेतो ती मुळात निद्राच नाही. विश्रांती घेतो ती विश्रांतीच नाही. याचं एक शास्त्र आहे. ते अवगत करुन घेतलं तर हीच झोप आपल्याला ताजतवानं करते. आपल्या पेशीत संजीवनी आणून देते. आपल्यात चैतन्य आणून देते. याचं शिक्षण मी देतो.

मुळात निद्रा जन्माला कशी आली ? त्याचं काही गणित आहे का ? पशु-पक्षी निद्रा कशी घेतात आणि मानव निद्रा कशी घेतो ?

मी माझ्या पूर्वीच्या आठवणीत जातो! माझं बालपण गेलं कोकणात! त्याकाळी ईलेक्ट्रिसिटी नाही. मी समईवर अभ्यास करीत असे. काळोख पडला की कोकणात तेव्हा माणसं झोपत असत! आता झोपत नाहीत, तर टी.व्ही. पहात असतात! काळोख पडला की पिठलं-भात त्याच्याबरोबर सुका बांगडा खाल्ला की माणसं झोपायच्या तयारीत, पहाटे ४ वाजता उठत! म्हणजे किती वाजता झोपायची! साडेसात-आठला! मी घड्याळ लावून पाहायचो दहा वाजता त्यांची मध्यरात्र! सर्वत्र घोरणं सुरु! सारेगमपधनीसा! एक एका आवाजात, तर दुसरा दुसऱ्या आवाजात!

मी जेव्हा रात्रीचा अभ्यास करु लागलो, तेव्हा माझ्या लक्षात आलं की मी रात्री बराच अभ्यास करु शकतो. मानवामधील बरीच सुधारणा जेव्हा ईलेक्ट्रिसिटी आल्यानंतर तो, ती जास्त जाळू लागला. अधिक वाचू लागला. टी. व्ही. बघू

लागला! अधिक बुध्दिवान होऊ लागला. हेच उदाहरण मी निद्रेकडे लावतो. जी माणस कमी झोपतात ती अधिक हुषार, प्रगल्भ बुध्दिची, अधिक विद्वान असतात. पंडीत जवाहरलाल नेहरु फार थोडे झोपत असत! आपल्याला माहीत असेल, ते त्या काळातील आणि आजच्या काळातीलही अधिक विद्वान होते.

जगातील सर्वात मुत्सद्दी विस्टन चर्चील (इंग्लंडचे पंतप्रधान) ज्याने इंग्लंडला युध्द जिंकून दिलं. ते जेमतेम ४ तास झोपत असतं! केव्हा सकाळी ६ ते सकाळी १० ! किती कमी झोप (निद्रा) ! जगाच्या सर्व नकाशाचं त्यांना ज्ञान होतं ! सर्व युध्द ते चालवत होते. आपलं सैन्य कुठे आहे, काय करते आहे, दारुगोळा किती आहे, तोफा किती आहेत, तेथील परिस्थिती काय आहे, हे सर्व त्यांना माहित होतं. सर्व अचूक निर्णय ते घेत असतं! इतकं सर्व टेन्शन असूनही, झोप कमी असूनही ते सदासर्वदा फ्रेश (प्रफुल्लीत, ताजेतवाने) असत.

इंदिरा गांधी अगदी कमी झोपत असतं. नेपोलियनबद्दल तर आपल्याला माहीतच असेल. ही सर्व विद्वान माणसं कमी झोप घेऊनसुध्दा ते ताजेतवाने, प्रफुल्लीत कसे होते ? याचं कारण त्यांना कळत होतं. शरीराचा जो भाग थकतो, त्या भागालाच विश्रांती दिली पाहिजे;

हे एक शास्त्र आहे. या शास्त्राला यौगिक निद्रा असं म्हणतात. योगशास्त्रदृष्ट्या निद्रा! ही चार तास पुरेशी होते. मी सुध्दा जेमतेम चार तासच झोपतो. माझ्याबरोबर जे गाणगापूरला येतात ते आपल्याला सांगतील. रात्री दोन वाजता मी जागा असतो. मला जो हाक मारतो ती हाक ऐकून तिकडे मी त्याच्या मदतीला जातो. कसा जातो हे विचारु नका!

ही जी झोप आहे म्हणजे विश्रांती (मी झोप म्हणत नाही तर विश्रांती म्हणतो) ती मी माझ्या हव्या त्या इंद्रियांना देऊ शकतो (जे थकलं आहे), तर ती इंद्रियं ताजीतवानी होतील आणि बाकीच्या इंद्रियांना आवश्यकतेपेक्षा जी जास्त विश्रांती मिळते ती मिळणार नाही. हे विश्रांतीचं शास्त्र आपल्याला कळलं पाहिजे. कोणत्या अवयवाला किती विश्रांती द्यावी हे जर मला कळू लागलं, तर नेमकी तेवढीच विश्रांती त्या त्या अवयवाला आपण देऊ शकतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# मेंदूला विश्रांती देवू शकतो

मेंदूला आपण जी विश्रांती द्यायची असते त्याला शास्त्रीय भाषेत म्हणतात रेमी निद्रा ! ही अडीच ते तीन तासांची असते.

# मेंदूला विश्रांती देवू शकतो

सर्वात चांगली विश्रांती हवी असते ते मेंदूला! मेंदूला विश्रांती देतो की नाही, ते आपण पाहूया! माझं असं म्हणणं आहे, आपण खरी विश्रांती मेंदूला देतच नाही! तपासून बघा! आपण झोपतो. आपल्या भाषेत ते झोपणं असतं! परंतु चुळबूळ चालू असते. या कुशीवरुन त्या कुशीवर, तंगड्या गळ्यात, पुन्हा सरळ! डोळे मिटलेले पण चित्र चालू! डोळ्यांची बुब्बुळं फिरत असतात, म्हणजे स्वप्न बघत असतो! मेंदू विचार करत असतो, अंतर्चक्षू चित्रं बघत असतात आणि स्वप्नात उत्तर सुध्दा देत असतो! स्वप्नात बोलत सुध्दा असतो, कारण आतील (स्वप्नावस्थेतील) स्वरयंत्र काम करीत असतं!

माझ्या सांगण्याचा रोख असा, खरी झोप आपण घेतच नाही. कारण जी चित्र बघता म्हणजे अंतर्चक्षू काम करीत असतात, म्हणजेच मेंदू काम करीत असतो. मग आपण विश्रांती देतो कुणाला, अशा तऱ्हेने विश्रांती न दिलेला मेंदू दुसऱ्या दिवशी आपण ऑफिसला जातो तेव्हा सारख्या जांभया, आळस देत असतो आणि दुसरे आपल्यावर Comments करत असतात, ते मी आपल्याला सांगण्याची गरज नाही!

आपल्याला मेंदूला योग्य तऱ्हेने विश्रांती देण्याचं शास्त्र समजून घ्यायला हवं! मेंदूला आपण जी विश्रांती द्यायची असते त्याला शास्त्रीय भाषेत म्हणतात रेमी निद्रा! ही अडीच ते तीन तासांची असते, आणि याच्या नंतरची झोप किंवा निद्रा चाळवा-चाळवीची असत. ही अडीच ते तीन तासांची विश्रांती एरव्ही ही आपण जागे राहून मेंदूला देऊ शकतो!

आपल्याला एक सत्य कथा सांगतो (दंतकथा नाही) साईबाबांची गोष्ट आहे. साई सच्चरित्रामध्ये ही कथा आहे. एका वीतभर रुंदीच्या फळीवर (चावडीमध्ये) साईबाबा झोपत असत! उश्या आणि पायथ्याशी पणत्या जळत असत, आणि एका कुशीवर साईबाबा झोपत असत! साईबाबांनी याचं उत्तर दिलेलं आहे, असं मीच झोपू जाणे, तुम्हांला ते कळणार नाही!

मलाही आपण केव्हाही हाक मारा, (आपण जर माझे शिष्य असाल) जरी मी

गाणगापूरला असलो तरी मुंबई वा इतरत्र कोठेही मी आपल्या मदतीला येतो, हा आपल्याला अनुभव येईल! मला ती हाक ऐकू गेलेली असते! माझी जी कर्णेंद्रिये आहेत, जी बाहेरचा आवाज ऐकतात त्याच्याही पेक्षा जी अंतर्कर्णेंद्रिये आहेत, ती जेव्हा काम करु लागतात तेव्हा ती हाक (कोणीही मारलेली) ऐकू येते. ही अंतर्कर्णेंद्रिये विवेकाचा आवाज ऐकतात! विवेक म्हणजे काय ते मी सांगतो!

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, मी तुझ्या विवेकाच्या ठिकाणी आहे. याचा अर्थ परमेश्वर आपल्या विवेकाच्या ठायी आहे. त्याचा आवाज आपल्याला ऐकू येत नाही. कारण आपण बाहेरचे आवाज ऐकण्यात सदा मशगुल असतो. हे तू करतो आहेस ते बरोबर नाही, असा आतील आवाज ज्याला गांधीजी म्हणतात (Inner Voice), तो आपल्याला ऐकू येत नाही. म्हणजेच जे ऐकू यायला पाहिजे म्हणून बाह्य कर्णेंद्रिये आपल्याला बंद ठेवता आली पाहिजेत हे शिक्षण मी देतो. प्रत्यक्षात शिकवतो!

आपली पाचही ज्ञानेंद्रिये बंद कशी ठेवायची (परमार्थ करताना) त्याचं शिक्षणही मी देतो. तेही जीवंत असताना! हे पंचज्ञानेंद्रियांचे शिक्षण यौगिक निद्रेमध्ये आहे. यौगिक निद्रा म्हणजे फक्त मेंदूलाच निद्रा किंवा विश्रांती! कान चालूच! परंतू बाहेरचे आवाज कान घेणारच नाहीत! आपल्याला योग्य तिच विश्रांती घेता येते त्यामुळे जी अस्वस्थता वाटते ती वाटत नाही. सदासर्वदा ताजतवानं राहाता येते, प्रफुल्लीत राहाता येते! योग्य निर्णय घेता येतात! लोक कल्याणाची कामे करता येतात! आणि जे मोरोपंतांच वाक्य आहे, कृतांत कटकां मल ध्वज जरा दिसू लागले! याचा अर्थ असा, कृतांत म्हणजे यम, कटक म्हणजे जंगल, अमल म्हणजे पांढरा, ध्वज म्हणजे केस पांढरे होत नाहीत, जरा म्हणजे म्हातारपण अर्थात डोक्याची चांदी होत नाही!

आपल्याला अकाली म्हातारपण येतं, डोक्याची चांदी होते हे सर्व परिणाम ताण-तणावाचे आहेत. हे म्हातारपण आपण येऊ द्यायचं नाही, वय आहे तेथेचे थांबविणे यालाच म्हणतात, 'वयस्तंभीनी विद्या'! तारुण्य तेथेच ठेवायचं आणि कुठेतरी वापरण्यापेक्षा योग्य ठिकाणी, लोकांच्या कल्याणासाठी वापरायचं! या सर्व गोष्टीचं मूळ यौगिक निद्रेमध्ये आहे. ही यौगिक निद्रा आपल्याला घेता आली,

योगदृष्ट्या ती आपल्याला घेता आली तर आपल्याला हवं तेव्हा आपल्या मेंदूला आपण विश्रांती देऊ शकतो ! आपला मेंदू सदोदीत ताजातवाना ठेऊ शकतो.

या सर्व गोष्टींसाठी नाथपंथीय साधना आहे. जी विठ्ठलपंत - रुक्मिनीबाईंनी केली, त्यांच्या मुलांनी, निवृत्ती-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताबाईंनी केली, शिवाजी महाराजांनी केली आणि जी आजही अस्तित्वात आहे, जिचं मी शिक्षण देतो, ती करवून घेतो. थोडासा वेळ त्याला दिला पाहिजे. त्याने आपण आपलं जीवन चांगलं करु शकतोच पण त्याच्या पुढीलही जीवन (जे आपण देवाला म्हणतो देवा माझ्या वाट्याला हे भोग का ? माझ्या वाट्याला असं दु:ख का ?) हे सर्व आपण नाहिसे करुन चांगलं करु शकतो, हे आपल्या हातात आहे.

दैवाने असं म्हणण्याचंही काही कारण नाही, कारण दैवसुध्दा आपल्या हात आहे. नियती म्हणजे आपल्याकडे काही पुण्याचा गाठोडा आहे, तो वाढविण्याचं ही आपल्या हातात आहे ! फक्त ते पध्दतशीर केलं पाहिजे ! काहीतरी करणं म्हणजे करणं नाही !

भगवान श्रीकृष्णाला यौगिक क्रिया चांगल्या माहित होत्या म्हणून त्याला योगीयांचा राजा म्हटलेलं आहे; आणि या यौगिक क्रिया माहित असल्यामुळे तो सांगू शकला, भोगूनी सोळा सहस्त्र अष्टनायिका, जर मी ब्रह्मचारी असेन तर परिक्षीती तू जीवंत हो ! कारण ब्रह्मचर्यांचा अर्थ श्रीकृष्णाला माहीत होता.

आपण या सर्व गोष्टी नीट योग्य तऱ्हेने समजून घेतल्या तर आपण आपलं जीवन सुखी-समाधानी, सर्व गोष्टींनी संपन्न करु शकतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# ज्ञानाची सुवर्ण भूमी भारत

भारतामध्ये, अभ्यास यावा, अभ्यास लक्षात रहावा, आपली बुध्दीमत्ता, आपली स्मरणशक्ती ही Super Computer असावी अशा तऱ्हेचं संशोधन झालं!

# ज्ञानाची सुवर्ण भूमी भारत

वस्तुतः भाषण देणे किंवा प्रवचन करणे हा भाग काही काळ मी वर्ज्य केला होता. रामायण-महाभारत हे आपण सर्वच वाचतो. परंतु कोणे एके काळची भारत ही सुवर्णभूमी, दिसू लागली स्मशानभूमी! हे असं का घडलं! हे परिवर्तन भारतामध्ये का झालं? या विषयाचा सांगोपांग विचार सामान्यतः सामाजिक कार्यकर्त्यांनी केला असं मला वाटतं नाही.

एकेकाळी ज्ञानाची निर्यात करणारा भारत, आज ज्ञानाची आयात करु लागला आहे; म्हणजेच आपण कुठेतरी अधोगतीला लागलो, आपली गाडी घसरण करु लागली आणि सामान्य ईस्ट इंडिया कंपनी या भारतावर राज्य करु लागली! ४-५ हजार सैनिक घेऊन येणारा अल्लाऊद्दीन खिलजी ३०-३५ हजार सैन्य असलेल्या रामदेवराय यादव याचा पराभव करु शकला.

कालीकोटची लढाई, सन १५६५ साल! विजयनगरचं साम्राज्य! ज्यांच्या काळामध्ये स्त्रियांच्या पायात जी पैजार (चप्पल) असे, तिला सोन्याच्या साखळ्या असत, असं वर्णन त्याकाळातील पोर्तुगीजांनी केलेलं आहे. २ लाख मुस्लिम सैन्याने एकत्र येऊन ५ लाख हिंदु सैन्याचा पराभव केला. सहा महिने विजयनगर (हम्पी) लुटलं जात होतं. हे सारं आपण कुठेतरी कमी पडलो हे दाखवतं!

रामायण काळामध्ये लक्षात येणाऱ्या अशा काही घटना आहेत; मारुतीला आपल्या चित्रामध्ये शेपूट दाखवतो. वस्तूतः ते तसं नाही आहे. लंगूलं म्हणजे Guiding Mask असा त्याचा अर्थ आहे. जसं होडी वल्हवण्यासाठी मागे सुकाणू असतं, तसा भाग आहे. अप्रत्यक्षात त्याचा असा अर्थ की मारुती हा अंतरिक्ष यान चालवणारा पायलट आहे. मेक्सिको येथे याची चित्रे आहेत. ती प्रसिध्द झालेली आहेत.

मुद्दा माझा असा की त्याकाळामध्ये अंतरीक्ष यान चालवणारे पायलट होते. आपण रामायणामधील एक छोटसं वर्णन पाहूया! लक्ष्मणाला बाण लागला, एक शक्ती लागली आणि लक्ष्मण बेशुध्दावस्थेत गेला. कोमामध्ये गेला.

आपण यातील अतिशयोक्ती वजा करुया! हिमालयातून वनस्पती आणली

पाहिजे, त्यासाठी मारुतीची नेमणूक झाली आणि मारुतीने उड्डाण केलं. उड्डाण केलं हे खरं. परंतु असं शारिरीक उड्डाण नव्हे! तो अंतरिक्ष यानातून हिमालयात गेला. वनस्पती ओळखता आली नाही कारण तो वनस्पती तज्ञ नव्हता! तेव्हा तो अंतरिक्षात घालून सर्व डोंगर घेऊन आला.

दुसरं म्हणजे सर्व वानराचं तोंड फुगीर आहे, याचा अर्थ Gas Mark (मुखवटा)! कारण त्याकाळामध्ये रावणाने उन्माद वायूचा वापर केलेला आहे.

दुसऱ्या महायुध्दात Laughing Gas (हसविणारा वायू) ज्याला आपण NO2 असं म्हटलं आहे, त्याचा वापर केला होता. या पध्दतीचं वर्णन रामायणामध्ये आहे.

आपण रामायण नीट वाचलं तरं ह्या गोष्टी आपल्या लक्षात येतात. शुर्पणखाचे हेड फोन कापलेले आहेत असंच रामायण सांगतं. माझ्या म्हणण्याचा रोख असा भारत त्याकाळामध्ये तांत्रिक, मांत्रिक, यांत्रिक या बाबतीत पुढारलेला होता की आजच्या काळातील ॲटम बॉम्ब म्हणजे ब्रह्मशिरस किंवा ब्रह्मास्त्र याचा वापर केला गेला म्हणून लंकेमध्ये शेकडो चौ.कि.मी. परिसरात आजही गवताचं पातं उगवत नाही. आता आपल्या लक्षात येईल इतका पुढारलेला भारत इतका मागासलेला झाला!

उत्तम शिल्पशास्त्र नष्ट झालं. भृगुसंहितेप्रमाने विमान विद्याही नष्ट झाली. पुष्कर विमानाचं उदाहरण हे त्यातील एक सत्य. १०० वर्षांपूर्वी श्रीमान तळपदे यांनी चौपटीवर विमान उडविलेलं आहे आणि ते भृगुसंहितेतल्या समरांगण या पुस्तिकेप्रमाणे तयार केलेलं आहे.

मुद्दा असा, मित्रहो कोणे एकेकाळची सुवर्णभूमी दिसू लागली स्मशानभूमी! आपण ज्ञानाची खरी जोपासना सोडली! याचा अर्थ आपण उच्चार शास्त्राचा मागोवा घेतला नाही. प्रभू रामचंद्रांना जे शिक्षण वशिष्ट ऋषींनी दिलं, जे ज्ञानेश्वरांनी योगवशिष्ठामध्ये नमूद केलेलं आहे, याचा अर्थ स्वतः ज्ञानेश्वरांनी योगवशिष्ठाचा अभ्यास केला आणि आपल्याला सांगितलं. उत्तम ज्ञान संपादन कसं करायचं ते योगवशिष्ठ सांगते.

जगातील पहिला अर्थशास्त्र लिहिणारा चाणक्य ज्याला पदवी आहे, पक्षज्ञ,

ज्याला पदवी आहे वात्सायन! कामशास्त्र लिहिणारा वात्सायन, अर्थशास्त्र लिहिणारा चाणक्य! संपूर्ण वर्षाचा अभ्यास एका पक्षात करणारा पक्षज्ञ! हाही चाणक्य! हे तपासताना आपण मागे गेलो तर, सांदिपनी ऋषींच्या आश्रमामध्ये भगवान श्रीकृष्णाने १२ वर्षांचा अभ्यास फक्त ६ महिन्यात केला असं भागवत म्हणते! आपल्याला हे पटतं न पटतं इतक्यात चाणक्याचा संदर्भ मिळतो की ज्यांनी तक्षशिलेमध्ये ५ वर्षांत अभ्यास करुन प्राचार्य या पदवीला गेले!

याचा अर्थ भारतामध्ये, अभ्यास यावा, अभ्यास लक्षात रहावा, आपली बुध्दीमत्ता, आपली स्मरणशक्ती ही Super Computer असावी अशा तऱ्हेचं संशोधन झालं! पुरावे बघता बघता आपल्या लक्षात येते की ज्ञानेश्वरांनी अगदी लहान वयामध्ये, ७२ व्या वर्षी भगवान श्रीकृष्णाने गीता सांगितली जी आजही भल्याभल्यांना उकलत नाही. तिच्यावर ज्ञानेश्वरीसारखं भाष्य लिहिलं! नुसतं भाष्य लिहिलं नाही तर ते आजही अती कठीण आहे. हे ज्ञानेश्वरांनी कसं साध्य केलं! अभ्यास केला कसा ?

मला सुध्दा अभ्यास करताना अशा प्रकारची कोडी पडत होती. मला माझ्या ज्या गुरुजींनी म्हणजे माझं आजोळ हे पेंडूर गावची मोगरणेवाडी, ता. मालवण! या गावातील लोकं असतील ती आजही सांगतील. त्या ठिकाणी मराठे गुरुजी होते. या मराठे गुरुजींना जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशीप त्याकाळामध्ये मिळालेली होती. ते माझे मंत्र गुरु. ते लोकमान्य टिळकांचे सहकारी होते. मी माझ्या गुरुजींचा मुद्दाम परिचय करुन देतो कारण मी एक तोतरा मुलगा होतो. मला चांगलं बोलता येत नव्हतं! म्हणून मी बोलतचं नसे!

माझा मुद्दा लक्षात घ्या, भीतिगंड याने माणसाला न्यूनगंड, कमतरतेची भावना निर्माण होते. ही काढून टाकली नाही तर माणूस कधीच प्रगतीपथावर जात नाही! मी हे अनुभवातून बोलतो आहे. माझ्या मराठे गुरुजींनी हे ओळखलं, की या मुलाकडे विचारक्षमता आहे पण उच्चार करता येत नाही म्हणून हा संकोचतो! दोष आहे उच्चार शास्त्रामध्ये! उच्चार शास्त्राला Phonetic Science असं म्हणतात. आणि हे सर्वात महत्वाचं शास्त्र आहे. भारतीयांनीच हे शास्त्र शोधून काढलं, भारतीयांनी हे शास्त्र जोपासलं आणि भारतीयांनीच या शास्त्रामध्ये ज्ञान बांधलं.

Phonetic Science म्हणजेच आपलं मंत्रशास्त्र होय ! परंतु वेगळया अर्थाने !

मराठे गुरुजींनी मला ओंकार शिकविला, साधा ॐ! अशा तऱ्हेने म्हणायला शिकविला की त्याने माझ्या भाषेमधील दोष, जीभेचा दोष, उच्चार दोष, फुफ्फुसामध्ये हवा साठून बोलताना जो दम लागतो, तो दम लागणार नाही ही स्थिती ॐ काराने मला दिली ! आणि माझा त्यांना एकच प्रश्न होता की ॐ काराने काय साध्य होणार आहे ? त्यांनी मला सांगितलं बाबी (मला त्यावेळी सर्वजण बाबी म्हणायचे) लवकरच मी तुला अनुभव देईन !

मला असा चमत्कारिक अनुभव आला, माझा तोतरेपणा साफ निघून गेला ! माझा भीतिगंड दूर केला !

याचा अर्थ मंत्रामध्ये कंपनशक्ती आहे आणि त्या कंपन शक्तिमध्ये काहीतरी जादू आहे हे मराठे गुरुजींनी मला दाखवून दिलं !

ही जादू ज्ञानेश्वरांनी पाहिली, ही जादू ज्ञानेश्वरांनी आपल्या बुध्दीमत्तेसाठी वापरली !

चंद्रगुप्त मौर्याच्या काळामध्ये रणगाड्यांचा (ज्याला कंटकशोधन गाडी म्हणत असत) वापर केला जात असे. हे ग्रीक लोकांनीच मांडलेलं आहे.

माझा विषय असा की त्या काळामध्ये भारतीयांनी असं काही शोधून काढलेलं होतं की ज्याने आपला मेंदू हा Super Computer होऊ शकेल, त्याच्या लक्षात राहू शकेल !

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**



# शिवरायांची ज्ञानसंपदा

शिवरायांनी जे जे पाहील ते ते सारं लक्षात ठेवलं. जे जे नजरेखालून गेलं ते ते सारं चित्रांकित केलं आणि मेंदूच्या फाईलमध्ये टाकलं.

# शिवरायांची ज्ञानसंपदा

अलीकडील काळातील आपण वर्णन पाहू ते शिवरायाचं! अफझलखानाचा बध! पोटात वाघ नखं खुपसून ठार केलं! अफझलखानाच्या ३० हजार सैन्याचा फक्त ५ हजार सैन्याने पराभव करणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. आजच्या काळाप्रमाणे, आजच्या युध्दशास्त्राप्रमाणे आपल्या स्वराज्यात शत्रूशी लढा न देणे, शत्रूच्या राज्यात लढा देणे ही गोष्ट महत्वाची मानली जाते. शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या युध्दात सीमेवर लढाई खेचून अफझलखानाच्या प्रदेशाचाच विध्वंस केलेला आहे. भूगोलाचा अभ्यास नसता तर शिवाजी महाराज या युध्दात यशस्वी झालेच नसते.

वाईजवळ एक डोंगर आहे त्याचं नाव कडेसरी! प्रतापगडाच्या पायथ्याशी दोन गावं आहेत त्यांची नावे, सोनपार, पेटपार. ही गावं आजही आहेत! अफझलखानाच्या सैन्याचे तीन भाग! त्यातील एक भाग राहिला आहे वाईला! ज्याला तोफखाना म्हणतात. एक भाग जो शिवाजी महाराजांना भेटायला येणार आहे तो, त्यात १२०० बंदूकधारी आहेत. सैन्याचा तिसरा भाग कोयनापार! कोयना नदीच्या दोन्ही बाजूला तंबू ठोकून राहिलेले आहेत! शिवाजी महाराज अफझलखानाला भेटणार आहेत प्रतापगडाच्या पायथ्याशी, ज्याला जनीची टेंब म्हणतातत. (जागेचं नावं). हे ठिकाण आणि कोयनापार यामध्ये ६ कि.मी. अंतर आहे. ही संपूर्ण युध्दभूमी शिवाजी महाराजांच्या डोळ्यासमोर जशीच्या तशी आहे! हा भूगोलाचा अभ्यास!

आता मी दुसऱ्या मुद्याकडे येतो. अफझलखानाला मारल्यानंतर त्यांनी आपल्या शिंगाड्यांना सांगितलं शिंग वाजवा! शिंग याचा अर्थ सांकेतिक खूण! हेतू, हे शिंग प्रतापगडावर ऐकू गेलं पाहिजे आणि प्रतापगडावरुन खूणेच्या तोफा सुटल्या पाहिजेत, म्हणजे एक तोफ, दोन तोफ, तीन तोफ! याने आपल्या सैन्याला जागृती आहे. या तोफा कुठे ऐकू गेल्या पाहिजेत, प्रतापगडापासून ८ कि.मी. अंतरावर कडेसरीचे पठार आहे त्या पठारावर नेताजी पालकर अडीच हजार घोडेश्वारानिशी उभा आहे. तिथे या तोफा ऐकू गेल्या पाहिजेत.

वेळ आहे सामान्यतः दुपारी अडीच ते तीन! म्हणजे त्याला कडेसराच्या पठाराकडून वाईकडे २२ कि.मी. अंतर कापता आलं पाहिजे. हे अंतर कापण्यासाठी ताशी ५ कि.मी. घोड्याचा वेग मानला तर ४ तास लागणार! म्हणजे सूर्यास्ताच्या थोडं आसपास नेताजी पालकर आपलं घोडदळ घेऊन वाईकडे जाईल! त्याला वाई कुठेही ओलांडावी लागणार नाही. कारण संपूर्ण वाई अफझलखानाने चौक्यांनी बांधून काढलेली आहे. हे नेताजी पालकरने बरोबर साध्य केलं आणि अफझलखानाच्या वाईतील सैन्याचा पराभव केला. सर्व तोफा काबीज केल्या! त्या काळामध्ये तीनपासून पाच वाजेपर्यंत (कोयनेच्या दोन्ही पारावर अफझलखानाने सैन्याचे तंबू उभारले होते ते ) मोरेश्वर पिंगळेंनी कापून काढले आणि तेथील सैन्याचा पराभव केला. आकस्मित हल्ल्याचा हा परिणाम!

ही युध्दकाळातील सर्व गणितं शिवाजी महाराजांनी वापरली म्हणून मध्ययुगातील सर्वांत युध्दधोरणी असा स्वतः औरंगजेब, इंग्रज त्यांचा उल्लेख करतात. जो उत्तम सेनापती असावा लागतो त्याला भूगोलाचं ज्ञान अधिक चांगलं असावं लागतं! भूगोल, त्याकाळामध्ये आतासारख्या शाळा नाहीत, त्याकाळामध्ये पृथ्वीचा गोल हा दाखविण्यासाठी वर्गात नाही! आणि शिवाजी महाराजांना शिकविणारा कोणीही भूगोलतज्ञ नाही. इतिहासतज्ञ नाही. कारण शिक्षणच दिलं जात नव्हतं. हे काहीही नसताना शिवाजी महाराजांची स्मरणशक्ती किती तल्लख असेल!

जे जे पाहील ते ते सारं लक्षात ठेवलं. जे जे नजरेखालून गेलं ते ते सारं चित्रांकित केलं आणि मेंदूच्या फाईलमध्ये टाकलं. म्हणून इटालियन प्रवासी मनूची असे उद्‌गार काढतो की, शिवाजी महाराजांकडे जिज्ञासा फार! माझा मुद्दा लक्षात घ्या, आपली सवय आपण तपासून पाहूया म्हणजे मी काय म्हणतो आहे ते कळेल! आपली सवय अशी असते, कोणी आपल्याला ओळखीचे भेटले की आपण त्याच्याबरोबर खूप बडबड करतो. (आजच्या भाषेत १८० ची कॅसेट लावतो) समोरच्याने आपलं ऐकलं पाहिजे अशी आपली भूमिका असते. परंतु शिवाजी महाराज याच्या उलट आहेत. ते मनूचीला प्रश्न विचारायचे आणि मनूचीच कॅसेट (बोलणी) ऐकायचे! का? कारण शिवाजी महाराजांना इंग्लंड कुठे

आहे, फ्रान्स कुठे आहे, इटाली कुठे आहे याबद्दल फारसे काही माहित नव्हते. ही माहिती त्यांनी मनूची कडून समजून घेतली. म्हणून मनूची लिहितो, शिवाजी महाराजांना जिज्ञासा फार! त्यांनी माझ्याकडून हे सारं ज्ञान समजावून घेतलं! राजांचे डोळे पाणीदार आहेत. नवनविन ज्ञान मिळविण्याची इच्छा आहे. महत्त्वाची गोष्ट यात लपलेली आहे.

ज्ञान नुसतं मिळविण्याची इच्छा असणे आणि जे मिळेल ते लक्षात ठेवणे यात फरक आहे. शिवाजी महाराज हे तैलबुध्दीचे होते. तैलबुध्दी म्हणजे योग्यवेळी अचूक निर्णय घेणे. आपण आणखी एक उदाहरण घेऊ या! शिवाजी महाराजांचा मानसशास्त्राचा दांडगा अभ्यास होता. कसा ते पाहूया! गनिमी कावा! पळती लढाई! लढता लढता पळायचं, पळता-पळता लढाई करायची. हे, मानसशास्त्राचा अभ्यास करुन शिवाजी महाराजांनी शोधून काढलं! मराठी सैन्य फार थोडं, त्यांना मोठी लढाई जमणार नाही म्हणून गनिमी काव्याचं तंत्र शोधून काढलं.

अफझलखानाबरोबर लढण्यास मराठे तयार नाहीत हे लक्षात येताच एके दिवशी सकाळी प्रतापगडावर सर्व सेनापती, उपसेनापती, मावळे या सर्वांसमोर एक घोषणा केली. काल माझ्या स्वप्नात साक्षात जगदंबा आली आणि या माझ्या तलवारीत गुप्त झाली. आजपासून या तलवारीचं नाव ठेवतो भवानी तलवार! सर्व मावळे, सरदार विचारु लागले, आई काय म्हणाली? शिवाजी महाराजांनी सांगितले, आई म्हणाली, मी तुझ्याबरोबर आहे. तुला सतत यश मिळत जाणार, तू जिंकत जाणार! सर्वांना ठाम वाटलं साक्षात आई आपल्याबरोबर आहे, लढायला हरकत नाही. जय आपलाच आहे. शिवाजी महाराज हे असे एक जादुगार होते. म्हणजे मानसशास्त्रज्ञ होते! अचूक निर्णय घेणारे होते! अचूक निर्णय हा Computer चा गुणधर्म आहे तो त्यांच्याकडे आला कुठून?

ही सर्व ज्ञानसंपदा नाथपंथीय साधनेतून शिवाजी महाराजांना प्राप्त झाली. जिला मी म्हणतो ''सहजयोग साधना'' जी आपल्या बरोबर जन्माला आली. ही साधना किती वाढवावी हे आपल्या हातात आहे. जी मला प्रथम गुरुंनी मराठे गुरुजींनी आणि त्यानंतर पी. अण्णास्वामींनी माझ्यात वाढवली आणि मी एक सामान्य, तोतरा मुलगा पुढे IRAS, IAS होऊ शकलो. माझं काम प्रवचनं करण्याचं


नाही. मी सहजयोग साधना शिकवितो.

माझा मुद्दा असा, आपण ही साधना शिकायला हवी. माझं वाचन कित्येक हजारो पुस्तके आहे. आपण मला प्रश्न विचाराल, वाचलेलं आपण लक्षात कसं ठेवलेत? त्याचं मजेदार उत्तर मी आपणाला देतो, बैल किंवा गाय हे पहिल्याने जेवढं गवत मिळेल तेवढं खातात आणि नंतर सावकाश रवंथ करतात. ज्ञानाच्या बाबतीत झपाट्याने वाचत जाणे, जे वाचलेलं आहे त्याची जाणीव ठेवणे आणि डोळे मिटल्यावर स्वप्नामधून फिरवणे हे लक्षात ठेवण्याचं खरं द्योतक शास्त्र आहे. हे मला पी. अण्णास्वामींनी शिकवलं.

अनंत पुस्तके वाचूनसुध्दा माझ्या चांगली लक्षात आहेत. मी अशा साठी शिवाजी महाराजांचं मानसशास्त्र सांगितलं, त्यांचं भौगोलिक ज्ञान सांगितलं की राज्यकर्त्यांला जे जे आवश्यक आहे ते शिवाजी महाराजांनी संपादन केलं! त्यासाठी ते रडत बसले नाही की मला चांगली शाळा नाही, नाहीतर मी खूप गोष्टी मिळविल्या असत्या! ज्याला यश प्राप्ती करायची आहे, त्याला अनेक मार्ग आहेत. इच्छा, त्या ठिकाणी मार्ग मिळतो.

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**





# सत्संग हाच
# सहजयोग साधनेचा पाया

चांगले विचार, चांगले आचार, चांगलं सत्कर्म हे उत्त्तम संस्काराने माणसाकडे येतात, जे जिजाबाईंनी शिवरायांवर केले, ज्याने हिंदवी स्वराज्य स्थापना झाली.

# सत्संग हाच सहजयोग साधनेचा पाया

माणसाच्या मनात जे विचार येतात त्याला वजन आहे, रंग आहे, त्याला आकार आहे. विचार कार्य घडवू शकतात; किंबहुना कोणत्याही कर्माचा पाया विचार आहे. गर्व याचा अर्थ आचार! आचाराचा पायाच मुळात विचार आहे आणि विचाराचा पाया उर्मी आहे. उर्मी, उर्मीचा पाया पश्यंती वाणी आहे. या पश्यंती वाणीमध्ये उर्मी लपलेली आहे. उदाहरण सांगायचं झाल्यास, आपला चहा प्यायचा वेळ ४ वाजताचा असेल, तर त्याच वेळेला आपल्याला चहा प्यायची तलफ येत. तलफ याचा अर्थ उर्मी! ऊर्मीचं रुपांतर विचारात होते मग जीभेकडून आदेश निघतो चहा बनवता का? ऑफिसमध्ये असू तर प्युनला सांगतो, अरे एक चहा सांग!

ही सर्व रासायनिक कारण मीमांसा आहे. आपल्या पोटामध्ये चहा विरुध्द प्रतिविष (Anti Toxin) तयार होतं. त्यावेळी चहा आपल्या पोटामध्ये गेला नाहीतर बैचेनी वाटू लागते डोकं दुखू लागते इत्यादी इत्यादी! का तर त्या प्रतिविषाला जोड देणारं विष पोटात गेलं नाही, हे रासायनिक कारण आहे. दारु पिणे हाही त्यातलाच प्रकार आहे. यावर उपाय म्हणजे पोटात निर्माण होणारं प्रतिविष नाहीसं करुन टाकणे! कसं? त्यासाठी नामस्मरणं करणं हाच जालीम उपाय आहे. हे आपल्याच्यानं शक्य होत नाही. कारण आपला सडलेला मेंदू ते करु देत नाही. त्याचे दाखले मी आपल्याला देत आहे. यासाठी मी शिवाजी महाराजांचा विषय घेतला त्यातूनच आपल्याला उत्तरं देत जातो आहे.

शिवाजी महाराजांची उर्मी, शिवाजी महाराजांचा मनोमय कोष! आपल्यालाही मनोमय कोष आहे. मनोमय कोष म्हणजे 'अंगुष्ठमात्र पुरुषम्' पिंपळाच्या पानावर बसलेला उजव्या पायाचा आंगठा चोखणारा बाळकृष्ण! हे चित्र आपण पाहिलं असेल! हा अंगुष्ठमात्र पुरुषम् प्रत्येकामध्ये आहे. परंतु आपण तो विसरलेलो आहोत. तुकाराम महाराज सहज बोलून जातात, ''विठ्ठला भेटाया गेलो। विठ्ठल होऊनी ठेलो।।'' भगवान कृष्ण सहजरीत्या बोलून जातात 'मन्मनाभव' सर्व संत आपल्याला सांगून गेले पण आपण ते विसरलो। एका आईचा सत्संग काय ते सांगतो.

शिवाजी महाराज लहान आहेत, गादीवर बसलेले आहेत, राज्यकारभार

शहाजी राजांनी त्यांच्याकडे सुपूर्द केलेला आहे. त्यावेळची गोष्ट! काळ असा आहे, गावातले पाटील हे जोरदार आहेत. सामर्थ्यवान आहेत. कुणीतरी पाटलाने एका विधवेवर बदम्मल केला. असाह्य स्त्रीवर बलात्कार करणे हे त्याकाळी बरेच पुरुष पुरुषार्थ मानीत असत. त्या पाटलाची शिवाजी महाराजांकडे तक्रार आली. शिवाजी महाराजांनी त्या पाटलाचे हात तोडण्याची शिक्षा देऊन ती तक्रार दूर केली. हे विचार, उर्मी, संस्कार असे घडत गेले याचाच अर्थ परवरिश! जी जीजाबाईंनी शिवरायांची केली! यालाच म्हणतात चांगल्या विचारांचा संग जो जिजाबाईंकडून शिवरायांना मिळाला, चांगले विचार, चांगले आचार, चांगलं सत्कर्म असं केल्यामुळे पुढे गागाभट्ट असं म्हणू शकला या सिंहासनावर बसायला अधिक योग्य शिवाजी महाराजच आहेत.

जिजाबाईंनी शिवाजी महाराजांना वडीलांपासून दूर ठेवलं. स्वतंत्र विचार करण्याचं सामर्थ्य दिलं. योग्य निर्णय घेण्याचं तंत्र शिकवलं! या सर्व गोष्टी जिजाबाईंकडे आल्या कशा? किंबहुना जिजाबाईंनी असं कोणतं वेगळं शिक्षण घेतलं होतं की जेणेकरुन ती त्या सर्व गोष्टींचा ठसा शिवाजी महाराजांवर उमटवू शकली? जिला मी नाथपंथीय साधना म्हणजेच सहजयोग साधना म्हणतो. या साधनेचे आविष्कार गुंडा महाराजांकडून जिजाबाईंवर झाले आणि त्या साधनेचा परिणाम म्हणून शिवाजी महाराज हे इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणून जगामध्ये नावाजले गेले.

माझ्या सद्‌गुरुंनी मला या साधनेचं अप्रतिम शिक्षण दिलं ज्याने मी अंर्तबाह्य बदलून गेलो. साधना शरीरात, देहात मुरवली, रिजवली, त्याचे अनुभव घेतले, त्यांचे सत्परिणाम पाहिले आणि त्याचा उपयोग सर्वांसाठी व्हावा, सर्वांचे कल्याण व्हावं, जीवन सुखी व्हावं या हेतुनं ''सहजयोग साधनेचं'' शिक्षण द्यायला सुरुवात केली.

आपण म्हणाल, भाऊ चला, तुमच्याकडे आलो, सहजयोग साधना शिकवायला सुरुवात करा! तसं होणार नाही. कारण ती इतकी सोपीही नाही परंतु अवघडही नाही. त्याच्या काही पायऱ्या आहेत, काही सुत्रं आहेत. ती करता करता सहजयोग साधनेकडे जाता येते! ती आत्मसात करता येते!

**।। श्रीगुरुदेव दत्त ।।**

सद्‌गुरु भाऊ महाराजांची शिक्षण देण्याची पध्दत, रीत अगदी वेगळी होती. मूलतः शिक्षण याचा अर्थच असा की माणसाच्या ठायी जे पूर्णत्व अगोदरच विद्यमान आहे, ते प्रकट करणे. ज्ञान हे आपल्या अंतर्यामात पूर्णपणे भरलेले आहे. ते बाहेरुन कधीच येत नाही. म्हणूनच सद्‌गुरु हे योग्य मार्गदर्शक आहेत. फक्त सद्‌गुरु माऊलीच हे आतील ज्ञान-अज्ञानाचा पडदा दूर करुन शिष्याला त्याच्याजवळील ज्ञानाची ओळख करुन देतात, त्याची जाणीव करुन देतात.

सद्‌गुरु भाऊ महाराजांनी आध्यात्मिक ज्ञानाची भांडारं आपल्या शिष्यांसमोर उघडी केली. त्या भांडारातून जे सर्वांना जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे, ते या सहजयोग साधना पायाभरणी या पुस्तिकेद्वारे भाविकांसमोर ठेवित आहोत, याचा मनःपूर्वक स्वीकार व्हावा.

